म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0003288

ग्रं. सं. ठाणे
निवा ६
३२८.




# वळसा २ रा.

( रा. खाडिलकर यांच्या संगीत " द्रौपदी " नाटकावरील टीका. )

**किंमत ८ आणे.**

नाट्यकला–

एककुठार मात्रा–

# वळसा

रा. रा. खाडिलकरकृत

संगीत [illegible] टीका.

REFBK-0003288

आवृत्ति [illegible]

सन १९२७

सं.नि. ३२८८

लेखकः—सदाशिव नारायण ठोसर. बी. ए. एल्.एल्. बी.
मु. कुर्ली. जि. ठाणे.

किंमत ८ आणे.

[ या पुस्तकाचा हक्क प्रकाशकानें आपले स्वाधीन ठेविला आहे.]

प्रकाशकः—भालचंद्र वामन महाजन.
गोगटे प्रिंटिंग कंपनी मुंबई नं. ४.

मुद्रकः—दत्तात्रय रामचंद्र पर्वते.
गोगटे प्रिंटिंग कंपनी मुंबई नं. ४.

# प्रस्तावना.

वास्तविक दृष्ट्या प्रस्तुतसारख्या विनोदी टीकापुस्तकाला प्रस्तावनेची कोणत्याहि प्रकारें आवश्यकता नाहीं. कारण टीका ही निसर्गतःच स्वयंप्रकाशी असते. 'न हि कस्तूरिकामोदाः शपथेन विभाव्यते' ह्या कस्तूरिकाकोटींतील तिचा निसर्गसिद्ध स्वयंप्रकाश आणि सर्वगामित्व तिच्या झगझगीत ज्योतीच्या प्रकाशनाला प्रस्तावनेची अंधुक प्रशाल कशाला? श्री. ठोसर यांनीं स्नेहभावानें ही प्रस्तावना लिहिविण्याची इच्छा दर्शविली म्हणून मी ही छोटीशी प्रस्तावना—लिहावयास उद्युक्त झालों. मी अद्याप कोणत्याही पुस्तकाला प्रस्तावना लिहिली नसल्यामुळें आणि त्यांतल्या त्यांत ह्या टीकाग्रंथाला प्रस्तावना लिहावयाची ह्मणजे माझ्यावर हा एक प्रकारें दुर्धर प्रसंगच ओढवला आहे, तथापि थोडें धैर्य धरून कांहीं जमण्यासारखें असल्यास पाहूं.

' कुठारमात्रावैद्यपंचानन ' श्री. ठोसर हे एक नाणावलेले व नांवाजलेले लेखक आहेत. त्यांनीं ' गुप्तमंजूषांवर ' टीका लिहून विनोदी टीकाकाराची कीर्ति मागेंच संपादन केली आहे. त्यांची विनोदी टीकालेखनपद्धति आपल्या वाङ्मयक्षेत्रांत नाविन्यपूर्णतेची भासल्यामुळें कित्येकांचे डोळे दिपून त्यांना मूर्च्छा येणें साहजिक आहे. तथापि कित्येक होतकरू नाटककारांना ती टीका आवडली—अत्यंत आवडली. आणि वास्तविक पहातां नवीन होतकरू व हव्यासी नाटककारांकरितांच वरील टीका लिहिण्याचे त्यांनीं परिश्रम घेतले. त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं त्यांनीं ' मेनकेवर ' व ' द्रौपदी 'वर असे दोन वळसे उगाळले. येथें टीकापुस्तकाचा कोणत्याही रीतीनें परामर्ष घेण्याचा आमचा हेतु नाहीं. व त्याचें हें स्थलहीः नव्हे. वाचकवर्ग त्याचा योग्य तो समाचार घेतीलच.

दुसरा वळसा त्याच मात्रेचा, त्याच सहाणेवर आणि त्याच

वर्तुळांत उगाळला आहे. तथापि त्यांनीं त्यांत मार्मिकता, सूक्ष्मनिरीक्षण व बुद्धिकौशल्य प्रकट करून आपल्या नाटककाराला पुष्पांजलीचा अहेर मोठ्या भक्तिभावानें सादर केला आहे; असो. ही विनोदी टीकापद्धति अत्यंत श्रेष्ठ प्रकारची होय. एकाद्या पुस्तकावर गंभीर टीका करण्यापेक्षां अशा प्रकारची हंसत खेळत केलेली निःपक्षपाती टीका ग्रंथकर्त्याला क्वचित् जरी रुचली नाहीं तरी ती निःसंशय त्याला पटते. पण ती विनोदी टीका मर्यादे पलीकडे जाऊं नये—तो विनोद मर्यादातिक्रम करून त्याचें पर्यवसान अतिरसाच्या पराकोटींत झालें नाहीं एवढी खबरदारी टीकालेखकानें घेतली ह्मणजे ती टीका ग्रंथकर्त्यालाही रुचेल निदान न पटणारी तरी खास होणार नाहीं. टीकाकारानें मुख्यतः सहृदयता आणि मार्मिकता दाखविली पाहिजे. कारण विनोदांत उपहासाचा अतिरेक झाला ह्मणजे त्याला कुटाळकीचें स्वरूप येतें. अशा प्रकारें विनोदी टीकालेखकावर बरीच मोठी जबाबदारी असल्यामुळें त्याची टीका लोकप्रिय होणें मोठें कठीण काम असतें. तथापि श्री. ठोसर यांनीं पुष्कळ अंशीं आपल्यावरील जबाबदारी योग्य रीतीनें बजावली ह्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. ह्या पुढील कुठारयात्रा ते नेहमींप्रमाणेच परिश्रम व काळजी घेऊन सर्वांगसुंदर काढतील अशी आशा केल्यास ती निष्फळ ठरणार नाहीं असें वाटतें.

डेक्कन कॉलेज
ता. ७।१।१९२७.

रा. प्र. कानिटकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ...
ठाणे
संनि. ...
१५।८।...

# नाट्यकला-रुक-कुठार.

## मात्रा वळसा नं. २

3222

( रा. रा. खाडिलकरकृत संगीत द्रौपदी नाटक. )

रविवारचा दिवस चौपाटीवर चिकित्सा-महालांतील विधायक-दिवाणखान्यांतील मंडळी नेहमींप्रमाणें जमली होती. दिवाणखान्याची गॅलरी समुद्रानजीक असल्यामुळें सूर्यास्ताची शोभा व खालीं बॅकबेवर सहल करीत असलेल्या मंडळीची गंमत तेथून सहज दृष्टीस पडत होती. त्या देखाव्यावर नेमून दिलेल्या वेळांत, नेमून दिलेल्या चालीवर, शीघ्र कवींनीं नुकतेंच एक सुंदर पद रचिलें होतें व तें पद पदेशास्त्री तंबोऱ्यावर म्हणत होते व श्रीयुत तालेगिरी यांनीं ठेका धरला होता. रा. रसगंगाधर त्या पदावर खूष होऊन माना डोलवीत होते. रा. मार्मिकराव आपली चंची सोडून ताम्रमुखीचा बार भरण्याच्या गडबडीत होते. भारताचार्य महाभारतीय पानें चाळींत एका कोपऱ्यांत पडून होते; इतक्यांत जिन्यांतून करकर बूट वाजवीत रा. रा. खुशालराव गुलकंदे यांची अपटुडेट पोशाख केलेली स्वारी प्रवेश करती झाली व रा. खाडिलकरकृत संगीत द्रौपदी नाटकाची प्रत टेबलावर आपटून शेजारच्या इझिचेयरवर त्यांनीं आपला गजकटी देह झोकून दिला.

**खुशालराव**:—डॅम् युवर सॉंगस् मिस्टर शीघ्रकवी ( रा. पदेशास्त्री घाबरतात तंबोऱ्याची तार व तबल्याची वादी एकेच वेळीं तुटते व शीघ्रकवी गुपचुप मार्मिकरावांच्या चंचीतल्या पानांचा तोबरा भरतात ) पदें म्हणायची असलीं तर खाडिलकरांचीच म्हणा. बस् आपण तर खूष आहोंत. याला म्हणावं काव्य, याला म्हणावं संगीत, याला म्हणावं रागदारी !!

**मार्मिकराव**:—( टेबलावरचं बुक उचलून ) याला म्हणावं फोटोग्राफी, याला म्हणावं बुक--बाइंडिंग, याला म्हणावं पायका टाईप्, याला

म्हणावं कौन पेपर, अवघी किंमत बारा आणे आणि या महागाईच्या दिवसांत !! मी याबद्दल रा. खाडिलकर यांचें आभार मानतों.

**खुशालराव:**—याचं नांव सर्वांग सुंदर !! तें कांहीं नाहीं काल मी हें नाटक, पुस्तक हातांत घेऊन डोळ्याला दुर्बिण लावून पाहिलेलें आहे. मलातर तें फारच आवडलें. या कवीला मी शेक्स्पियर समजतों.

**मार्मिकराव:**—नाटकांची संख्या तितकी भरेल खरी. नाटकांवर नाटक ! अंकावर अंक ! चालली संख्या वाढत !!

**खुशालराव:**—मी आज तुम्हाला हें नाटक सबंध वाचून दाखविणार आहे.

**मार्मिकराव:**—इन्जेक्शनच ह्मणायचं !!

**खुशालराव:**—इन्जेक्शन म्हणा कीं, कार्टरॉझेशन् म्हणा ! असं कांहींतरी केल्याशिवाय या मार्मिकरावांचा खोकला थांबणार नाहीं. कबूल ? सुरवात करूं ?

**मार्मिकराव:**—( एकीकडे ) या खुशालचंद बांसुदीला वाटतं कीं कुठारक्षबनें हें नाटक पाहिलंच नाहीं. ( उघड ) ठीक ठीक खुशालराव करा सुरवात. खुशाल चालू द्या. मात्र आमची टीका तुम्हाला पटली तर " ती मला पटली " इतकं तरी प्रामाणिकपणानें कबूल करण्याचा मर्दपणा तुमच्या अंगीं आहेना ? हें सांगा अगोदर नाहींतर जाल बिघडून !!

**खुशालराव:**—छे हो असं कसं होईल ? हं चला ऐका.

**मार्मिकराव:**—( हिअर हिअर करून साऱ्यांना जवळ बोलावतो. सारे जमतात. पेटी सारंगी तबला सुरू होतो. )

**खुशालराव:**—नांदीचें पद म्हणतात.

राग यमन.

सुखवीत सकल नटवीत चलाचल । कमला पदयुग वंदिले विमल ॥
अनादि लक्ष्मी, अनंत विपुला । अवीट बाला नसोचि चपला ॥

भ्रमतो विटतो मानव चंचला ॥

**रागोपंतः**—( माना डोलावतो ) सुरवातीला यमन रागाची योजना ठीक आहे.

**अर्थभटः**—कमला-लक्ष्मी-संपत्ति किंवा शोभा ही साऱ्यांना सुखविते, नटविते ती अनादि आहे. .

**भारताचार्यः**—कांहो लक्ष्मी अनादि कशी ? ' लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा ' या साऱ्या जिनसा समुद्रमंथन प्रसंगीं नविन उत्पन्न झाल्या अशी कथा भारतांत आहे. लक्ष्मीचा आदि तेथें आहे. मग ती अनादि कशी ?

**पदेशास्त्रीः**—अनादि अनंत वगैरे शब्द मंगलाचरणाचे पदांत चांगले दिसतात हो. असूं द्या कीं.

**मार्मिकरावः**—" ॲकिलीज रॉथ टुग्रीस दि डायरफुल् स्प्रिंग " ही सुद्धां नांदी मोठी गोड लागेल.

**भारताचार्यः**—एक ब्रह्मस्वरुपाशिवाय कोणालाहि, अनादि हें विशेषण लावणें युक्त नाहीं. साऱ्या सृष्टीचा जन्म ब्रह्मापासून, ब्रह्माचा मात्र जन्म कोणापासून याचा थांग लागत नाहीं, म्हणून केवळ ब्रह्म हेंच अनादि. लक्ष्मी अनादि नाहीं.

**शीघ्रकवीः**—अनादि लक्ष्मी अनंत विपुला, या चरणांत लक्ष्मी शब्द नसला तरी चालेल. वरती कमला आहेच. तर आतां असें करा ' महा प्रतापी अनंत विपुला ' हा चरण घाला आणि मुळचा खोडून टाका.

**खुशालरावः**—( गपाचिप तसें करतात. ) व पुढें गातात. ' अवीट बाला नसेचि चपला '

**मार्मिकरावः**—नटवीत, अवीट, विटतो—" वकट लेंड मुंड नार आर वैद झक् ( अर्थभटाला तिकडे ठसका लागतो. )

**अर्थभटः**—अहो हा अवीट शब्द घशाखालीं उतरत नाहीं, ( उचकी लागते. )

**मिस्टर चक्रपाणी**:----अवीट हा समास कसा सोडवायचा ? समासचक्रांत कांहीं याचें उत्तर सांपडणार नाहीं. अवीट बाला ( चक्राकार फिरतो. )

**मार्मिकराव**:---न विटः अविटः नास्तिविटः यत्समंतात् सा अवीट बाला. जिच्या शेजारीं विट चेट नटादि माणसें नाहींत ती अवीट बाला किंवा जिच्यापाशीं विटा नाहींत ती अविटा बाला विटबंदी नाहीं--नुसतीच चुनेगची बाला !! ती अवीट बाला.

**अर्थभट**:---( घशांत बोटें घालून ) जिच्याबद्दल कोणाला वीट येत नाहीं अशी बाला, ती अवीट बाला--लक्ष्मी.

**भारताचार्य**:---लक्ष्मीचा सहसा कुणाला वीट येत नाहीं. कबूल. पण मग गौतमबुद्धासारख्यांची अवस्था काय ? बुद्ध हा युवराज असतां लक्ष्मीला विटून वनांत गेल्याचें प्रसिद्धच आहे व याशिवाय ' भ्रमतो विटतो मानव ' असें पुढें म्हटलेंच आहे. त्या अर्थी तुमचा अर्थ बरोबर नाहीं. बरं जिला कुणाचा वीट येत नाहीं, अशी जी ती अविटा बाला हाही अर्थ बरोबर नाहीं. कारण लक्ष्मी कोणाबद्दल केव्हां विटेल व त्याचा केव्हां तिरस्कार करील याचा मुळींच नेम नसतो.

**अर्थभट**:---मग अवीट बाला याचा अर्थ तरी काय ?

**मार्मिकराव**----मी सांगितला तोच ! चुनेगची बाला ! पांढरी सफेत !!

**खुशालराव**:---रा. खाडिलकर यांना तारेनें अर्थ विचारतों. थांबा- ( तारकरतो. )

**शीघ्रकवी**:---तारेनें जबाब येईपर्यंत तूर्त अवीट बाला याचे जागीं ' बिलोल तेजसि किंवा विलोलनेत्रा ' असा शब्द घातला तरी चालेल.

**प्रसादराय**:---या पदांत प्रसाद मुळींच नाहीं.

**अर्थभट**:---अर्थाची ओढाताण.

**रसगंगाधर**:----रस पहावा तर चरकांतून निघालेल्या उसाच्या

चिपाडाहून अधिक पांचट ! या पद्यांत चमत्कृती नाहीं. पुढील कथानकाची छाया नाहीं. कवीला लक्ष्मीचें वर्णन करावयाचें होतें तर ती लक्ष्मी चपले सारखी चंचल आहे असा भावर्थ आणला असता, तर पांडव एका क्षणांत आपल्या साऱ्या राज्यलक्ष्मीला--राज्यलक्ष्मीला काय पण गृहलक्ष्मीलासुद्धां कसें गमावून बसले याची छटा त्या भावार्थांत प्रतिबिंबित झाली असती. तें टाकून लक्ष्मीची विनाकारण अप्रस्तुत स्तुती करणें हें कविकौशल्य नसून कौशल्याचा अभाव आहे.

**शीघ्रकवी**:----तें मूळचें पद सबंध खोडून टाका आणि त्या ऐवजीं हें लिहा:--

" चाल मूळचीच ( गुफलीत )

फसवीत सकल फिरवीत चलाचल। कमलादेवी मोहवी भुवन।। फस०।।
क्षणांत रुसवी क्षणांत हंसवी। खलांसि तोषवि बुधांसि ठकवी।
धनजलिं शिणवी मानवहरिणा।। फसवीत ०।। "

सारी मंडळी हियर हियरचा गजर करतात. खुशालराव घाई घाईनें तें पद उतरून गंधर्व कंपनीकडे पाठवून देतात व मंडळी चहा घेतात. चहा पान झाल्यावर पुस्तकाच्या दुसऱ्या पानाला सुरुवात झाली. खुशालराव ' सकल धनातुनि निवडुनि रत्ना ' हें पद म्हणत असतांना मंडळी खूष झाली नाहींत, किंवा कोणाला ठसकाही लागला नाहीं. मार्मिकराव मात्र मध्येंच " प्रिंटर्स डेव्हिल " म्हणून ओरडून ' बिवडुनि ' च्या ऐवजीं " निवडुनी " घाला असें म्हणाले व त्याप्रमाणें दुरुस्ती झाल्यावर ' चटक चांदणी जणु येत ' या पदाला सुरुवात झाली.

**मार्मिकराव**:—( माना डोलावीत ) शाबास शाबास ! सूत्रधारबुवा बरंच गोड गातात !

**खुशालराव**:—अहो हें पद नटीचें आहे. सूत्रधाराचें नाहीं.

**मार्मिकराव**:—काय ? ( नीट पाहून ) अरे खरंच ! ' मी रुचिर शृंगार करुनि येत ' असे ही नटी म्हणते अं ! शाबास ग नटवी !

'आत्मस्तुती करीतो एक मूर्ख.' असली ही मूर्ख नटी दाखविण्यांत कवीचा काय उद्देश ! मला खरोखर वाटलं कीं, भरपूर दागदागिने घालून येत असलेल्या नटीला पाहून सूत्रधार किंवा नटीची एखादी सखी हें पद म्हणत असावी. "चटक चांदणी जणु नटुनि थटुनि येतही रुचिर शृंगार करूनि" वगैरें पण पहातो तों ही नटी एखाद्या ऋतूचें किंवा मयसभेचें किंवा द्यूतक्रीडेचे वर्णन करावयाचे टाकून आपल्याच भोंवतीं दिवे ओंवाळीत प्रवेश करते ! वाहावा !! "माझा शृंगार असा आहे तस्सा आहे, माझी रुप्याची वपु आहे माझं सोन्याचं फुल आहे मला एकवीस नखं आहेत !" अहो आहे काय ?

( हा भडिमार झाल्यावर नटी हा शब्द काढून नटीची दासी हें पद ह्मणत येते व 'येत मी' याच्या ऐवजीं 'येत ही' अशी सुधारणाकरून व पद सुरू असतां नटी प्रवेश करते, अशी दुरुस्ती खुशालराव करतात व पुढें वाचतातः—

" **सूत्रधारः**—जुगारांत तर तुझ्या हातीं नाहींना आलीं ?"

**नटीः**—मी आपल्याशिवाय कोणाशीं जुगार खेळलें आहे काय ?

**गद्यगदाधरः**—नशीबच या सूत्रधाराचें ! ही जुगारी नटी बरीच विनयशील दिसते.

( खुशालराव पुढें वाचतो )

**गद्यगदाधरः**—शाबास कवीराज ! काय नटींचं चित्र उठवलं आहे ! ही आपलीच स्तुती करीत प्रवेश करणारी नटी आपल्या नवऱ्याशिवाय दुसऱ्या कोणाबरोबर जुगार खेळत नाहीं पण नवऱ्याला दुर्दैवी म्हणते " अडलं आहे खेटर महालक्ष्मीचं तुमच्या सारख्या दुर्दैव्यांच्या मागं लागून यायला ! मी अशी जाते आणि [ गोद्रेज सेफमध्यें ] हे दागिनें काढून ठेवते " ! असली ही मूर्ख बेपरवाई नटी दाखविण्यांत कवीनें कविकार्य किंवा नाट्यकार्य काय साधलें ! लक्ष्मीचें हें चित्र म्हणावं तर 'सुखवीत सकल—विमल—अशी कमला—लक्ष्मी असें तर

वर्णन सुरवातलिाच आहे. द्रौपदीच्या चारित्र्याची छाया म्हणावी तर~

**भारताचार्य**:---महाभारत जाळून टाकावं लागेल.

**अमरख्या**:---आतां मी अमर बोलते.

संपत्ति श्रीश्च लक्ष्मीश्च । लक्ष्मी पद्मालया पद्मा ।

कमला श्रीहरिप्रिया । इंदिरा लोकमता मा क्षिरोदतनया रमा ।

हें नसेल जमत तर आणखी घ्या

योग्यमृद्धिः सिद्धी लक्ष्म्यौ चत्वारि ऋद्धि नामकस्य ओषधी विशेषस्य.

**खुशालराव**:---अहो म्हणजे काय ?

**मार्मिकराव**:---केवणी मुरुडशेंग इतिचं ख्यातम् ॥ बरोबर आहे ही नटी म्हणजे मुरुड शेंगेचं चित्र असलं पाहिजे. मुरुडशेंग ! आतां प्रकाश पडला ॥ मुरडलेली शेंग---मुरुडा जिच्या अंगांत भिनून राहिलं आहे अशी शेंग ती मुरुड शेंग अशी कोण ? तर ही लक्ष्मीचें छाया-चित्र दाखविणारी नटी ! शाबास ! !

**खुशालराव**:---( वाईट तोंड करून पुढें वाचतात. )

‘ **सूत्रधार**:---“ तुला दागिन्यांनीं पाहून नटवर्ग माझा द्वेष करील. मयसभा पाहून कौरवेश्वर जसा मत्सरानें पेटला आहे ” इत्यादि.

**पद**

“ मयविरचित दिव्य सभा । अवनिवरी नव शोभा । ”

“ नागविता दुःशासन ठाइ ठाइ अघम उभा ॥ ”

**रसगंगाधर**:---पुढील कथानकाचा संदर्भ कसा तरी ओढून आणला आहे, “ नटवर्गाचा मत्सर कौरवेश्वराचा मत्सर ! ” वा ! काय साधर्म्य आहे ! पुढील कथानकांत व या प्रस्तावनेंत मत्सर शब्दाशिवाय दुसरा कांहींच दुवा नाहीं.

**शीघ्रकवी**:---या पेक्षां नटीचा नाचरेपणा, जुगारीपणा, नवऱ्याशीं उडवलेला “ खेटरपणा, ” या साऱ्या अप्रस्तूत निरपेक्ष अचरटपणाला

चाट देऊन सूत्रधारानें सुरवातीला एक साधें लक्ष्मीचा चंचलपणा दाखविणारें पद म्हणावें व मग नटीनें मोठा थाटमाट करून यावें. तिचा थाटमाट पाहून सूत्रधरानें खूष होऊन अलंकारिक भाषेत तिच्या लावण्याची स्तुति करावी. ही स्तुति द्व्यर्थी असावी. एक अर्थ नटीला उद्देशून असावा व दुसऱ्या अर्थांत पांडवांच्या मयसभेचें वर्णन, असावें हें पद ऐकून दुर्योधनानें ' पांडवांच्या मयसभेचें वर्णन, कोण हा दुष्ट इतक्या दिमाखानें करीत आहे " असें संतापून म्हणत यावें हा संताप पाहून सूत्रधारानें " प्रिये हा पाहिलास का मत्सरानें पेटलेला कौरवेश्वर माझ्या शब्दांचा अर्थ भलताच समजून संतापून इकडेच येत आहे, तर आतां आपण इकडून निघून जाऊं वगैरे वगैरे म्हणत " या जोडप्यानें दुसऱ्याच्या वाटेनें निघून जावें. हा विष्कंभक साधा पण खुबीदार झाला असता ( सर्व मंडळी शीघ्रकवीची पाठ थोपटतात )

**खुशालराव**:---असें दोन अर्थांचें पद करणें सोपें काम नाहीं. चालले टीका करायला ! !

**शीघ्रकवी**:—निरपेक्ष बुद्धीनें काव्यवाङ्मयाची जे सेवा करतील त्यांना असले पद सहज करतां येईल. नटवर्गाच्या जिवावर कविश्रेष्ठ होऊं पहाणाऱ्या नाटककारांचें हें काम नाहीं. त्याला खरी तपश्चर्याच पाहिजे. तुम्हाला तसलें पद हवें असेल तर घ्या. हें म्हणा—

" **सूत्रधार**:---[ दागिन्यांनीं सजलेल्या नटीस पाहून ] वाहवा ! ही तुझी अलंकाररचनेची शैली पाहून मी तर आश्चर्यचकित झालों आहे. तुझ्या नैसर्गिक लावण्याचें वर्णन आधीं करावें कीं या भूषणांच्या चमत्कारांचें वर्णन आधीं करावें हेंच समजत नाहीं ! !

**पद.**

[ मय विरचित दिव्य सभा ] ही चाल

अतुल रत्नमय-रचना भूषवीत या भुवना।

ठायिं स्फटिक ठायिं कनक विभ्रमकरि या नयना ॥ अतु० ॥

पाणि नसुनि पाणि दिसत पाण्याविण कमल फुलत ।
कमल नसुनि भ्रमरि डुलत विभ्रम करि या नयना ॥ अतु० ॥
[ पडद्यांत दुर्योधन ]– [ संतापानें ] " अतुल रत्न !
मयरचना अतुल रत्न ॥ भुवना भूषवीत "

पांडवांच्या मयसभेचें वर्णन कोण हा दुष्ट इतक्या दिमाखानें करीत आहे ?

" **सूत्रधारः**––प्रिये हा पाहिलास पांडवांच्या वैभवानें मत्सरग्रस्त झालेला अन्धपुत्र माझ्या म्हणण्याचा दुसराच अर्थ करून संतापून इकडे येत आहे तर आतां आपण या वेळेस त्याच्या दृष्टीस न पडतां दुसऱ्याच वाटेनें निघून जाऊं ( दोघे जातात )" ह्या हा प्रवेश लिहून !! [ सर्व कुठारक्लब टाळ्यांच्या गजरानें दणाणून जातो आणि खुशालरावांच्या नाकाला मिरच्यांची धुरी लागून त्यांचा जिव घाबरा होतो. ]
[ अंक १ पान ४ ते २४ स्थळ मयसभेंतील द्रौपदीस्वयंवराच्या चित्राचा महाल. दुर्योधन व शकुनी पांडवांची मयसभा पहात येतात. नंतर द्रौपदी प्रवेश करते दुर्योधनाचें डोकें भिंतीला आपटतें. द्रौपदीचे उद्गार–द्रौपदीच्या स्वयंवराच्या चित्रावर दुर्योधन गदा उगारून धांवतो. कृत्रिम हौदांत पडतो-- भीम येतो---दुर्योधन व शकुनी यांचे पाय हौदांतील यंत्रांत अडकतात. भानुमति येते–दुःशासन येतो---भीम त्याला पाण्यांत टाकतो. कर्ण येतो अर्जुन व द्रौपदी येतात धर्म व मयासूर येतात. दुर्योधनादिकांना हौदांतून काढतात. अग्रपूजेचा तंटा---युद्धाचें आव्हान. ] रा. खुशालरावांनीं वर दिल्याप्रमाणें पहिल्या अंकाचा सारांश मंडळीना सांगितला व नंतर वाचनाला सुरवात झाली.

पान ४ दुर्योधनाचें भाषण "......मामा, मी मयसभेत नसून ही सभा म्हणजे मला जिवंतपणीं उभा जाळण्याकरितां रचलेली चिता आहे असें मला वाटतें. मी आपणाशीं बोलतों आहे खरा पण जिव्हा आंतून जळत आहे. पहिलवानासारखा उभा आहे पण हातपाय पटके आहेत.

**गद्यगदाधरः**---या भाषणांतील पहिलें वाक्य मराठी पहिली इयत्ता शिकणाऱ्या एखाद्या मुलानें लिहीलें आहे कीं काय असें वाटतें. ' मी मयसभेंत नसून ' इतकें वाचल्यावर पुढें ' मी मसणांत आहे किंवा पेटलेल्या चितेंत उभा आहे ' असें वाक्य लगेच असेल अशी अपेक्षा उत्पन्न होते. पण त्या ऐवजी " ही चिता आहे " असें भलतेंच वाक्य घातलें आहे.

**शीघ्रकवीः**---' ही मयसभा नसून माझ्या भोंवतीं कुणी चिताच पेटविली आहे ' असें वाक्य घाला [ खुशालराव तसें करतात ]

**गद्यगदाधरः**---दुर्योधनाचें हें सारे भाषण व ' तनुला जाळीं ' आग-भडकली, रिपु ठरला जगांत पहिला, सुखांत सुरसम अरिसम लोळी कौरव आला दुसरा ठरला......वगैरे..." हें सर्व एखाद्या नवशिक्या नाट्ककाराप्रमाणें कांहीं तरी असंबद्ध गद्याची रचना दिसते. " पंचशर गद्यवरांना " हें समजावयास पाहिजे कीं, कोणत्याही पात्रानें आपली विशिष्ट अवस्था [ शारिरीक किंवा मानसिक ] पुष्कळसे हातवारे करून किंवा ताणा मारून रंगभूमिवर वर्णन करीत बसणें हा अत्यंत अनिष्ट प्रकार असून तो सदोष आहे. आत्मवर्णनपर प्रवेश केव्हांही प्रेक्षकांच्या मनांत इच्छित रस उत्पन्न करूं शकत नाहीं. पांडवांची मयसभा पाहून दुर्योधनाचा तडफडाट कसा झाला हें पहायला प्रेक्षक वर्ग आतुर असतो. ' माझा तडफडाट कसा होत आहे ऐकाहो सावधान ' असा अर्थ पूर्वीरागासारख्या गंभीर रागाच्या स्वरांदोलनांतून सावकाश ऐका-यला प्रेक्षक वर्ग मुळींच तयार नसतो.

**शीघ्रकवीः**---( उठून ) " आगलागो या पांडवांच्या मयसभेला मामा, ही मयसभा नसून माझ्या भोंवतीं पेटलेली चिता आहे ! हें सुवर्णाचे रत्नजडित खांब पहा त्यांच्या रत्नांची व इंद्रनिल मण्यांची प्रतिबिंबें छतावर लखलखाट करित आहेत, मामा, हा त्या प्रतिबिंबांचा लखल-खाट नसून या खांबांतून अग्नीच्या ठिणग्या बाहेर पडत आहेत कीं काय

असें मला वाटतें ! या कारंज्यांतून निघणारे उदकाचे शुभ्र तुषार या चितेवर तुपाच्या आहुतींची संततधार कुणी धरली आहे कीं काय असा मला भास होतो ! हा हिमालयाचा कृत्रिम देखावा पहा ! हें दाट धुकें नसून हा प्रत्यक्ष धूर आहे ! हीं पहा रत्नांचीं कमळें, रत्नांचेच देठ, आणि रत्नांचीं पत्रें ! ऑं ! मामा हीं कमळें नसून हे विस्तवाचे लोळ उठले आहेत ! ! या सभेंत नाचणाऱ्या नर्तकींचे मधुर आलाप ! अहो कसले मधुर आलाप---घेऊन बसलांत ! चितेंत जळणाऱ्या लाकडांचे कडाकड आवाज निघतात तेच हे आवाज ! मामा ही मयसभा नसून माझ्या सुखाला—माझ्या शांततेला जाळून राख कर-णारी मोठी थोरली चिताच या दुष्ट पांडवांनीं पेटविली आहे कीं काय असे मला खात्रीनें वाटतें ! ! ”

**गद्यगदाधर**:----[ शघ्रिकवीची पाठ थोपटून ]

शाबास ! हें किंवा अशा थाटाचें भाषण दुर्योधनाच्या तोंडीं जरूर हवें होतें. यांत पांडवांच्या वैभवाचें वर्णन आपोआप होऊन दुर्यो-धनाच्या मत्सरानें कसा पेट घेतला आहे, ही ही मौज प्रेक्षकांस सहज दिसली असती. [ खुशालराव मुळचें भाषण खोडून त्या ऐवजी वरील भाषण घालतात व पुढील पदाला सुरवात होते. ]

‘ तनुला जाळी आग भडकली ’

**रागोपंत**:---हें पद पूर्वी रागांतील आहे, पूर्वी राग हिंडोल रागाची उपरागिणी आणि या नात्यानें विचार केला तर पूर्वी हा राग वसंत ऋतूंत दोन प्रहरानंतर व शुभ प्रसंगी गावा व त्या गायनांतील अभिप्राय शृंगारविलासादिचेष्टामय असावा. पूर्वी रागाचे सूरच तसे आहेत. दुर्योधनाचा संताप व्यक्त करण्याकरितां पूर्वी रागांतील त्रिवट तालावरील चीज पसंत करणें म्हणजे कांग्रेसमधील सत्यमूर्तीचें भाषण सुरू असतां पुण्याचे पर्वतीवरील सायंकाळच्या मंजूळ सनईची साथ त्या भाषणाला देण्यासारखें आहे. हिंडोल रागांत शृंगाराबरोबर वीररसाची उत्पत्ती सांगि

तली आहे तर पूर्वीपेक्षां हिंडोल रागांतला एखादा झंपा या ठिकाणीं युक्त दिसला असता. किंवा त्या ठिकाणीं पद न घालतां, गद्यच ठेवलें असतें तर मत्सर व द्वेष या भावनांनीं भरलेल्या भाषणाचा शेवट गोड-स्वरांत होऊन जो विरस होतो तो झाला नसता.

( खुशालराव घाईनें पद पुरें करतात. )

रिपु ठरला जगांत पहिला
कौरव आला दुसरा ठरला
' कुरुबल दुर्बल बोलत अबला '

**मार्मिकराव**:----

' शकुनी आला हौदांत पड्ला
तिसरा आला तिथें हपटला
बललललललल बोलबाला '

उदे उदे चांगभले चांगभले चांगभले [ चिरूट पेटवतो ]

**खुशालराव**:—( त्याला गच्च धरून ) अहो हें मांडले आहे तरी काय ? पद नीट तर ऐका ' सुखांत सुरसम अरि मम लोळी '

**मार्मिकराव**:---[ दिवाणखान्याभर लोळत ] अहो सुखांत देवेंद्रा-सारखीं लोळीं घेत आहे लोळी......मम अरि सुखांत सुरसम लोळी ......लोळी म्हणजे लोळे......मम अरि लोळे...पण मग पुढें ' रचिली आहे होळी होळींत लोळे जमेना । लोळी करी लोळणा ।।

**रसगंगाधर**:—बल हा एकच शब्द एकाच अर्थी अनेकदां वापरणें हें भाषाप्रभुत्व नसून शब्ददारिद्र्याचें लक्षण आहे.

**श्री रंगवर्मे**:---द्रौपदीस्वयंवराचें चित्र फारच नामी आहे. हें चित्र व मयसभेचा देखावा व बुईंगज् वरील चित्रें ही सर्व उत्कृष्ट साधली असून पुरातन कालाच्या बांधकामाची माहिती देतात व आपण क्षणभर प्राचीन इंद्रप्रस्थ नगरींत आलों आहों असा भास होतो. व त्याबद्दल मी गंधर्व कंपनींतील पेंटरला चांगलें मार्क देतों.

[ खुशालराव सावकाश व ठसका न लागतां एक फुलपात्रभर पाणी पितात व पुढें वाचूं लागतात ]

( नंतर पान ५ ला सुरवात झाली )

" **शकुनीः**—सुयोधना तूं पेटतो आहेस " वगैरे वगैरे...

" माझ्या बाहिणीचा गर्भाशय त्यानें नाहक विटाळला !!... "

**अभिनयरावः**—शकुनीच्या पात्रानें इतकी आदळआपट व शंखध्वनी करण्याचें कारण नाहीं. दुष्टत्वाचीं आणि कपटाची प्रखरता जितकी अधिक तितकी अधिक मृदुता त्या त्या व्यक्तींच्या अभिनयांत दिसून यावी. शकुनी म्हणजे एक दुष्ट कपटी कपटजुगारांत अतिप्रख्यात मानभावी राजा होता. तो पांडवांना पाण्यांत पहाणारा व दुर्योधनादिकांच्या कुत्सित मतलबांना प्रोत्साहन देणारा होता. या त्याच्या दुष्ट कपटपूर्ण चारित्र्य-चित्राला उत्तम छायापट ( Back Ground ) म्हणजे मुद्दाम खोटें हंसणें हाच कोणी कमलांचा फुलबाग, पावलें न वाजवितां चालणें हेंच त्या वनश्रीचें मूक गायन, हांजी हांजीखोरपणाचें गोड मतलबी शब्द हाच मधुर-पक्षीरव असा हा अभिनयरूपी वनाचा छाया-पट त्या चित्रामागें हवा होता. अयागो, रिचर्ड दि थर्ड, शायलॉक यांची चरित्रें ज्या खुबीनें रेखाटलीं गेलीं आहेत त्या चातुर्यानें शकुनी मामाचें चित्र दाखवावयाला पाहिजे. त्यानें हळूच पण मोठ्या खुबीदार भाषणानें पांडवांच्या मयसभेच्या शोभेचें वर्णन वरपांगी करावें. त्यानें जों जों स्तुती करावी तों तों इकडे दुर्योधनाचा संताप, त्वेष व मत्सर हीं वाढत जावी. दुर्योधनाचा हा तडफडाट पाहून शकुनीनें स्वतःशीं आनंद मानावा अशी या प्रवेशाची रचना असती तर भारतकारांनीं जें शकुनीचें चित्र दाखविलें आहे त्याला धरून झालें असतें व त्यांत ज्यास्त कौशल्य दिसून आलें असतें. आतां त्याचे अशा पात्राचें खाडिलकरी भाषण पहा !

" माझ्या बहीणीनें निःसत्व मुलाला जन्म दिला कुरूंच्या कुळांत ' शिळपटदास ' जन्माला येऊन माझ्या बहिणीचा ' गर्भाशय त्यानें

नाहक ' विटाळला '
( मार्मिकराव असलं हिडीस गद्य भाषण ऐकून भडभड ओकून गर्भ-गळीत होतो ) " अंधळे ! आम्हीं अंधळे " ! ! " शाबास सुयोधना शाबास ! ! "

[ भीमास उद्देशून ] ' हें आमचें शेवटचें रडणें आहे तेव्हां भर-पूर रडून घेतों. तुमचेंही हंसणें शेवटचें आहे, तेव्हां तुम्हीही भरपूर हसून घ्या '
' टाका आम्हाला मारून टाका. '

' गांवढळ ! कोठून समजणार ' !

' किती वेळ मी भणभण फिरूं !

[ इकडे मार्मिकराव—ए बयाग तळपट होवो मेल्याचें--असें विव-ळत स्वतःच्या हातांत बांगड्या भरून घेतो. ]

' कांहीं युक्ती सुचत नाहीं '

[ पुढें काक तालीय न्यायानें शकुनीची व अक्षपालाची गांठ पडते. शकुनीला जरासंधाच्या हाडांचे फासे आयतेच आपोआप मिळतात व मग त्या आयत्या मिळालेल्या सामुग्रीवर--स्वतःचें चातुर्य, कपट किंवा शौर्य कांहीं एक खर्ची न घालतां—मिळालेल्या फाशांच्या जोरावर ही शकुनी मामांची स्वारी पांडवांना जिंकते. ]

खाडीलकरी वर दिलेली भाषणें व कृती करणारा हा शिळपट शकुनी म्हणजे महाभारतांतला शकुनीमामा असें जर या नाट्यवरांना वाटत असेल तर त्यांनीं महाभारत मुळींच वाचलं तरी नसावें किंवा वाचून त्यांतील स्वभावनिरीक्षणाचें मर्म त्यांना मुळींच समजलें नाहीं असें मला म्हणावें लागतें.

**अभिनयराव**:—दुसरा दोष असा. त्यांचें कोणतेंहीं पात्र घ्या. विचार आचार एक ! बोलण्याची पद्धत एक ! ! तेच विचार, तोच आडदांडपणा, तीच अरेरावी, तीच इमरी तुमरी ! आहे तरी काय !

दुर्योधन आला, लागला ओरडायला ! शकुनी आला, लागला पाय आपटायला ! द्रौपदी आली, लागली दंड थोपटायला ! दुःशासन व भीम तर लोळकंडच घेत प्रवेश करतात. कर्ण तसाच, अक्षपाल तसाच त्याच्या बायका तशाच ! त्याचा आठ वर्षांचा मुलगा ! तसाच हीं सर्व निरनिराळीं पात्रें बोलत नसून एकच कुणी नांगरगळ्या बोलत आहे असें वाटतें. यावरून या नाट्यवरांना विविध स्वभाव-दर्शन-कला कशाशी खातात, हें मुळींच समजत नाहीं ही गोष्ट सिद्ध होते. ऐतिहासिक व पौराणिक पात्रें प्रेक्षकांच्या अगोदरच माहितीची असल्यामुळें खाडिलकरांची स्वभावरंगकलेची ही घोड्याएवढीं चूक तेव्हांच लक्षांत येते. यावरून शकुनीमामांचें पात्र अजिबात काढून शीघ्रकवीकडे दुरुस्तीला पाठवावें अशी मी सूचना करतों.

**मार्मिकराव**:—"( भण भण भण भण " ) फिरत त्या सूचनेला अनुमोदन देतो. )

**खुशालराव**:–(स्वतःचा कान पिळीत पुढें वाचतात. ) " भानुमती:—ह्या ह्या द्रौपदी महाराणी साहेब ! "

**गद्यगदाधर**:–वा ग भानुमती ! भानुमती, व द्रौपदी बरोबरीच्या जावा. वडील घराणें या नात्यानें पाहिलें तर भानुमती वडील जाऊ ठरते. तिनें कारण नसतां सहज आपल्या धाकट्या जावेला " द्रौपदी महाराणीसाहेब " असें म्हणणें म्हणजे भानुमती अर्धवट वेडी असावी किंवा शकुनीपेक्षां ही अधिक लबाड असावी व नवऱ्याच्या मनांत द्रौपदीविषयीं द्वेष उत्पन्न व्हावा अशा उद्देशानें तिनें द्रौपदीला महाराणीसाहेब असें खोचून म्हटलें असावें अशी शंका येते; पण पुढें भानुमतीकडे पाहिलें म्हणजे या दोन्ही शंका व्यर्थ ठरून ती एक साधी बाई, नवऱ्यावर प्रेम करणारी, युद्ध प्रसंग टाळणारी, अशी एक आळणी व कोमट स्वभावाची स्त्री आहे असें ठरतें तेव्हां या जागीं तिच्या तोंडीं ' महाराणी साहेब ' असें द्रौपदीला उद्देशून घातलेलें

वाक्य अगदींच चुकीचें आहे.

**शीघ्रकवी**:–हेंच वाक्य शकुनीच्या तोंडांत घाला म्हणजे तंटा मिटला. लिहून घ्या:–( खुशालराव पाटीपेन्सल घेऊन वाचतो )

**शकुनी**:—( दुर्योधनाला उद्देशून ) पृथ्वी दिग्विजय करणारे ते पांडव! तूं त्यांचा विश्वासू खजिनदार! अरे तिकडे कुठें चाललास! इकडे येऊन हें द्रौपदीस्वयंवराचें अद्भुत चित्र पहा! अहाहा चित्रकाराची काय कुशलता आहे. काय या द्रौपदीचें हें दिव्य लावण्य. काय हा अर्जुनाचा पराक्रम! द्रौपदी महाराणीसाहेबांची:—

**दुर्योधन**:–चूप! मामा! खबरदार अधिक बोलाल तर! महाराणीसाहेब! द्रौपदी महाराणी साहेब!! ( दांत ओंठ खातो ) वगैरे वगैरे. घ्या लिहून

( सर्व टाळ्या वाजवितात. )

( खुशालराव गुलकंदे घावरे होऊन पंख्यानें वारा घेतात वरील नवीन भाषणें गंधर्व कंपनीकडे पाठवून देतात.

पान ६ द्रौपदीचा प्रवेश

**द्रौपदी**::–" खरोखरीच बरें झालें असतें. खुशाल ठेवा डोळे मिटून· आंधळ्याचे चिरंजीव डोळसपणाचा कोण दिमाख. मला पाहातांच खालीं मान घातली पाहिजे. महाराणीचें वैभव पाहाण्याची ताकद अंध पुत्राचें अंगीं कोठून असणारच !

**मार्मिकराव**:---( पुढें वाचतो ) ' मिशावर ताव देत उभी रहाते '!!!

**खुशालराव**:--- [ मिशा काढून पुढें वाचतो ]

" त्या हौदांत उडी घेऊन खुशाल थंड व्हा! अंधपुत्र अंधपुत्र भानुमतीसाहेब अंधळ्याना हा दरवाजा दाखवा!! जा शरमूं नका, बायको मागून जा.

**भारताचार्य**:---( खुशालरावांच्या डोक्यांत महाभारत घालून )

अहो ही द्रौपदी आहे ? कां हिडिंबा आहे ? का शूर्पणखा-आहे ? का पूतना आहे ? आहे तरी कोण ?

**खुशालराव**:----[ गुलकंदाचा लड्डा तोंडांत कोंबून ] अहो ही द्रौपदी आहे. द्रौपदी आली कीं टाळ्या पडतात महाराज- टाळ्या ! ! आहांत कोठें !

**भारताचार्य**:---टाळ्या पडतात त्या बालगंधर्वांच्या भूमिकेला पडतात, खाडिलकरांच्या द्रौपदीला नाहीं; समजलात ! दुर्योधनाचे अगोदरचें कितीही अपराध व दुष्ट कृती असल्या तरी हस्तिनापुरचा तो पांडवांच्या बरोबरीचा राजा--पांडवांचा चुलतभाऊ--द्रौपदीचा चुलत वडील दीर-पांडवांनीं बोलिवलेला पाव्हणा होता. तो पांडवांची मयसभा पहातो व मत्सरग्रस्त होऊन डोळे मिटून उभा राहातो हाच त्याचा इतक्या वेळ पर्यंतचा अपराध आणि या त्याच्या क्षुद्र कृतीनें द्रौपदी सारख्या कुलस्त्रीनें शकुनी मामंजी व भानुमतीजाऊ यांच्या समक्ष आपल्या वडील दिराच्या तोंडावर असें उर्मटपणाचे शब्द उच्चारावे ! स्वतःला महाराज्ञी म्हणत छातीवर हात मारून घ्यावा ! वडील दीर चांगला डोळस असतां त्याला त्याच्या तोंडावर आंधळा म्हणून त्याची निष्कारण निंदा करावी ! अशी ही बेफामपणानें सुरवात करणारी खाडीलकरी द्रौपदी खात्रीनें त्यावेळीं तरी दारू प्यालेली असली पाहिंजे.

**माभिकराव**:--मुळींच नाहीं. अहो परवा आमच्या घरीं अगदीं हा फार्स उडाला आमच्या वडील बंधूचा व माझा वांटणीचा तंटा हायकोर्टापर्यंत जाऊन जेमतेम मिटला. मग पुढें चार महिन्यांनीं आमच्या घरीं कांहीं समारंभ निघाला. रीतिप्रमाणें आम्हीं वडील बंधूंना, त्यांच्या कुटुंबांना आमंत्रण दिलं. ती सारी मंडळी लांबच्या गांवाहून आली. अंगणांत केळ्याच्या सालीवरून आमच्या बंधूचा पाय निसरला ते हापटले. मी धांवत जाणार तोंच माझ्या अगोदर आमचें जहाल कुटुंब, हातांत केरसुणी घेऊन " लाज नाहीं वाटत अशी लोळकंड

घ्यायला, आंधळे नाहीं तर ! " इत्यादि म्हणत त्यांना—माझ्या भावाला तिच्या वडील दिराला खुशाल बडवीत सुटलें !! मी रा. खाडीलकरांच्या द्रौपदीचें स्मरण करीत स्वस्थ उभा राहिलों ! ! करतां काय ?

**बाबुरावलट्टे**:—काय करणार बाबा ? पुरुषी बायकांचा हा काळ आहे ! ! !

**भारताचार्य**:—आणि द्रौपदीच्या या साऱ्या गर्विष्ठ, उन्मत्त, बेशरमपणाच्या वर्तनाला आधार काय ? तर मूळ महाभारतात दुर्योधनाची मयसभेंत उडालेली फजिती पाहून द्रौपदी सख्यांसह त्याच्या तोंडावर हंसली, असें सुद्धां नाहीं. ती हंसली हेंमात्र दुर्योधनानें पाहिलें व तो अधिकच खजील झाला या पराचा कावळा करून या कवीनीं त्याची इतकी काव काव सबंध पहिल्या अंकभर केली आहे कीं, द्रौपदी निर्माण करणारे भारतकार जर आज या नाटकाला येतलि तर द्रौपदीच्या दोन श्रीमुखांत लगावून एका मिनिटांत तिला ताळ्यावर आणतील. आपले पराक्रमी नवरे दास होऊन नम्रअवस्थेंत भर सभेंत बसले आहेत व प्रत्यक्ष आपल्या निरीला हात दुःशासन घालीत आहे अशा दुर्धर प्रसंगीं सुद्धां ज्या साध्वीनं विनय सोडला नाहीं, प्रसंगावधान ढळूं दिलं नाहीं, व ' दुष्ट कपटी ' या शब्दापलीकडे जिच्या मुखांतून अपशब्द सुद्धां निघाला नाहीं तिला फरफर ओढीत आणीत असतां ही जी धृतराष्ट्रादी वडील माणसांना वंदन करायला चुकली नाहीं अशी शांत व गंभीर कुलवधू-मी ' जिता कीं आजिता ' या एकच प्रश्नानें जिनें भीष्म द्रोण विदुरादिकांनाही आश्चर्य चकित करून सोडलें अशी ती परम चतुर साध्वी द्रौपदी-आपल्या घरीं बोलावलेल्या पाव्हण्या दिराचा असा उपमर्द करील काय ? अगोदर स्त्री जात, त्यांतून प्राचीन आर्य स्त्री, त्यांतून द्रौपदी, या द्रौपदीची जर अशा उन्मत्तपणांत, अभिमानात, ताठ्यांत गर्विष्ठपणांत सुरवात केली तर शेवटीं प्रत्यक्ष वस्त्रहरणप्रसंगीं तिनें

सायनच्या ( Sion ) कोळणीसारखा कांचा मारून दुःशासनीबरोबर कुस्तीच खेळायला पाहिजे ! !

**खुशालराव**:—तें कांहीं असले तरी खाडिलकरांच्या प्रत्येक पात्राचा प्रथम प्रवेश मोठ्या जोराचा, सणसणीत व चटकदार असतो.

**भारताचार्य**:—प्रथम प्रवेश चटकदार असतील पण या चटक्यामुळें त्या त्या पात्रांच्या ( तीं पौराणिक व लोकांच्या परिचयाची असल्यामुळें ) अस्सल चारित्र्याला जर डाग लागत असला तर काय उपयोग ? स्वकपोलकल्पित पात्रें निर्माण करावीत व मग तीं वाटेल तशी रंगवली तर त्याला आमची ना नाहीं. मुंबईतील एखाद्या फटाकड्या हुषार स्त्रीच्या तोंडी असली भाषा एखादे वेळीं शोभेल, पण द्रौपदीच्या तोंडी असली भाषा म्हणजे ' रामशास्त्री प्रभुणेः— " आईमाई वरून " शिव्या हांसडीत प्रवेश करतात असें घातलें तर तें जितपत श्रेयस्कर होईल तितकेंच हें होईल.

( हा वर्षाव झाल्यावर द्रौपदीचा प्रथम प्रवेश कातरून काढतात व शिम्रकवीकडे रिपेअर साठीं पाठवून देतात. )

**पान ७** द्रौपदी.....असें शरमूं नका जा बायको मागून जा... अंधळे ते अंधळे "

**भारताचार्य**:—शाबास ग द्रौपदी, अग " सर्वांच्या मागून निजावयास जाण व सर्वांच्या आधीं उठणें हा तुझा परिपाठ ! अगदीं धनगर आणि गुराखी या पर्यंत, कोणी काय केलें व कोणाचें करावयाचें राहिलें काय ? हें ध्यानांत आणण्याइतकी तुझी विचारपूस " ! ! आणि आतां तुझ्या वडील दिराला अंधळे अंधळें म्हणून हुसकावून लावतेस ? तूं " अंतःकरणाची कोमल, सर्व गुणांनी संपन्न, बोलण्यांत अत्यंत मधुर " अशी असतां शिव्या हंसडून घरीं बोलाविल्याची अशी बोळवण करतेस ! शाबास शाबास ! !

**खुशालराव**:—अहो नाटकाला उठाव तर आला पाहिजेना ?

**मार्मिकराव**:—उठाव आणायला दुसरे मार्ग पुष्कळ आहेत. द्रौपदीच्याच डोसक्यावर कशाला ?

**खुशालराव**:—मुळांतली द्रौपदी अगदीं मिळमिळीत ! !

**मार्मिकराव**:—( गंभीर मुद्रेनें व गालफुगवून ) तिचं मोठं तोंडलं होतं ! उगीच नाहीं स्वयंवरापर्यंत पाळी आली ती !

( खुशालराव नंतर पुढचा द्रौपदीचा प्रवेश वाचतो. )

पद चाल——धीट लंगरवा

......थाट समरींचा दावी नट साचा.........

......हा थयथयाट..................

**मार्मिकराव**:——वारे ! लाट साहेब ! हा तुमचा थाटाचा नटवर नाट्याचा थयथयाट पाहून नाट्याचा किती घाट घातला, नाटकांचा पाट काढला तरी कोणती नाट्यदेवी नाट न लावतां चाट होऊन जाणार नाहीं ?

**खुशालराव**:——अहो मुळच्या पदाचा थाट तसाच आहे. या कवीची विशेष खुमारी ती ही आहे कीं, मूळ चीज असेल तशी वठ-वावयाची. ! !

**मार्मिकराव**:——नच वठली तरी तिची मुळी गाणारांच्या जिभे-वर उगाळून तिच्यांतला सारा रस शब्दांसुद्धां त्यांच्या घशाखालीं उतरायाचा ! ! हें एक कुंभाररसायन आहे ! कुंभाराप्रमाणें शब्दांच्या विटा त्या त्या विटाळ्यांत कोंबीत चालले आहेत. परवां काय झालें ' धनराशी मुढापाशीं ' या पदाचा अंतरा चालला असतांना ' सुखवी तुला दुखवी मला ' या शब्दाऐवजीं ' सुखलेगयो दुखलेगयो ' असे हुबेहुब शब्द कोणी उत्तम गाणारीण, एखाद्या मजसलमध्यें म्हणत आहे कीं काय असा हुबेहुब मला भास झाला. मी चटकन खिशांत हात घालून चवली पावलीची दौलत जादा करणार; इतक्यांत वन्समोरचा कडकडाट ऐकून शुद्धीवर आलों !

( ) ( 3२८८ )

पाहातों तों मानापमान नाटक ! !

( आपण खरोखरच झोपेंत आहोंत कीं काय हे पाहाण्याकरितां खुशाल-राव स्वतःला चिमटा घेतो. )

**अर्थभट:**—या पदांत अर्थ-गांभिर्याच्या नांवानें अळंक्षा ! शब्द जरा चटचट वाजतात.

**मार्मिकराव:**—विटांचें थापटणें असेंच वाजतें

**खुशालराव:**—( पुढें द्रौपदीचें भाषण वाचतात. ):— या दुष्टांना मयसभेंत राहूं द्यायचं नाहीं, ' माझ्या ' करतां हा दिग्विजय करण्यांत आला आहे ! ' माझ्या ' मस्तकावर सार्वभौमत्वाचा अभिषेक व्हावा म्हणून राजसूय यज्ञ केला दिग्विजय करणाऱ्यांनीं ' मला ' सर्व जातींत श्रेष्ठ पदाला चढविलें. "

**श्रीयुत चित्रवर्मे:**—वाहवारे द्रौपदी ! काय द्रौपदीची ऐट ? दंड थोपटुन मिशाला पीळ भरून चालली आहे ! ! जोरदार पात्र म्हणावं तर याला ! !

**भारताचार्य:**—महाभारतातील द्रौपदी अशी मुळींच नव्हती या गद्यवरांची ही एक और कल्पना असून तिच्यामुळें द्रौपदी ही एक लढाईखोर पांचट स्त्री होती अशी कल्पना होते ! !

**मार्मिकराव:**—अहो ही पांडवांची करणी द्रौपदीच्या लग्नाच्या वेळींच ठरली होती. अशी करणी कराल तरच तुम्हाला मी ही पडतासि लक्षणी मुलगी देतों, अशी मुळीं द्रुपद राजाची अटच होती. तुम्हाला कुठं माहीत आहे ? ' जें देखे कवी तें न देखे रवी ' ! !

मग तुमच्या सारख्यांची कथा काय महाराज ?

( खुशालराव पुढें पद म्हणतात )

' लाजाविलें वैऱ्यांना इत्यादि '

**रागोपंत:**—( आडवे पडतात )

**खुशालराव:**—काय झालं हो ?

**रागोपंत:**—दुसरं कांहीं नाहीं- प्रवेश पडला ! !

रंग उतरला ! ! हें पद भूप रागातलें विलंबित तालावरचें आहे, म्हणजे ही चीज ठाय आहे. याच्याच मागची चीज याच प्रवेशांतली, व त्याच पात्राच्या तोंडची हमीर त्रिवट आहे ( ' धीट लंगरवा ' या चालीवर) धीट लंगरवा ही चीज जलद लयीची आहे व त्यापुढें ठाय चीज पड-ल्यामुळें या प्रवेशाचा गानदृष्ट्या अगदीं बेरंग झाला. प्रवेश पडला ! त्या पेक्षां प्रथम ' झांझ मंदिरवा ' ही चिज घालून नंतर ' धीट लंगरवा ' ही चीज म्हणा, म्हणजे काय बहार उडते ती पहा.

**खुशालराव**:----बरे तर [ असें म्हणून मूळ चिजा म्हणूं लागतात.]

**शीघ्रकवी**:---अहो मग वेगळीं पदें केली पाहिजेतना ?

**मार्मिकराव**:----कांहीं नको हो ! वेगळीं पदें कसली करीत बसतां ! मूळ चिजा जरी तशाच्या तशाच म्हटल्या तरी कोणी तिकडे लक्ष देत नाहीं. बालगंधर्व गातो आहेना ? पुष्कळ झालं. तुम्ही खुशाल ' धीट लंगरवा ' म्हणा ! ! कोणी विचारलंच ' धीट लंगरवा म्हणजे काय ? तर ' स्वरुप गरुवा ' चा सावत्र भाऊ म्हणून सांगून द्या म्हणजे झालं ! ! !

**खुशालराव**:—[ द्रौपदीचे भाषण पुढें वाचतात ]

" शत्रूंची फजिती कशी होत असेल, हें सुख माझ्या डोळ्यांना, मयसभे, तूं दिलंस ! तूं मला धन्य केलंस ! ! ' लाजविलें वैऱ्यांना उरेना कामना ! सदा आनंद मला !

देखिलें रिपु विडंबना ! !......

तो दुष्ट पुन्हा येथें यावा आणि त्याची फजिती पुन्हां या डोळ्यांनी पहावी असें वाटतें ! ! "

**भारताचार्य**:—माणसें खाणारे जंगली रानटी, क्रूर लोक सुद्धां या खाडीलकरी द्रौपदी पुढें दयाळू दिसतील ! तैमुरलंग, नादिरशहा, अहमदशहा अबदाली, यांच्या कत्तली या भाषणापुढें मवाळ ठरतील ! !

रुप्याच्या भांड्यांत विंचू घालून त्यांतील दक्षिणा ब्राह्मणांनां द्या म्हणून सांगून त्यांना ते विंचू चावले म्हणजे आनंदानें नाचणारा अहिल्याबाईचा व्रात्य मुलगा, या असल्या द्रौपदी पुढे अगदींच गचाळ ठरेल ! !

**मार्मिकराव**:—अहो ती तशीच होती महाराज !

उगचि नाहीं त्या वाचाळ पंचविशी पांचाळीला पांच नवरे कुंतीनें करून दिले ! ! !

**खुशालराव**:— ( विंचू चावल्यासारखें होऊन ओरडत पुढें पद म्हणतात. )

' चित्रा भंगुनी ही गदा, कौरव जन हंसवील गदगदा ! छिन्न भिन्न मग ' माति ' मयकृति ! !

**मार्मिकराव**( उभा राहून जोरानें )

तिकीट प्लीज ! तिकीट ! तिकीट बताव, तिकीट ( सर्वजण खिसे चाचपूं लागतात. ) तिकीट !

**अर्थभट**:—अहो तिकीट कोणाजवळ मागता ? सर्व शब्द पद्य-दृष्ट्या बरे बसले आहेत.

**मार्मिकराव**:—ए ' माती ' तिकीट बताव ये डबा फर्स्टक्लास है चलो निचे उतरो; जाव थर्ड क्लासके डबेमे ! चलो चलो ! '

" गदा " ' मोदें ' " कौरवजन " " गद्गदा " असल्या थोर लोकांशीं हा कोण बिगारी मांडिशीं मांड लावून बसला आहे. ' मातीनें ' केरपोतेरं करायचं सोडून चालली मयसभेची फाजिती करायला !

( ' माति मयकृति ' च्या ऐवजीं ' व्यर्थ मयकृति ' विफल मयकृति इत्यादि सूचना शीघ्रकवींनीं गंधर्व कंपनीकडे पाठविल्यावर मार्मिकराव शांत झाले )

**खुशालराव**:—( घाम पुसून पुढें वाचतात )

[ ' शकुनी दुर्योधन चबुतऱ्याच्या हौदांत पडतात. ' ]

**श्री चित्रवर्मा**:—पाणी आहे कां संगमरवरी दगड आहेत हें ओळखता न येण्याचा चमत्कार मयासुरानें केला होता. म्हणजे खरोखरच्या पाण्याच्या हौदाला चबुतरा नको. खरा पाण्याचा हौद जमिनी सरपटच पाहिजे व त्यांत जलतरंग जणू हेलकावे खात आहेत अशा अस्मानी रंगाची छटा ज्यांत भरून राहिली आहे अशी भोंवताल्ची फरशी पाण्याच्या अगदीं सपाटी बरोबर पाहिजे. असें असलें तरच माणसें फरशी समजून सहजच पाण्यांत पडतील. हौदाच्या चबुतऱ्यावरून उडी मारून दुर्योधन व शकुनी फरशी समजून पाण्यांत पडले, हा अद्भुत चमत्कार त्या मयासुरानें तर नाहींच पण या गद्यासुरांनीं दाखविला म्हणायचा ! ! !

**खुशालराव**:—(एच. बी. च्या पेनसलीनें हौदाच्या चबुतऱ्याचा चुराडा करून हौद जमिनीच्या सपाट करतात व पुढें वाचतात:— )

( भीम व द्रौपदी यांचा संवाद पान ९ )

**द्रौपदी**:—" आंधळ्याशीं लढायला आपली गदा कशाला पाहिजे ? शत्रूचा नाश केल्यावर जें सुख या गदेला होतं तें " सुख भोगण्याचा मान " मला मिळाला आहे ! ! " नाहीं तिज रिपुगण जलांत बुडता दिसला " ( मला दिसला बच्चमजी ! ! )

( **भीम**:—शत्रु पाण्यांत बुडत असतां उसळणाऱ्या लाटांची मौज मी दाखवावी अशी तुझी इच्छा आहेना ? )

**द्रौपदी**:—दुसरी कोणती असणार !

**मार्मिकराव**:—निपुत्रिका अल्पायुषीभव ! ! आई हिडिंबा—माते हेमाडपंथे तुझ्यापुढें हात जोडतो ! जगदंबे कृपाकर ! !

**खुशालराव**:—( त्वेषानें पुढचें पद म्हणतो. ) ' हंसली गदा न कसली फुगली, बसली रुसली. "

**मार्मिकराव**:—खचली मती, न फुलली, रुतली चचली मेली !!

[ खुशालराव तबल्यावर डोकें आपटून पान १० वरील भीमाचे

भाषण जोराने वाचतोः– ]

‘ बोल दुष्टा उद्या कोणाला रखायला लावणार तें ?

( गदा उगारून धांवतो........ )

**भारताचार्यः**––जीते रहो ! असल्या द्रौपदीचा हा अस्वलासारखा भीम नवरा शोभतो खरा ! दुर्योधनाला फसवून हौदात पाडला. हें पाहून द्रौपदीनें चांगले वीसवीस फूट दांत काढले व म्हणून दुर्योधन चिडला आणि हा “ त्याचा घोर अपराध ” सहन न होऊन हे बलभीम आपल्या बायकोचे अधिक प्रिय करण्याकरितां गदा उगारून त्याचंच टाळकं सडकायला निघाले ! शाबासरे भीम ! पंचशरें गद्यवरें कमाल केलीत ! असली द्रौपदी व असला भीम महाभारतांत कांहीं नाहीं ! !

**मार्मिकरावः**—महाभारतांत नसला तर वेताळ--पंचविशींत असेल ! तुम्ही आपलं पुढें वाचा.

**खुशालरावः**—‘ द्रौपदीः—( भीमाला अडवून )

......असला अधर्म राजांना कसा आवडेल ? ’

**मार्मिकरावः**––तर ! अहो तुम्ही या मेल्या दुर्योधनाचें, तो पाण्यांत पडलेला निःशस्त्र असला तरी, डोसकं सडकलंत तर मला आनंद होईल तुम्हालाही होईल-पण तिकडे ते--ते आमचे वरिष्ठ नेभळट यजमान ते धर्मराज ते शंख करितील याची बाट काय ?

**भीमः**––( स्वगत ) इचभन् हा योक यापारच झाला ! !

**खुशालरावः**––( बेफिकीरपणें पुढें वाचतो. )

**पान ११**

**भीमः**—याचें मस्तक मला यावेळीं फोडूं दे.

**द्रौपदीः**—यांना पाण्यांतून बाहेर येऊं दे आणि मग खुशाल गदा युद्ध होऊं दे माझी ना नाहीं.

**मार्मिकरावः**—मेल्या त्यांना पाण्यांतून बाहेर येऊं देस ! मी

परती कशास नाहीं म्हणूं ? रांड्च्या ! !

या भडिमारातून जीव बचावून खुशालरावांनीं ' धर्ममय ही काया ' इत्यादि हें पद सुरूं केलें.

**अर्थभट:**---अर्थ सोपा आहे.

**पदेशास्त्री:**---चाल गोड आहे.

**रसगंगाधर:**---अस्ताईत धर्माचें वर्णन आहे, अंतऱ्यांत कमलेचें वर्णन आहे.

कमला आणि धर्म या एकाच विषयावर सबंद पद्यवर्णन हवें होतें, ' यत्र यत्र धर्मः तत्र तत्र कमला ' असें कचित्च दिसून येतें. वास्तविक तसें दिसून यावें पण इलाज नाहीं. जग हें असें आहे.

**गद्यगदाधर:**---( हातांत कल्हईवाल्याचा लांब चिमटा घेऊन " विजयाच्या " शेजारीं रेलून बसलेला मागासलेल्या जातींपैकीं, ' पाया ' हा शब्द चिमट्यानें हळूच उचलून बाहेर फेकून देतो.

( शीघ्रकवि तो वरचेवर झेलून तपासूं लागतात. )

**अर्थभट:**--जाऊं द्या हो या पद्यांत विशेष अर्थगांभीर्य, चमत्कृति, पदलालित्य कांहींच नाहीं, तें दुरुस्त करून सहारा अरण्यांत विहीर खोदण्याचे श्रम कां घेता ! पुढें चला.

**खुशालराव:**----( डोळे फाडून पुढें वाचतात. )

**दुर्योधन:**---अग्रपूजेच्या वेळीं या मयसभेंत कृष्णानें शिशुपालाचा वध केला.

**भारताचार्य:**---या विधानाला महाभारतांत जागा नाहीं, अर्घाभिहरण पर्वांतील छत्तिसाव्या अध्यायांत सोमयागाच्या दिवशीं अंतर्वेदीमध्यें देव देवर्षि राजर्षि सारे जमले होते. अग्रपूजेचा वाद निघाला तेव्हां शिशुपाल यज्ञमंडपांतून बाहेर पडला असें सदतिसाव्या अध्यायाचे शेवटीं म्हटलें आहे. व पुढें त्याचा वध कृष्णाने केला. हा शिशुपालवध यज्ञमंडपा बाहेरच्या पटांगणांत झाला मयसभेंत नाहीं. कृष्णाची अग्रपूजा

मयसभेंत झाली नाहीं किंवा शिशुपालाचा व कृष्णाचा संवादही मयसभेंत झाला नाहीं.

( " मयसभा " शब्द चंबुगवाळें घेऊन चालता होतो. )

**पान १२** व त्या पुढील शकुनीचें भाषण.

**गयगदाधरः**—या भाषणावरून शकुनी म्हणजे एक आचरट मूर्ख, संतापी असा मनुष्य होता अशी कल्पना होते.

**भारताचार्यः**—भारतकारांचा शकुनी, मोठा गोडबोल्या, धूर्त, कावेबाज प्रसंगावधानी असा आहे. संकटांत सांपडला असतां दुर्योधन मर्मभेदक भाषणें करील पण शकुनी करणार नाहीं. तो गोड बोलून भीमाला सांष्टांग नमस्कार करून पांडवांची स्तुती करून आपली सुटका करून घेईल. तें कांहीं न करतां, हा शकुनी उलट भीमाला अधिक चिडवीत बसला आहे यावरून या कविवर वासुदेवांनीं महाभारत मुळींच वाचलें नसावें, किंवा वाचून त्यांतील अद्भुत दिव्य चरित्रांचें त्यांना मुळींच आकलन झालें नसावें असें माझें ठाम मत आहे.

**मार्मिकरावः**—[ पाय आपटून हिअर हिअरचा ध्वनी काढतो. ]

दुर्योधन व शकुनी यांचे पाय, पाण्यांतील यंत्रामुळें अडकून पडतात. या ओरिजिनल युक्तीबद्दल साऱ्या कुठार क्लबानें रा. खाडिलकर यांचे मनापासून अभिनंदन केलें व ही गोष्ट रा. गुलकंद्यांनीं तारेनें त्यांना कळविली नंतर **पान १४** वरील भानुमतीचा प्रवेश सुरू झालाः—

**भानुमतीः**—( दुर्योधनाची गदा एकटीच पडलेली पाहून ) " ते कोठें आहेत ? सांगा भावोजी कुठें आहेत ते ? त्यांची ही गदा येथें अशी कां पडली. भावोजी तुम्ही नाहीं सांगणार ! पण ही गदा सांगेल कुठें आहेत ते.

**पद**

' न रणभूमि न विलसन एकावरि प्रेम ' इत्यादि.

**रसगंगाधरः**—( पद चाललेलें असतां मधेंच उभा राहून )

अग हो हो ! आपल्या नवऱ्याला काय अपघात झाला आहे याची तर आधीं नीट चौकशी करशील कीं नाहीं ? कां आपली चांगली चाल आठवली लागली गायला ! ! यंत्रांत पाय अडकून नवरा खातो आहे गटंगळ्या ! ! बायको येते व आपल्या नवऱ्याच्या हातांत सदैव रहाणारी गदा एकटी अस्ताव्यस्त धूळ खात पडलेली पाहून दचकते पण नापत्ता झालेल्या नवऱ्याबद्दल पोलीस कमिशनरला तार बीर करायचं टाकून ही दीर्घ शहाणी भानुमती त्या गदेला भीमपलास रागातल्या ताणा, मारे ऐटीनें ऐकवीत बसली आहे !! वारे भानुमती ! वारे नाटककार !

**खुशालराव**:—अहो हें पद काढलं तर भानुमतीच्या पात्राला पदें कमी होतात ना ? याची वाट काय ? म्हणे भलत्याच ठिकाणीं पदें घालू नयेत ! ! मोठे शहाणे !

**मार्मिकराव**:—सांपडला ! आधार सांपडला ! अंधपरंपरा दासांना आधार आहे ! सुभद्रा बेशुद्ध पाहून अर्जुनजींची स्वारी तिच्या ' नाजुक बांध्यावर व पदतलरागावर ' एक लावणी म्हणून दाखविल्या खेरीज पाणी आणायला जात नाहीं! त्याचप्रमाणें शालीनरुपी--शालीनी वाघानें अर्धी खाल्लेली पडलेली असतांहीं , केस मृदुल स्वैरगती ' याप्रमाणें तिची संगीत वेणीफणी केल्याशिवाय शूरसेन तिच्या नाकाशीं कांदा वगैरे कांहींच उपचार करीत नाहीं, त्याच न्यायानें गदेला थोडेसें कुरवाळल्याशिवाय भानुमतीने नवऱ्याचा तपास काय म्हणून करावा बरोबर आहे ! ! !

तद नंतर **पान १५** अखेर खुशालरावांना बरीचशी लाईन क्लिअर मिळून भानुमतीच्या पदाला आरंभ झालाः——

पदः——' टाळा निजपर हा चाळा '

करील दैव तरी वक्राचि डोळा '... इत्यादि.

**अर्थभट**:—अर्थ गोड आहे.

**रसगंगाधरः**—टाळा, चाळा, वक्रचि डोळा, अशा घेडगुजरी रचनेमुळें रसभंग होतो.

'अझुनि खुळा हा नाद ' ' भेटतों मी जाऊनि भुजंगाला ', न तरी करणें तें पाहिजेच केलें......[ नाकझरिवरि तरी पाहिजेंच केलें !!-]

इत्यादि " शारदेतील " काव्य--रचना काव्यरहित गांभीर्यशून्य कल्पनाविहीन असली तरी अगदीं सोपी व एका दर्जाची आहे कनिष्ठ प्रतीचा कां होईना पण तो दर्जा त्या नाटकांत कायम राखला आहे. पण या कवींचीं विटाळीं पाहून घ्या! ऐका !! ' अवीट बाला-कौरव आला दुसरा ठरला--स्वयंवरा मम नटवा आला--सोंग सजविलें धनुला-धरिलें मत्स्य दिसेना--बाण चढविना ( चालला कटाव आगगाडी सारखा ) माति मय कृति हंसली, रुसली-फुगली-बसली-कसली-बुडता तो नासवितो, लांवला आनंद सुखविना दमला [ आनंद हा प्राणी मोठा चमत्कारिक दिसतो ] टाळा-चाळा-वक्रचि डोळा, घे सार्वभौमपदतुला अग्रपूजा मला वाटणीला-पडली परम घोर ठिणगी-तळमाळिला चळवळ बोला-उतरविती रिपुचा नक्शा-लढवूं गुरुला रणीं नका-व्हावें कां बांध नेमका-कौरव हा आपण समजाविला-सांग तूं शिष्यासि डावपेंच चार कैसा घेतला घातुक-बोजा-मारित, पातक आला थकवा-भरपूर माप उलटहिला-डवविला कर्ण खरा-असा शिरला वारा-हा माझा तोरा कोण पुसे तुमच्या जोरा—जरि न आतां घांसशील नाका--शंभर बांधव करितिल बटिका ! इत्यादि अवघ्या ७४ पानाच्या नाटकांत ४६ पदें आणि या ४६ पदांस जवळ जवळ ३६ चरण वर दाखविलेल्या मासल्याचे ! धन्य आहे या कविपुरुषवासुदेवांची ! वाटेल तसें गद्य लिहावें गद्याचा कंटाळा आला म्हणजे तसल्याच, गद्यांत थोड्याशा संस्कृत शब्दांचें तिखट मीठ भरावें ! ग्राम्यशब्दांचें पीठ लावावें ! ! असा हा लद्दा तयार झाला म्हणजे बायका पापड लाटायच्या वेळेस जशी एक मोठी लांबलचक लाटी तयार करतात, त्या प्रमाणें या गद्यपद्याची एक

१०० फूट लाटी बनवावी आणि मग गाणारें पात्र दिसलें कीं सुतळीचा फांस घालून ( तोडलीच लाटी ) गद्यापुढें दोन रेघा मारल्या कीं झालें पद ! पदाला काय उशीर ! याप्रमाणें या ४६ लाट्या तटातट तोडून प्रत्येक पात्राच्या हातीं देऊन बसविलीं आहेत पापड लाटा यला ! हा चमत्कार कलकत्त्याच्या लाट साहेबांना देखील करतां आला नसता म्हणून पंचशरांनीं कवितादेवीला आरक्त (रक्तबंबाळ) करून सोडणाऱ्या या गद्यवरांना ' लाटे साहेब ' ही पदवी देऊं इच्छितो.

( सर्व मेंबर उभे राहून अनुमोदन देतात. )

**मार्मिकराव**:– ( हातांत लाटणें घेऊन संतापानें ) हा दुष्टा रसगंगाधरा, या तुझ्या गद्यपद्याच्या १०० फूट लाटीमध्यें माझ्या वीर रसात्मक पदाचें नांव घ्यायला कसा विसरलास ? बोल !

( त्याची मानगुट धरून. )

[ संगीत स्वयंवर नाटकांतील-धृष्ट-पुष्ट नष्ट नरवडा-या पदाच्या चालीवर ]

" कुष्ट दुष्ट धृष्ट खरूजडा, लाजवि षंढा लोकीं नसे विसरे कवि पुंडा वीरोक्ती प्रचंडा तूं ओंडा नरगंडा ॥ धृ० ॥ तर्पण करितों ललित कलेचें जय घेतलि या दाढा धनकरें रडवीपद देवी रंडा अजि ॥ ठरवीन तुजसी उकिरडा झेंडा ॥ कुष्ट दुष्ट० ॥ नीचा, भीष्मक राजाचा युवराज, रुक्मिणीचा सख्खा भाऊ जो रुक्मी त्याच्या तोंडांत 'नरवडा–मेंढा–रेडा–कुतरडा–वेडा' असले प्राणी कोंबून पदलालित्याची जी आम्ही लांडगेतोड केली ती तूं ! ती तूं--कसा विसरलास ? बोल ! ! !

( रसगंगाधर व गद्यगदाधर आपआपल्या थोबाडींत मारून घेतात---तिकडे पापडाची लाटी लांब होत जाते, तिच्याकडे चिंतातूर मुद्रेनें पहात खुशालराव पुढें वाचूं लागतात ) पान १६–१७ मधील भीम व दुःशासन यांची ऑलिंपियन् गेम् झाल्यावर व दुःशासनाला भीमानें उचलून पाण्यांत टाकल्यावर कर्ण प्रवेश करतोः—

**कर्ण**:—दुःशासनाची विटंबना कोण करतो ? सुयोधनाची हाल अपेष्टा ? मग ह्या कर्णानें धनुष्य हातांत कशाला धरले ?

पद.

" परशुरामें मला उपदेशिली कला " इत्यादि.

**मार्मिकराव**:—शाबास! तरी म्हटलं इथे पद कसं नाहीं. कौरवांचा कैवारी कर्ण, दुःशासनाची आरोळी ऐकून धनुष्यबाण सज्ज करून धांवत येतो पण पुढें पहातो तो पेटीतबला! पद म्हटल्या-शिवाय सुटका नाहीं...म्हणा पद...करता काय ? दुर्योधन, शकुनी, दुःशासन तिकडे खात आहेत गटंकळ्या! खाऊन देत! कर्णाला नक्की ठाऊक होतं. त्या बेट्यांना चांगलें पोहतां येतं! चार गटंकळ्या जास्ती! बिघडलं काय ? पण शंकरा रागांतील ताण बिघडतां कामा नये. चालूं द्या!!

**श्रीयुत चित्रवर्मे**:—तें कांहीं असलं तरी या वेळचा एकंदर सीन परिणामकारक होतो. कर्णाचा पोशाख—त्याचे ते पुच्छ-विभूषित बाण—तीं कुंडलें—याबद्दल मी गंधर्व कंपनीचें कौतुक करतों. कर्णाच्या या पदावर बहुतेक कुठार क्लब खूष झाल्याचें दिसल्यावरून रा. गुल. कंद्यांनीं पुढें जोरानें सुरवात केली.:—

**कर्ण**:—दुःशासना चित्रांतल्या बायकांवर हा कर्ण शरसंधान करीत नसतो!

**मार्मिकराव**:—मग काय खरोखरच्या बायकांवर ?

**खुशालराव**:—( चिडून पान १८ वरील द्रौपदीचें भाषण छाती पुढें करून वाचतातः—

**द्रौपदी**:—निर्जिव चित्रावर बाण कां?......मी तुमच्या पुढें उभी आहे ? महाराज्ञी म्हणून मिरविते आहें! मयसभेची निर्भत्सना करणाऱ्यांकडे हंसत पहात आहे...वगैरे वगैरे."

**अर्थभट**:—( लटपटत ) अर्थ फारच जोरदार आहे बुवा!

**गुलकंदे**—याला म्हणतात पात्राचा उठाव!

**भारताचार्य**:—कायहो ? या नवीन द्रौपदीची ही अहंकार-अभिमान-पूर्ण दर्पोक्ति सुरू असतां अर्जुन व भीम काय करीत आहेत बरें ?

**मार्मिकराव**:—( हळूच ) तिच्या ओच्यांत दडून बसले आहेत !!

**खुशालराव**:—तुम्ही फारच कुत्सित आहांत बुवा.

**मार्मिकराव**:—अहो तुमचा कर्णच पुढें म्हणतो आहे " पांचाली तूं जरा बाजूला हो तुझ्या आड उभे असलेले ते भीमार्जुन माझ्यासमोर येऊं देत "बरोबर आहे हो तें सारं ? असल्या महांकाळी द्रौपदी पुढें ते बिचारे भीमार्जुन मांजरासारखे दडून बसले आहेत. तेंच ठीक आहे ! नका हुसकूं त्यांना !!! शिवाय द्रौपदीच्या आडून कर्णाचा बाण तोडणें हें अर्जुनाला पुढें शिखंडीच्या आडून भीष्माला मारायचं आहे ना ? त्याचें हें रिहर्सल् आहे रिहर्सल् ! ! आहां कुठें ?

**भारताचार्य**:—चित्रांतल्या स्त्रियांवर बाण सोडण्याचें नाकारणारा कर्ण, चित्रांतल्या अर्जुनाचें धनुष्य तोडण्याला कसा उद्युक्त होतो हो ? कर्णाचें चरित्र खरें पाहिलें तर इतकें दिलदार व क्षत्रियवीरश्री युक्त आहे कीं, यानें दुर्योधनाला सांगावयास पाहिजे होते कीं, बाबारे हा कर्ण चित्रांतल्या शत्रूवर शरसंधान करण्याइतका पोरकट किंवा नाटकी नाहीं ! खरा अर्जुन-जिवंत अर्जुन-माझ्या पुढें येऊं दे आणि माझा पराक्रम पहा. ही दर्पोक्ती महाभारतांतल्या कर्णाला युक्त झाली असती. पण हे कवि पडले प्रत्यक्ष विश्वामित्र ! ब्रह्मदेवाचा घोडा पाहिला आपण निर्माण केला इकडे दुसरा घोडा ! आतां प्राकृतजन याला गाढव म्हणतात; पण तो दोष प्रतिसृष्टी निर्माण करणाऱ्या विश्वामित्राचा नाहीं हें कोणालाही कबूल केलें पाहिजे !!

पान २० पुढें वाचन सुरू होतें.

" **द्रौपदी**:—( कर्णाला उद्देशून ) पाण्याला आयल्या वेळीं श्रम व्हावयाचाच "

**भारताचार्य**:—( खुशालरावाचे कान धरून )

कोणचं पाप बिचाऱ्या कर्णानं यावेळपर्यंत तरी केलं आहे बोला पाहूं ?

**खुशालराव**:—[ विवळत ] असूं द्याहो ! द्रौपदीचा हा उद्दामपणा, पुढें जे तिचे हाल होणार आहेत त्या अवस्थेशीं तुलना उठावाची दिसून येण्याकरितां जरा मुद्दामच अधिक घातला आहे.

**श्रीयुत रंगवर्मे**:—हरकत नाहीं. तुमचें तत्व बरोबर आहे. पहिल्या अंकांत राजा, तिसऱ्या अंकात भिकारी व पांचव्या अंकात पुन्हां सार्वभौम राजा किंवा याच अनुक्रमानें पहिल्यान्दा उद्दाम मध्यं· तरी त्या उद्दामपणाची फळें भोगणें व शेवटी समाधान वृत्तींत शेवट वगैरे अवस्था परिणामकारक होतात, ही गोष्ट खरी. तरी या सर्व अवस्था अत्यंत कुशलतेनें व मूळ भारतांतल्या विविध पात्रांच्या दिव्य इमारतीचें बांधकाम बिलकूल न दुखवितां रंगभूमीवर दाखविणें हें काम फार अवघड आहे. व रा. खाडिलकरांसारख्या विद्वान् व रंगभूमीचा अनुभव घेतलेल्या ग्रंथकारांनीं हें काम बिनचूक पार पाडून दाखवायास हवें होतें. इतर कोणाचीही चूक असती तर ती क्षम्य होती पण रा. खाडिलकरांचा हा हलगार्जिपणा अक्षम्य आहे. हें नाटक, असल्या कसलेल्या लेखकांनीं लिहिलें आहे. म्हणूनच कुठारक्लब इतकें डोकें तापवीत बसला आहे. मेंदूला श्रम देण्याइतकी प्रस्तुत लेखकाची किंमत आहे म्हणूनच कुठार क्लबाचा मेंदू श्रम घेत आहे. वाचा आतां पुढें ' तदनंतर दुर्योधन दुःशासन शकुनी हौदांतून बाहेर येतात. '

**रा. चित्रवर्मे**:—दुर्योधन व शकुनी दृष्टिभ्रम होऊन हौदांत पडतात. दुःशासनाला तर भीम उचलून हौदांत टाकतो. असें असून या तिन्हीं पात्रांची फक्त धोतरेंच भिजून वरचे सदरे कसे कोरडे रहा-

तात हो ! कोणी कसाही पाण्यांत पडला तर पाणी उसळून बहुतेक अंग भिजायला पाहिजे निकरत तर डोकें कोरडे राहील पण येथें पहातों तों या गुलामांच्या सदऱ्यांची परिट घडीसुद्धां विघडत नाहीं ! !

**मार्मिकराव**:—तरीच म्हटलं द्रौपदीचा कां इतका थयथयाट होतो आतां आलं लक्षांत ! !

**खुशालराव**:—( आपले कपडे चाचपून पाहून पुढें वाचतो )

पान २० शेवटीं दुर्योधनाचा अग्रपूजेचा वादः—

**भारताचार्य**:—अग्रपूजेचा हा वाद येथें कां आला ? महाभारतांत कोठें नाहीं ! या कवींना गप्पा मारण्याची बरीच संवय दिसते.

**रंगवर्मे**:—महाभारतांत नसून पदरचे प्रवेश किंवा प्रसंग आणावयाचे तर त्यांनीं रंग अधिक खुलून दिसावयास पाहिजे, तसाही येथें दिसत नाहीं. स्वकपोलकल्पित प्रसंग निर्माण करणें म्हणजे मोठी जबाबदारी अंगावर घेणें आहे. महाभारतांतील प्रमुखपात्रासंबंधीं मी तुम्हाला निक्षून असें सांगतों कीं, तीं तीं पात्रें ज्या ज्या प्रसंगाच्या अनुरोधानें रंगविली आहेत, ते ते प्रसंग इतके रंगदारीचे, अत्यंत कुशलतेचे, सत्याला व न्याय व तर्काला धरून उठविले आहेत कीं, त्यांत ढवळाढवळ करून आपला शहाणपणा जे दाखवितील ते मूर्ख ठरतील. महाभारतकार हा एक अद्वितीय अद्भुत नाटककारच गणला पाहिजे. मूळ पात्रें जशिच्यातशीं ठेवून व त्यांचे प्रसंग आहेत तेच कायम राखून अगदीं नवीन मनःकल्पित अशीं गौण पात्रें निर्माण करावीत व मग त्यांचे खुशाल खेळ-खंडोबा करीत बसावें, त्याला आमची ना नाहीं. मुख्य पात्रांच्या चारित्र्यामध्यें फेर बदल करण्याची कोणी मानवी प्राण्यानें छाती करूं नये.

**भारताचार्य**:—अग्रपूजेचा हा वाद मुळांत नाहीं. ही एक कवींची थाप आहे.

**रंगवर्मे**:—या थापेंत रंग नाहीं.

**चित्रवर्मे**:--या थापेमुळें दुर्योधनाचें चित्र महामूर्खासारखें दिसतें. शकुनीमामा जवळ आहेत, ते तरी असला मूर्खपणा आपल्या आवडत्या भाच्याला कसा करूं देतात ? ते तसा करूं देतात यावरून शकुनी सारख्या अट्टल लबाड माणसाचें चित्रही शुंभासारखें दिसूं लागतें !!

**अर्थभट**:--या अग्रपूजेच्या वादांत अर्थ कांहींच दिसत नाहीं.

**रसगंगाधर**:--या शुष्क वादामुळें द्रौपदीचें कृष्णभक्तीवरचें चऱ्हाट विनाकारण वळलें गेलें आहे. व त्यामुळें पुढें ओरडा ओरडीच्या रसा शिवाय कोणताच रस उत्पन्न होत नाहीं अतएव् रसहानी !

**भारताचार्य**:--अग्रपूजेच्या वादाची ही गप्प या कवींनीं येथें झोकून अग्रपूजेकरतां युद्धाचें आव्हान अशा थाटांत पहिला अंक संपविला आहे. पण खोटं बोलणाऱ्याला जसं एक छपविण्याकरितां दुसऱ्यांदा खोटं बोलावं लागतं त्याप्रमाणें पुढच्या अंकात हा अग्रपूजेचा नसता तंटा मिटवितां मिटवितां नाटककाराचे कसें हाल झाले आहेत तें ४४ व ४५ दोन पानें भरून जें द्रौपदीचें लेक्चर आहे त्यावरून कळून येईल व या शिवाय नसत्या उपद्व्यापानें पांडव व द्रौपदी कोणत्या खड्ड्यांत पडली आहेत ते पहा--पांडव कृष्णाचे अभिमानीं व म्हणून ते त्याच्या अग्रपूजेचा अभिमान बाळगतात. दुर्योधन म्हणतो माझी अग्रपूजा करा. नाहीं तर लढाईला तयार व्हा. पुन्हा म्हणतो लढाई खेळा नाहीं तर जुगार खेळा असें याचें आव्हान आल्यावर द्रौपदी व धर्म लढाई नको आम्ही आपले जुगार खेळतो असा नेभळट जबाब देतात. वाहवा ! शाबास आहे या कविवरांची ! श्रीकृष्णाच्या अग्रपूजेची निंदा करणाऱ्या-बरोबर लढाई केली असती तर पांडवांना व द्रौपदीला कोणता काळीमा आला असता बरं ! श्रीकृष्णाच्या अग्रपूजेचा वाद जुगार खेळून द्रौपदीनें व धर्मानें मिटवावा हें द्रौपदीला व त्या धर्माला अत्यंत मोठें लांछन आहे. आपण केलेली गोष्ट योग्य आहे असें जगाला कळविण्याकरतां जीव खर्ची पडले असते तरी बेहत्तर ! ! परंतु

जुगारासारख्या हलकट कृत्याला लढाई नाकारून, द्रौपदीनें संमति द्यावी या सारखी लाजीरवाणी गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं आणि हा भयंकर अपराध द्रौपदी व धर्म यांच्या हातून या नाटककारांनीं करविला आहे कारण काय तर दुर्योधनाच्या तोंडीं भलत्याच ठिकाणीं अग्रपूजेचा खोटाच वाद उकरून काढला आहे. तो निस्तरण्याकरतां पुढें द्रौपदी व धर्म या पात्राचें धिंडवडे काढावे लागले ! म्हणून पुन्हां बजावतों, भारतातल्या प्रमुख व्यक्तींनां रेसभरही न ढळवितां काय अक्कल खर्च करायची असेल ती करा नाहीं तर असें तोंडघशीं पडाल ! ! !

इतका भडिमार झाल्यावर सर्व महाभारत—मूळ ग्रंथ काळजीपूर्वक वाचण्याची शपथ घेऊन रा. खुशालराव पुढें वाचूं लागले.

'पान २० धर्म व मयासूर येऊन दुर्योधन, शकुनी व दुःशासन यांना सोडवितात.' ( तदनंतर पान २१ वरील दुर्योधनाचें भाषण रा. खुशालराव पाय आपटीत वाचूं लागले:—... ...कालाला उलटी कलाटणी देण्याचें बळ कर्णाच्या बाणानें मला दिलें... ...

**मार्मिकराव:** —( कोल्हांटी उडी मारून ) वर्तमानपत्र ! ताजा अंक ! दोन दोन पैसे ! ताजा अंक ! ताजी बातमी !!

**गद्यगदाधर:**—पौराणिक नाटकांतसुद्धां १९२१ ची चालू वर्तमानपत्री भाषा घालण्याची या कवीची शैली रा. कोल्हटकरांच्या 'सू' च्या सुळसुळाटापेक्षां अजब आहे. वृत्तपत्रांची भाषा वापरून सद्यःस्थितीचें छायाचित्र ठिकठिकाणी दृग्गोचर करण्याचा द्राविडी प्राणायाम करण्याचें जर मनांत असेल तर १९२१ किंवा त्याच्या पुढच्या कालांतील पात्रें निर्माण करा व मग चालूंद्या तुमचीं व्याख्यानें ! फार तर ऐतिहासिक नाटकांत वृत्तपत्राची भाषा कौशल्याने वापरली तर थोडी फार चालेल. आणि याला उत्तम प्रत्यंतर म्हणजे याच कवीची ऐतिहासिक नाटकें ! पसंत आहेत. परंतु तसली भाषा पौराणिक नाटकांतून फार वापरणें म्हणजे द्रौपदीला सायकलवर बसवून

फर्ग्युसन कॉलेजकडून चक्कर मारून येण्यास सांगण्यापैकीं होय !!

उदाहरणार्थः—पौराणिक-वर्तमानपत्रीः--१ संपूर्ण द्रौपदी नाटकः--

१ पान २१ ' कालाला उलटी कालाटणी '

२—२३-- पांचालीच्या हसण्यांत, तसेंच हंसून मीही सामील होत आहे.

३--२४--' तुमचें व पांडवांचें वैर निर्मळ नाहीं '

४--२४--' पण त्या प्रेमांतून पांडवांच्या वैराचा झोत उत्पन्न होऊं शकत नाहीं. '

५--२६--' उत्कट झालेल्या मनोविकारांची छाप सर्व आवडत्यावर पडत असते. '

६--२८--' तळमळीला चळवळ बोला. '

७--३३--' फांसे टाकून कोंबड्या झुंजवितों. तूं माझी आवडती तिसरी कोंबडी होतोस ! '

८--३८--' माझ्यासारख्या वृद्धाला सनाथ झाल्यासारखं होऊन. '

९--३९--' माझ्या मस्तकावरचा बोजा हलका केलात. '

१०--४०--' धृतराष्ट्र महाराजांना या आव्हानाला उचलून धरणें भाग आहे. '

११--४१--' अजिंक्य शक्तिचा ओढा. '

१२--४२--' पांडवांच्या चारित्राची नदी कृष्णाच्या चरित्रांत मिसळून. '

१३--४२--' श्रीकृष्णाला आमच्यांतून निराळा काढून आमच्याकडे पाहूं नका. '

१४--४२--' माझ्या मुलांच्या आनंदाची काळजी वाहूंद्या. '

१५--४३--' अशी शेखी मिरवण्याचा मार्ग सुयोधनाला मोकळा करून द्यावा. '

१६—४४--' एवढ्या नात्यापुरते ते जिवंत आहेत. '

१७-४५-‘ कृष्णाच्या चारित्रावर अहंकाराचाच छाप मारण्याची संधि देऊन.’

१८--४७-‘ श्रीकृष्णाच्या स्तुतींत सुख मानायला तयार आहेत!’

१९--४९-‘ विश्वाची शक्ती त्या संमतीच्या आडवी जरी जात नसली तरी पाठमोरी होत आहे.’

२०--४९--‘ याचा पडताळा पांचालीकडे पाहून मी घेत असतों.’

२१--६१--‘ या या सिंहासनाला हा माझा प्रश्न आहे.’

२२--६२--‘ मातेचा स्त्रीपणा--कन्येचा स्त्रीपणा वगैरे--( १०० डिग्री स्त्रीपणं.)

२३--६५--‘ केलें, करविलें, आणि मग सांगितलें.’

२४-६५-‘ स्वतंत्र हवा पाण्याच्या रानावनांत.’

२५-७२--‘ या सिंहासनाचा निर्णय मी देतों पहा.’

असल्या थाटाचें गद्य पौराणीक नाटकांत मुख्य पात्रांच्या तोंडीं अतिशय रस हानिकारक होतें!

**रा. खुशालराव:**—[ छापखान्यांतील शाईचा रोलर, वरील वाक्यांवर फिरवून मग पुढें वाचतात ]:----‘ माझी अग्रपूजा करा म्हणजे द्रौपदी जी मला हंसली त्याबद्दल मी तिला क्षमा करीन,’ या दुर्योधनाच्या भाषणातील आशयानंतर पान २१ वरील द्रौपदीचें भाषण:----

“ काय व्हावयाचें असेल तें होऊं द्या, मी हंसलें! कोण हंसणार नाहीं? ......विश्वकार्य माझ्या देहानें केलें......श्रीकृष्णाच्या विमल यशानें प्रकट होऊन सहज लीलेनें तुम्हाला धिःकारण्याचा मान दिला.”

**अर्थभट:**----( डोक्याला टेंगळे येईपर्यंत डोकें चोळतो. ) छे! अर्थाचा पत्ता लागत नाहीं. दुर्योधन चुकून पाण्यांत पडला त्याला द्रौपदी हंसली. ती हंसली हें पाहून तो चिडला. हाच काय तो प्रसंग आणि त्यावर द्रौपदीची जी ही मल्लीनाथी चालली आहे ती

विलक्षणच !

**गद्यगदाधरः**—तिच्या उत्तराचा अर्थ असाकीं श्रीकृष्णानें प्रेरणा केली म्हणून मी हंसलें माझा त्यांत मुळींच अपराध नाहीं किंवा शिष्टाचाराचें उल्लंघन नाहीं किंवा पाव्हण्यांचा उपमर्द नाहीं किंवा दिराची थट्टाही नाहीं. कर्ता करविता श्रीकृष्ण ! त्याला वाटलं तर दोष द्या ! मला काय म्हणून उगीचच्या उगीच !

**मार्मिकराव**:—प्रत्येक गुन्हेगार पिंजऱ्यांत उभा असतां असाच जर श्रीकृष्णपरमात्म्याकडे बोट दाखवूं लागला तर आजपर्यंत त्या बिचाऱ्या कृष्णाला किती नोटीसा गेल्या असत्या, वारंट, झडत्या झाल्या असत्या कुणाला ठाऊक !

**गुलकंदे**:—( अंगवस्त्र झटकून )

' पुढें द्रौपदी म्हणतेः—मी हंसतें तुम्हांला ! मी हंसतें !!!

**मार्मिकराव**:—कुठें आहे माझी वेताची छडी ! दोन लगावल्या पाहिजेत !! मघांपासून पहातों आहे मी ! दीर पडला--हसूं आलं--कबूल--पण तो चिडला असं पाहून द्रौपदीनंः—

**शीघ्रकवी**:—' अगबाई ! भावोजी खरंच कां इतका राग आला तुम्हाला ? क्षमा करा ! मी कांहीं मुद्दाम तुम्हाला चिडवावं म्हणून हसलें नाहीं बरं ! मला सहज हसूं आलं. कोणी पडलं किंवा कुणाचा पाय घसरला तर नाहीं कां बरें हंसायला येत बघणाराला ! इतकं तें काय मेलं मनावर घ्यावं ! आपण आमच्या येथें पाव्हणे आला आपला अपमान मी करीन असं आपल्याला वाटलं तरी कसं ?

**मार्मिकराव**:—थँक्स ! अशाप्रकारें बोलून नवऱ्याच्या समक्ष दिराची क्षमा मागणें हेंच कोणत्याही आर्यस्त्रीला योग्य दिसलं असतं ! तें दिलं सोडून ! आणि ही १९२१ सालामधली द्रौपदी आपल्या पांच नवऱ्यांना साक्षी ठेवून कर्णासमक्ष ( प्रेक्षक सोडून द्या ) गदा सांवरून—दंड थोपटून—आपल्या दोघां दिरांना शकुनी मामंजीच्या

समक्ष वजावते मेल्यानो मी ही तुह्याला हंसलें तुमच्या बापाचं काय गेलं ? शाबास ग माझी द्रौपदी !!! असला धडधडीत अपमान ? कोण सहन करील ? दुर्योधनानें आपली गदा तिच्या डोक्यांत घातली नाहीं हेंच नवल ? तो बिचारा खऱ्या शांतवृत्तीला जागून शांतपणें अडाणा रागांत युद्धाला आव्हान देत आहे. धन्य आहे या दुर्योधनाची शाबास ! !

**खुशालराव**:---[ गातात ] ' दुर्योधनः----

**पद.**

घे सार्वभौमपद सौख्यराशी तुला ।
अग्रपूजा मला वाटणीला ॥

**मार्मिकराव**:---( गातात )

' दशतुला दश मलं, दशघरचे ब्राह्मणीला ।
पंच पंच पिल्लुकाला शेंडे बुडखे रेडुकाला ।
दाक्षिणेच्या खिंडुकाला यः पलाय स जीवते ॥ '

असें म्हणत धांवत आंतल्या दालनांत रा. खुशालचेंडूचे सावत्र चुलत भाऊ बाबुराव लड्डे यांनीं फराळाचा उत्तम बेत केला होता, त्यावर हात मारूं लागले. इतर मंडळींनीं हळुहळु त्यांचें अनुकरण केलें.

इतिमद्भारताचार्यप्रासादिकनाट्यकलारुक्कुठारमात्रांकित वळसा उगाळित चौपाटी हवाशिर प्रासादे द्रौपदी--प्रथमांके दिव्य टीकायाः प्रथमः हस्ता समाप्तः । शुभम् भवतु । शुभम् भवतु ॥

# अंक दुसरा.

फराळ आटोपल्यावर कोणी धूम्रपान करीत कोणी ताम्रमुखीचे बार भरीत सर्व मंडळी आपआपल्या स्थानावर बसली.

**रा. खुशालराव**:----पहिला अंक समाप्त झाला.

**गद्यगदाधर**:----गद्य विचार मार्क शंभरापैकीं पांच.

**पदेशास्त्री**:----पद्यविचार--" परशुरामे मला उपदेशीली कला " हें पद्य अस्थानी पडलें आहे. तरी तें एकच पद्य म्हणण्या लायकीचें थोडेसें आहे. त्या पद्यांत दोष फारच कमी आहेत व त्याचा राग व ताल हीं—ही त्या पद्यांतील रसाला अनुकूल अशी आहेत. बाकी सारी पदें गद्याला उभ्या रेघा मारून बनविलेलीं आहेत. त्यांत काव्य कल्पना, अलंकार, प्रसाद, चमत्कृती, गद्यांत म्हणतां येणें शक्य नाहीं असे दिव्य व अद्भुत विचार, या कविता--प्रधान गोष्टी मुळींच नाहींत. अतएव पहिल्या अंकातील पदें म्हणजे गद्यापद्या ! ! गद्याच्या योग्यतेचें पद्य तें गद्यपद्य !

**खुशालराव**:—[ हें सूत्र डायरींत टिपून ठेवतो. ]

**रसगंगाधर**:----' धमर्मय ही काया ' ही चाल खमाजामधली आहे. गोड लागते परंतु पद्यांतील रसाला ती अनुकूल नाहीं.

**चित्रवर्मा**:—दुर्योधन व शकुनी यांचे पाय हौदांतील यंत्रांत अडकवून टाकले याला आधार मूळ महाभारतांत नसला तरी या मनोरचित मनोरम युक्तीबद्दल रा. खाडिलकर यांचें मी अभिनंदन करतों.

**रंगवर्मा**:—भीमाला मोठमोठ्या मिशा आलेल्या असतात व त्याचें लग्नही झालेलें असतें या गोष्टी लक्षांत ठेवल्या तर त्याचे पहिल्या अंकातील हाव भाव व भाषणें अगदीं पोरकट वाटतात.

**रसगंगाधर**:—भानुमतीच्या तोंडीं ' न रणभूमि न विलसन ' ' नयनी तिही नाहीं ' व ' टाळा निजपर हा चाळा ' हीं तीन पदें चांगल्या रागांतली असून गवई थाटाला उत्कृष्ट आहेत. परंतु तीं भल-

त्याच प्रसंगीं पडल्यामुळें ठिकठिकाणीं रसहानी होते. भानुमतीचें पात्र चांगल्या गाणाऱ्या पात्रांपैकीं असल्यामुळें हा दोष सहसा दिसून येणार नाहीं तरी पण त्याच तीन पदांचा अनुक्रम तालाच्या दृष्टीनें झपताल त्रिवट व दादरा असा लावून त्याप्रमाणें निरनिराळ्या ( फार भारदस्त नाहीं. ) अशा रागांची योजना करून पद्यरचना असती तर खरी बहार आली असती. असो आतां दुसऱ्या अंकाला सुरवात करा.

**खुशालराव**:--( घसा साफ करून दुसऱ्या अंकाचा सारांश सांगतातः- )

' मी मयसभेंत पडलों--पांचाली मला हंसली--हें शल्य माझी अग्र-पूजा पांडवांनीं केली तर निघून जाईल ' असा दुर्योधनाचा हट्ट पाहि-ल्यावर धर्म व द्रौपदी त्याला स्पष्ट सांगतात कीं, आम्ही तुला हंसलों व हंसणार. अग्रपूजेबद्दल म्हणशील तर तुझी अग्रपूजा आम्ही केव्हांच करणार नाहीं.

या उत्तरावरून दुर्योधन त्यानां युद्धाचें आव्हान देतो व पांडव युद्धाचें आव्हान पत्करतात येथें पहिला अंक संपला दुसरा अंक--भानुमती व शकुनी यांना युद्धाचें आव्हान पसंत नसतें. जरासंधाच्या हाडाचे अजिंक्य फासे जवळ असणारा अक्षपाल याची व शकुनीची अकस्मात गांठ-शकुनी त्याला अक्षवती नगरीचें राज्य देऊन त्यापासून फांसे घेतो--अग्रपूजा करा-नाहीं तर द्युत खेळा अशा तीन गोष्टी दुर्योधन व शकुनी धृतराष्ट्राच्या संमतीनें पांडवापुढें मांडतात त्यापैकीं द्युत खेळणें बरें असें अनुमत द्रौपदी देते हें पाहून धर्म द्युताला उद्युक्त होतो.

**खुशालराव**:----पुढें वाचतात ' अंक २ प्रवेश १ '

**शकुनी**:----किती वेळ मी भणभण फिरूं ? कांहीं युक्ति सुचत नाहीं.

**मार्मिकराव**:----[ लंगडत चालत ' चालुनी चालुनी अतिशय दमले तशांत क्षुधार्ततृषार्त मी ! हाय !! डोक्यांत पाणी घालतो' ]

**बाबुराव लट्टे:**-( आंतील फराळाच्या खोलींतून धांवत येऊन मार्मिकरावाला वारा घालतो. )

**मार्मिकराव:**----' क्षणोक्षणीं माझे पायीं कंटक रुततीबाई ! हाय ! ! [ टाळ्या ]

**भारताचार्य:**----बरे ! शकुनी ! भणभण फिरणाऱ्या गंधार देशच्या राजा, तुला जर कांहीं युक्ति सुचत नाहीं तर बिचाऱ्या नाटककारांना काय सुचणार ?

**गद्यगदाधर:**---' भणभण फिंरू ' हें शकुनीसारख्याच्या तोंडचें गद्य ! असली भाषा ऐकली म्हणजे माशाचा भणभणाट कानाशीं सुरूं झाला कीं, काय असा भास होतो !

**खुशालराव:**—( माशा वारून ) पान २५ ' शकुनी:– मी ही आग पेटविली खरी.

**चित्रवर्मा:**---साफ खोटी गोष्ट ! शकुनीनें ही आग पेटविली नसून खरी आगलावी म्हटली तर द्रौपदी ! भानुमती एकटी पाहिली चालला वढाया मारायला ! !

" **शकुनी:**---' तळहातावरील फोडाप्रमाणें नवऱ्याला जाणणाऱ्या बायका नवऱ्यासकट शत्रूंच्या हातीं पडत असतात. "

**गद्यगदाधर:**----पसंत आहे ! सत्य असून खुबीदार आणि पुन्हां म्हणणाऱ्या पात्राला म्हणजे शकुनीला साजेल असेंच हें वाक्य आहे. ठीक आहे चालू द्या.

[ शीलवती भिकारीण व तिचा मुलगा येतात व शकुनी पांडवाचा खरा हाडवैरी म्हणून त्याला अक्षपालाचे फांसे दाखविण्यास घरीं घेऊन जातात. ]

**रा. खुशालराव:**--कां कशी आहे युक्ति ?

**भारताचार्य:**----कोणाची ?

**खुशालराव:**----शकुनीची.

**भारताचार्यः**----मुळींच नाहीं. हा काकतालीय न्याय झाला. यांत शकुनीची युक्ति किंवा कसब कांहींच नाहीं !! तदनंतर पान २९ वरील अक्षपालाचा प्रवेश गुलकंदे जोरानें वाचूं लागतात.

यानंतर अंक २ प्रवेश २ रा सुरवात झाली.

अक्षपाल--शीलवती--रूपवती--त्यांचा मुलगा शकुनी येतो व अक्षपाल त्याला जरासंधाच्या हाडांचे बनविलेले फांसे देतो.

**चित्रवर्माः**----अक्षपालाचा द्यूतक्रीडेचा व जुगारीचा शोक यांत चांगला दाखविला आहे.

**गयगदाधरः**----' खरा तरवार बहादूर मरेतों जिंकण्याची धडपड करीत असतो, तसे आम्हीं जुगारी पुरे बेपत्ता होईतों पर्यंत असेल नसेल तें पणाला लावीत असतों वगैरे अक्षपालाच्या तोंडचें गद्य चांगलें साधलें आहे.

रा. खुशालराव खुषीत येऊन जोरानें पुढें वाचतात.

**अक्षपालः**----फांसे टाकून ह्या कोंबड्या कशा झुंजवितो ? माझी आवडती कोंबडी तूं होऊं इच्छितोस ?........माझ्या फाशांचा चमत्कार ह्या तिसऱ्या कोंबडीला पाहूं द्या ! ! '

**मार्मिकरावः**----[ ओऽऽऽकरून भडाभड ओकतात. ]

[ रा. गुलकंदे घाबरून त्यांचें डोसकें दाबून धरूनः--अहो काय झालं काय इतक्यांत ?

**मार्मिकरावः**--( ओऽऽऽऽऽ )

**गुलकंदेः**----अरेच्या आहे तरी काय घशांत कांहीं गेलं की काय ?

**मार्मिकरावः**----अहो मुरगी ! मुरगी अडकली घशांत( ओऽऽऽऽ ओऽऽऽऽऽ )

गुलकंदे त्यांच्या घशांत बोटें घालून एकामागून एक तीन कोंबड्या बाहेर काढून फेंकून देतात.

**मार्मिकरावः**--विष्णवेनमः ! विष्णवेनमः [ डोळ्यांना पाणीलावतो.

**चित्रवर्मा**:---' पात्र-फुलपात्र बिभत्सरस, ' ओढून ताणून हास्यरस निर्माण करण्याच्या क्षुद्र कल्पनेला बळी पडून किंवा नाटक कोणत्याही काळाचें असले तरी त्यांत सद्यः स्थितीवर कांहीं तरी व्याख्यान झोडी-वयास हवें म्हणून रा. खाडिलकर हें मुख्य पात्रांव्यतिरिक्त इतर पात्रें म्हणजे फुलपात्रें किंवा टिनपात्रें इतकीं भडक रंगांत रंगवू लागतात कीं, त्यांची लेखणी-लेखणी कसली खराटाच तो त्यांचा त्यांना आवरेनासा होऊन इतका कर्कश कर्णकटू खरर खरर आवाज काढूं लागतो कीं, त्यामुळें इच्छित रस पार झाडले जाऊन त्यांचे ऐवजीं बीभत्स रसाचा लोट वाहूं लागतो. ' सवाई माधवराव ' या नाटकांतील तृतीय पंथी पाटिल बुवा ! मानापमानातील सार्वजनिक धर्मशाळा पालथ्या घाल-णारा लक्ष्मीधर ! विद्याहरणांतील दारूजी गुत्ताजी ताडीवाल्याच्या दुका-नातील ताडीचें पिंप डोक्यावर घेणारा शिष्यवर ! दासीच्या कपाळाची कवटी उलटी सुलटी करणारा रुक्मिणी—स्वयंवरातील दिनेश्वर ! हीं पात्रें पाहिली म्हणजे या कविश्रेष्टांना विनोदी हास्य कोटी किंवा आचरटपणा पांचटपणा--बाष्कळपणा--बीभत्सरस यांतला भेद मुळींच कळत नाहीं, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

मृच्छकटिक नाटकांतील एकच शकाराची भूमिका जर त्यांनीं लक्ष-पूर्वक वाचली असती तर नैसर्गिक हास्यरस कसा उत्पन्न करावा ही साधी कला त्यांना सहज अवगत झाली असती. किंवा रा. श्रीपाद कोल्हटकर व गडकरी यांच्या गद्याचा मननपूर्वक अभ्यास केला असतां विद्वता प्रचूर व मनोरम कोट्या कशा कराव्या हें ही शास्त्र ते सहज शिकले असते. या दोन्हीं गोष्टींचा जेथें अभाव तेथें यांच्या प्रमुख पात्रेतरांत बीभत्सरसाची घाणेरडी छटा ठिकठिकाणीं दिसून यावी यांत काय आश्चर्य ! अतएव हा फुलपात्र--बिभत्सभावः ! !

रा. खुशालराव हें पाणिनीचें सूत्र आपल्या राजमेळांत गुपचिप टिपून घेतात व पुढें वाचतात.

**अक्षपालः**—अक्षवतीचें राज्य जिंकिन व फांसे देईन असा माझा पणच आहे ! !

**भारताचार्यः**—जरासंधाच्या हाडाचे फांसे व अक्षपाल यांना भारतात मुळींच जागा नाहीं.

**अर्थभटः**—महाभारतांत आधार नसला तरी जरासंधाच्या हाडांनीं पांडवांना जिंकावें या कल्पनेंत पुष्कळच स्वारस्य आहे हें कबूल केलेंच पाहिजे. व पुष्कळ हरदासांच्या तोंडून मी ही कथा ऐकली आहे. आतां अक्षपाला सारखा अस्सल जुगारी स्मशानांत तपश्चर्या करून हाडाचीं कांडें करणारा द्यूतकार जरासंधाच्या हाडांचे विजयी फांसे तयार करणारा धूर्त-केवळ अक्षवतीच्या क्षुल्लक राजधानी करतां ते फांसे एखाद्याला देऊन टाकील ही गोष्ट मात्र विचित्र दिसते. या फाशांनी द्युतप्रिय जो धर्मराज यांच्याशींच खेळून या अक्षपालाला पांडवांचे सुद्धां राज्य हरण करतां आलें असतें ते टाकून हा धूर्त शकुनीची वाट पहात घरीं बायकाच्या अंगावर लोळत बसतो तरी कसा ? हा मात्र मोठा दोष अक्षपालाच्या चारित्र्यांत राहून गेला आहे. बाकी ठीक आहे.

**भारताचार्यः**—( खवळुन ) मुळींच ठीक नाहीं. ते जरासंधाच्या हाडांचे फांसे होते या गोष्टींत तुम्हाला वरवर स्वारस्य दिसेल पण पुन्हां विचार करा व भारताला सोडून रूढ कल्पनेला धरून बसल्यामुळें या कवीचे पुढें कसे हाल झाले आहेत पहा ! पान ३५ वर अक्षपाल म्हणतो भीम-पणाला लावला भीमाचे नांव ऐकलें कीं, हे फांसे हालेनासे होतात जरा-संधाची हाडें मेल्याहून मेली होतात हें जर खरें तर शकुनी मामा साहेबांनीं पुढें द्यूतांत याच फाशांनीं प्रत्यक्ष भीमाला कसा जिंकला ? बोला ? भीमाचा पण कांहीं चोरून लावला नव्हता. मोत्यांचे व्यापारी उपरण्यांत हात दडवून करपल्लवी भाषेंत सांगतात. तसल्या प्रकारची कोणतीच भाषा, भीमाला जेव्हां पणाला लावला तेव्हां धर्म राजांनीं उच्चारली नव्हती ! भीमाचा पण स्पष्ट शब्दांत होता ! धर्मराज म्हणतात

' आतां आमच्यांतील पुढारी, युद्धांतला अग्रणी, वज्रपाणी इंद्राप्रमाणें राक्षसांचा कट्टा शत्रू सिंहासारखें भरगच्च ज्याचें गर्दन, सदा क्रोधाविष्ट असा हा राजपुत्र भीमसेन पणाला लावावयाचें माझ्या जिवावर येतें. तरी सुद्धां त्याला मी पणाला लावून तुझ्या बरोबर [ शकुनी बरोबर ] द्युत खेळतो. त्यावर शकुनीनें जिंकलें इतकेंच शब्द उच्चारून फांसे टाकले व भीमसेन महाराजांना जिंकून आपला दास करून टाकले !!

जरासंधाच्या हाडांचे ते फांसे जर खरोखरच असते तर भीमाचें नांव ऐकल्याबरोबर तेथल्या तेथें त्यांचें पाणी होऊन गेलें असतें. व भीम स्वतंत्र राहिला असता. एकटा भीमच नाहीं तर त्याच्या मागून पणाला लागलेले अर्जुन, धर्म व द्रौपदी हींही वांचली असती. हें ज्या अर्थी झालें नाहीं त्या अर्थी ते फांसे जरासंधाच्या हाडांचे होते अशी कोटी करण्यांत स्वारस्य तें काय ? बोला त्या पेक्षां महाभारतकारांनी वर्णन केल्याप्रमाणें शकुनी हा स्वतःच इतका कुशल व अद्वितीय द्यूतकार होता कीं, त्याच्या इच्छाशक्तीच्या जोरावर, अकलेच्या बळावर, अक्ष-विद्येच्या प्रभावावर त्याला वाटेल तसें हूकूमशीर दान पाडून घेण्याची कला त्यानें महत्प्रयासानें साध्य करून घेतली होती. ही जी शकुनीची जोरदार भूमिका महाभारतांत उठविली आहे, ती तशीच्या तशीच रंग-विणें ही गोष्ट नेभळट व आयत्या बिळावर नागोबा झालेल्या खाडिल-करी शकुनीपेक्षां नाट्यदृष्टीनें सहस्रपट अधीक रम्य दिसली नसती काय ? म्हणून पुन्हां बजावतों कीं, महाभारतकार हा एक दिव्य अद्-भुत अद्वितीय नाटककार होता. त्याच्या मुख्य पात्रामध्यें बिलकूल ढवळा ढवळ चालावयाची नाहीं. तीं पात्रें अक्षरशः तशीच ठेऊन मग काय काय अकलेचे तारे तोडायचे असतील ते तोडा. !!!

या प्रमाणें या जर्मन हावित्सरचा मारा सुरू झाल्याबरोबर खुशाल-रावांनीं मोठा चिमटा आणून शकुनी, अक्षपाल, रूपवती व शीलवती व त्यांचा मुलगा इतकीं पात्रें एकामागून एक खिडकींतून बाहेर फेंकून,

दिलीं व चिमटे झाडून पान ३६ वरील प्रवेश १ सुरू केला.

तदनंतर पान ३६ अंक २ प्रवेश सुरवात झाली.

( दुर्योधन आव्हान दिल्याप्रमाणें युद्धाला तयार होतो, परंतु शकुनीला आयते फांसे मिळाल्यामुळें तो व भानुमती मिळून दुर्योधनाचें मन युद्धापासून परावृत्त करून त्याला जुगाराची सल्ला देतात. ) या प्रमाणें रा. खुशालराव यांनीं त्या प्रवेशाचा सारांश सांगून दुर्योधनाचें पदाला सुरवात केली.

प्रिय मोक्षाहुनिही महत्वाकांक्षा ।
प्राप्त होत नाहीं गदादीक्षा ॥
पुरवली येथही मज भिक्षा ।
मारुनि समरि शौर्यानें अरि ।
उतरवितों रिपुचा नक्क्षा ' ॥

**पदेशास्त्रीः**– [ गातात ]

प्रसादाची फांसुनि रक्षा ।
लालि त्याचा करुनि अळंक्षा ।
पाडुंनिया ती सुशब्द भिक्षा ।
नाट्य परिक्षा मारुनि कक्षा ।
उतरिन काव्याचा नक्क्षा ! ! !

कैसी कही !

**मार्मिकरावः**--- [ टाळी देऊन ] अच्छी कही ! !

**खुशालरावः**---( एकीकडे रामरक्षा म्हणत पुढें वाचतात. )

' **भानुमतीः**–कामधेनु घरांत चालून आली हो ! काय आहेत ते फांसे ?

**मार्मिकरावः**–-( मिटक्या मारीत ) काय करावं ! आमच्या आंबेगांवच्या उदाविन गुंडाजी पाटलाला जरी ते फांसे मिळाले असते तरी त्यानें सुद्धां पांडवांचें राज्य हां हां म्हणतां जिंकून घेतलें असतें ! ( हात चोळतो )

**भानुमती**:–ऐश्वर्याची इच्छा जर नसली आणि गदायुद्धाचीच नुसती खुमखुमी असली तर......

**गद्यगदाधर**:––काय बायकांची भाषा आहे? नाजुक!

**अमरव्या**:––खुमखुमी आग खाजश्च ऐटी कंडू रगःस्तथा. इति पंचशरे.

**खुशालराव**:–( डोकें खाजवीत पुढचे पद ह्मणतात )

' पुरुषासि स्त्री ज्ञानमाला......'

...पुरुषवपुसि अर्पि शौर्याला इहलोकीं बहुदिन सुखविलास फळ मिळवी अबला " ह्मणजे काय ?

**मार्मिकराव**:–बरोबर आहे! पुरुष धारातीर्थी मरण पावले तरी बायकांना सुखविलास बहुदिन भोगतां येतात.

**अर्थभट**:–तें कसें काय ?

**मार्मिकराव**:–पुनर्विवाह करून. उघडच आहे।

**खुशालराव**:–-( संतापानें केंस उपटीत प्रवेश ४ था सुरवात करतात ) असूं जे करतां सुयोधनानें युद्धाचें आव्हान दिलें. पांडव द्यूत खेळले तर श्रीकृष्णाची अग्रपूजा मान्य करायला कौरव तयार आहेत. ही शकुनीनें सुचविलेली द्यूताची तडजोड जर पांडवांनीं मान्य केली नाहीं तर दुर्योधनाच्या युद्धाच्या आव्हानाला धृतराष्ट्र महाराजांनांहि उचलून धरणें भाग आहे असा धृतराष्ट्राचा निरोप घेऊन विदुर पांडवांकडे येतो. द्रौपदी विदुर संवाद, द्रौपदीची कृष्णस्तुति, द्रौपदीची द्यूताला संमती या प्रमाणें रा. खुशालरावांनीं दुसऱ्या अंकाचाप्रवेश ४ था सारांश थोडक्यांत सांगितल्यावर वाचनास सुरवात झाली.

**विदुराचे भाषण**:—( वर सारांशात लिहिल्याप्रमाणें ) निरोप धर्मराजाला कळविलाच आहे. सुयोधनाच्या देखत कळविला ह्मणजे माझ्या कर्तव्यांतून मी सुटलों, माझा सल्ला मी आपण होऊन द्यावा।

असें मला क्षणोक्षणी वाटतें पण निरोप्या (!) पडलों. मनाची कशी चोहोंकडून कुचंबणूक होते आहे. ”

**भारताचार्यः**—‘ तुह्मी द्युत खेळा नाहीतर युद्धाला तयार व्हा ’ असा निरोप मूळ भारत पाहिलें तर धृतराष्ट्रानें मुळींच सांगितला नाहीं. या कवीची ही एक कपोल कल्पित कादंबरी आहे ! आणि यांच्या या कादंबरीमुळें विदुर दुर्योधन द्रौपदी व धर्म या पात्रांचे पुढें कसेकसे हाल झाले आहेत तें दिसून येईलच.

**खुशालराव पुढें वाचतातः**—‘ द्रौपदी ’ ह्मणजे विदुर मामंजींना ही पांचाली नमस्कार करते आहे.

**चित्रवर्माः**—पहिल्या अंकांतील द्रौपदी वरीच माणसाळली ह्मणायची ! !

**अभिनयरावः**—अंकाचा पडदा पडल्यानंतर पोषाकांत किंवा स्वभावांत मोठा थोरला फरक करून दाखविणें हें नाट्यशास्त्राला उचितच आहे.

**रंगवर्माः**—विदुरमामंजीना नमस्कार करून नंतर ही द्रौपदी जी मोठ्या तोऱ्यानें ‘ अथा तो ब्रह्मजिज्ञासा ’ वगैरे पूर्वपक्ष उत्तरपक्ष सबंध आठ पानें कृष्णाची मिमांसा करीत मोठ्या थाटानें विदुरासारख्या वृद्ध सासऱ्या समोर उभी रहात आहे. व आपल्या सासऱ्याला बसायास कांहीं एक आसन न देतां त्याला ही उभा करते हें चित्र मोठेसें सुखावह नाहीं. सासऱ्याला नुसतां नमस्कार केल्यानें पहिल्या अंकांतील उद्दामपणा नाहींसा झाला नाहीं याचेंच तें द्योतक आहे.

**खुशालरावः**—जाऊन द्याहो ! गाणें कसें काय होते तें पहा. पदः—

‘ ( ठरला जणूं मत्सर राजा, वृद्ध तरुण बांधिति पूजा ) ’

**खुशालरावः**—[ पाठ चोळीत ) पान ४१ वरील द्रौपदीचें भाषण वाचतात. ‘ गदा-युद्धांत आणि धनुयुद्धांत पांडवांची बरोबरी

3222

करण्याचें सामर्थ्य दुर्योधनांत नाहीं ही गोष्ट नवी नाहीं द्रोणगुरूचें शिक्षण संपल्यावर परिक्षेच्या मैदानावर हेंच ठरलें. '

**भारताचार्यः**—खोटी गोष्ट. परिक्षच्या रंगभूमीवर फारच निराळा प्रकार मूळ भारतांत वर्णन केलेला आहे. आदिपर्वांतील १३७ अध्याय नीटपणें वांचला तर असें आढळून येईल कीं, दुर्योधनानें कर्णाची बाजू घेऊन त्याला अंगदेशाच्या राज्याचा अभिषेक तेथल्या तेथेंच केला आणि हें माझें करणें ज्या मनुष्याला खपत नसेल त्यानें रथावर चढून धनुष्या-वर पाय द्यावा, अशी क्षात्रप्रतिज्ञा करून अर्जुनाला आव्हान दिलें असतांही अर्जुन मुकाट्यानें बसला. '

**खुशालराव**:—( सदरहु नाटकांतील वरील वाक्य खोडून टाकून पुढें वाचतात. ) ' मत्सरानें पेटविलेल्या लाक्षा गृहाच्या अग्नीनें हेंच ठरलें.

**भारताचार्यः**—द्यूतगृहाच्या कारस्थानांत कर्णाचें अंग फारच थोडें होतें असें म्हटलें तरी चालेल. ती सारी मसलत सौबल, शकुनी दुर्योधन, दुःशासन व धृतराष्ट्र यांची होती. त्या मसलतीनें गदायुद्धाची किंवा धनुर्युद्धाची परिक्षा होऊन त्यांत कर्ण किंवा दुर्योधन हरला असा प्रकार मुळींच घडला नाहीं.

**खुशालराव**:—' माझ्या स्वयंवराच्या वेळीं हेंच ठरलें.

**भारताचार्यः**—खोटी गोष्ट, मुळ महाभारतातील स्वयंवर पर्वता-लक्ष्यभेद करण्याकरतां जें धनुष्य ठेवलें होते तें वांकाविण्याचें कामीं सर्व राजांची दुर्दशा झाल्यावर धनुर्धरामध्यें श्रेष्ठ असा कर्ण त्या धनुष्यासमीप गेला व त्यानें तें धनुष्य उचलून चट्दिशीं वर धरलें. व तें सज्ज करून त्यावर हां हां म्हणतां बाण जोडलें. हा प्रकार पहातांच पांडुपुत्रांना कर्णानें ते लक्ष्य भिन्न करून भूमीवर पाडलेच कीं काय असें वाटलें ! परंतु त्या कर्णास पहातांच द्रौपदीनें ' मी सूत जातीच्या

पुरुषास वरावयाची नाहीं ' असें मोठ्यानें सांगितलें तेव्हां क्रोधानें कर्णानें तें धनुष्य टाकून दिलें. आणि पुढें द्रौपदीनें अर्जुनाला माळ घातल्यानंतर जी थोडीशी चकमक झाली त्यांत ही " ब्राह्मतेज आजिंक्य आवे " असें महारथी कर्णाला वाटलें आणि म्हणून ब्राह्मण वेषधारी अर्जुनाशीं युद्ध करण्याचें आपण होऊन बंद केलें या प्रमाणें खरा प्रकार असतांना द्रौपदीची ही गर्वोक्ती खोटी असून अनाठायीं आहे.

**खुशालराव**:—" खांडव वनांत हेंच ठरलें. "

**भारताचार्य**:—खोटी गोष्ट. कृष्णाच्या मदतीनें अर्जुनानें खांडव वनाचा दाह करून दिला. त्या प्रसंगीं पांडव, आणि दुर्योधन यांच्या गदा युद्धाची किंवा धर्मयुद्धाची कोणतीच कसोटी लागली नव्हती.

**खुशालराव**:—" दिग्विजयाच्या वेळीं हेंच ठरलें "

**भारताचार्य**:— सपशेल खोटें ! " दिग्विजय " पर्व वाचा त्यांत कर्णाची आणि अर्जुनाची लढाई कोठेंच सांपडणार नाहीं. आदिपर्वांतील १३८ व्या अध्यायांत द्रुपदावर केलेल्या स्वारीचें वर्णन आहे आणि त्यांत मात्र दुर्योधन आणि कर्ण यांचा द्रुपदानें पराभव केला असतां अर्जुनानें पुढें येऊन द्रुपदाला जिंकून आणलें आहे. याप्रमाणें खरा प्रकार असतां वाटेल त्या प्रकारची खोटी दर्पोक्ति द्रौपदीनें प्रत्यक्ष आपल्या सासऱ्या समक्ष उच्चारावी ! याहून महाभारतांतील उदात्त चित्रांची विटंबना दुसरी ती काय असणार !

**खुशालराव**:—( तोंडातला जळता चिरूट भारताचार्यांच्या डोक्यावर धरून ) मरो तें महाभारत आणि त्यांतील पात्रें ! द्रौपदीचें भाषण चटकदार वाटतें कीं नाहीं बोला ?

**मार्मिकराव**:—मग तिकटाबरोबर लसणेची नुसती चटणी जरी प्रेक्षकाना दिली तरि काम भागेल ! हो ! म्हणजे असली खोटी दिमाख

दाखविणारी द्रौपदी पहाण्याचें हाल नकोत. नुसतेच पैसे गेले म्हणायचें चालेल ! !

**रा. खुशालराव**:—( ही चटकदार सूचना कंपनीकडे पाठवून) ते पुढें वाचतातः—द्रौपदीचें पान ४१–४२ वरील कृष्णाबद्दल उद्गार.

**अर्थभट**:—द्रौपदीचें हें कृष्णाबद्दलचे व्याख्यान अगदीं अप्रस्तुत आहे.

**पदेशास्त्री**:—' विसटशानी कोंदटला ' हें पद मात्र त्यांतल्यात्यांत ठीक आहे.

**रा. खुशालराव**:—( जोरानें येऊन पान ४३ वरील भीमाचें भाषण वाचतात. )

आम्ही साफ द्यूत खेळणार नाहीं...... द्यूत दुर्बळांकरितां आहे. कपट्यांकरितां आहे......मी जिवत दैव आहे......वगैरे सर्व

**कुठार क्लब**:—( उभा राहून टाळ्या वाजवितो. )

**गद्गदाधर**:—शाबास ! या ठिकाणीं मात्र रा. खाडिलकर जागे होऊन नाटक लिहित आहेत असा भास होतो. हें सर्व भाषण फार चांगलें व भीमाला शोभेसें आहे.

**रा. खुशालराव**:—[ द्रौपदीः—मामंजी त्यांच्या हातून भलताच अविचार होईल आपण जा त्यांच्या मागून आणि विवेकाच्या गोष्टी सांगून त्यांना अगोदरच शांत करा. ]

**मार्मिकराव**:—[ द्रौपदीचा कान धरून ] अग सटवे ! अविचार तो काय होणार ! जुगार खेळूं नका असें खडखडीत धर्माला भीमानें बजावणें हा तुझ्या मतें अविचार वाटतं ! वा ! कमाल झाली आतां ! !

**गुल्कंदे**:—( कान चोळीत पान ४४–४५ वरील द्रौपदीचें

ग्रंथ नं. ता.

भाषण वाचतात. व " जगला कशासि चेला ' ', लढवूं गुरुला रणीं नका " हीं पदें घोळून घोळून म्हणतात. )

**भारताचार्यः**—पुरे पुरे ! नाहीं ऐकवत ! " आज जर आम्ही द्यूत खेळावयाचें नाकारलें तर अग्रपूजेचें निमित्त पुढें करून मोठ्या संग्रामाला प्रारंभ होईल. व श्रीकृष्णाच्या अग्रपूजेच्या अभिमानाला बळी पडून पांडव लढाईला उभे राहिलें, व त्या निमित्तानें श्रीकृष्णाची निंदा सुरूं होईल व म्हणून धर्म राजांनीं द्यूत खेळायचें पसंत केलें तर त्यांच्या इच्छे विरुद्ध मी एक ब्रही बोलणार नाहीं " याप्रमाणें द्रौपदीच्या भाषणांतलि भावार्थ आहे आणि हा भावार्थ द्रौपदीच्या अंगीं लावणें म्हणजे भारतांतल्या खऱ्या द्रौपदीच्या तोंडाला काळोखी फासणें आहे.

**मार्मिकराव**:—अहो ही पॉलीसी ! ! ! कृष्णाची अग्रपूजा पचलीच. दुर्योधनाची फजिती मयसभेत उडविलीच. आतां दुर्योधन म्हणतो जुगार खेळा, नाहीं तर युद्ध करा, नाहीं तर माझी अग्रपूजा करा. धूर्त आणि मुत्सद्दी स्त्री काय काय पत्करील सांगा बरें ?

**अर्थभटः**—द्रौपदी ही क्षत्रिय भूपकन्यक असून क्षत्रिय भूप पत्नि आहे. ती युद्धच पत्करलि.

**चित्रवर्माः**—तिनें युद्ध पत्करणें हेंच नाट्यचित्र ज्यास्ती जोरदार दिसेल.

**भारताचार्यः**—आदिपर्व अध्याय १६७ वाचा " वरारोहा कृष्णा ( द्रौपदी- कृष्णवर्णा ) क्षत्रियांचा संहार करण्याच्या इच्छेनें उत्पन्न झाली आहे " असें द्रौपदीचें स्पष्ट वर्णन आहे या प्रमाणें विचार केला तर तिनें-तिनेंच काय पण कोणत्याहि प्राचीन आर्य क्षत्रिय स्त्रीनें युद्धच पत्करलें असतें.

**मार्मिकराव**:—महामूर्ख अहांत तुम्ही सारे ! अहो शंख शिरोमणीं लढाईचा प्रसंग टाळून द्यूत खेळायला म्हणा--पहायला म्हणा-

मिळतं-वरं बाजू अंगावर आली तर राजसूयज्ञांत पुष्कळ आहेर मिळाला आहे ! जाईल थोडा त्यांतला-बाजू उलटून दुर्योधन हरला मग काय विचारूंच नका ! ! ' लाजविलें वैर्‍यांना , हें पद पुन्हां म्हणायला तयारी ! याचं नांव मुत्सद्दीपणा ! आणि म्हणूनच आमच्या या ता. १ डिसेंबर १९२० मु. मुंबईच्या द्रौपदीनें जुगाराचा डाव पसंत केला:
( God bless her! ! )

**भारताचार्य**:---शिव शिव ! द्रौपदीनें जुगाराला जाणून बुजून संमती द्यावी. ! आणि असा प्रकार रा॰ खाडिलकर यांच्या सारख्या विद्वान पदवीधर महाराष्ट्र लेखकांनीं रंगभूमिवर दाखवावा हें कोणाही भारताभिमान्याला सहन होणार नाहीं. मूळ महाभारतांत फारच निराळा प्रकार आहे ' दुर्योधनाचा इष्ट पाहून केवळ स्नेही या नात्यानें तुम्ही द्यूत वगैरे मनोरंजन क्रीडेकरितां आमच्येकडे या असा निरोप धृतराष्ट्रानें विदुराहातीं पाठविलेला आहे. व कोणाचीही सल्ला न घेतां केवळ चुलत्याची मर्जी म्हणून व द्यूताचा नाद म्हणून धर्मानें सहज द्यूताला प्रारंभ केला आहे पण पुढें इर्षेनें पण लावत चालले व शकुनी द्यूतांत अत्यंत प्रवीण म्हणून धर्मराज फसत गेले. अशापैकीं तो प्रकार आहे ही गोष्ट किती साधी, सहज घडून येण्यासारखी, व खुबीदार आहे. अशा साध्या रम्य मनोरम कथानकाची होळी करून अग्रपूजेचा भलताच वाद उपस्थित करून शेवटीं द्रौपदीनें दुर्योधनाची अग्रपूजा, युद्ध जुगार या तीन गोष्टी पैकीं जुगार पसंत करावा, म्हणजे श्रीकृष्णांनीं कर्म योगाचें रहस्य सांगितल्यावर अर्जुनाला युद्ध न करतां दारूच्या गुत्यात जाऊन यथेष्ट दारू पी असा उपदेश करण्यापैकींच आहे. ! ! !

**मार्मिकराव**:---अहो पण युद्धच सुरू झालें तर श्रीकृष्णानिंदेची नौबद गाजूं लागली असतीना ? द्रौपदी काय म्हणते पहा नीट. कृष्ण केव्हां मेले केव्हां जिवंत झाले; जिवंत असून मेल्यासारखें कसें पडले कोणत्या नात्या पुरते मेले आहेत ! त्यांचे निश्चकार्य काय आहे ! खोलांत जाऊन पहा ! मरून विचार करा उगीच काय बोलतां !

**भारताचार्यः**—श्रीकृष्णाची अग्रपूजा भर सभेंत, पुरता विचार करूनच पांडवांनीं केली व त्या अग्रपूजेचा अभिमान त्यांनीं धरला; त्याच्या आड दुर्योधन आतां येऊं पाहतो तर त्याच्याशीं युद्ध करूनच तो आमचा अभिमान ती कृष्णाची बुद्धिपुरःसर केलेली अग्रपूजा ती कृष्ण भक्ती अगदीं योग्य आहे, हें जगाला दाखवावयास हवें होतें. या अग्रपूजेच्या युद्धांत कृष्णाची निंदा जगांत झाली असती अशी शंका घेऊन युद्ध पराङ्मुख होणें अगदीं भित्रेपणाचे--मुर्खपणाचे काम ! आणि अग्रपूजेच्या या खोट्या वादामुळें हा भित्रेपणा आणि हा मूर्खपणा द्रौपदीच्या अंगीं आणावा लागला. कोणत्याही युद्धाला कारण म्हणून कांहीं तरी असतेच मग ते कारण कोणतीही व्यक्ती असो किंवा परराज्यापहाराची तामसी महत्वाकांक्षा असो, कांहींही असले तरी दुर्मतीनें युक्त जो पक्ष असेल, त्या पक्षाची निंदा जगांत होईल. युद्धाच्या कारणाची निंदा होण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. इलियड-मध्यें वर्णन केलेल्या महायुद्धांमुळें हेलनची निंदा कधीं झालेली ऐकली आहे काय ? किंवा रामरावणाच्या युद्धांमुळें सीतेची निंदा कधीं कुणी केली आहे काय ? रजपुतांच्या आणि मुसलमानांच्या लढायामुळें पद्मिनीची किंवा कृष्णकुमारीची निंदा कोणीच कधीं केलेली नाहीं. उलट पक्षीं सदरहु व्यक्तींची चरित्रें त्या त्या युद्धामुळें अधिकच उज्वल आणि हृदयंगम अशीं झालेली आहेत आणि म्हणून मी पुन्हां विचारतो कीं, अग्रपूजेच्या अभिमानानें जर या वेळीं खरोखरच कौरवपांडवामध्यें युद्ध सुरू झालें असतें तर त्यांत श्रीकृष्णाची निंदा कशी झाली असती हे कोणीही सिद्ध करून द्यावें.

उलटपक्षीं, सदभिमानाचा झेंडा उभारून पांडव युद्धाला उभे राहिलें आहेत हें पाहून सर्व जगानें पांडवांची पाठच थोपटली असती या युद्धांत द्रौपदी म्हणते त्या प्रमाणें श्रीकृष्णाला भाग घ्यावाच लागला असतां असेंही नाहीं. त्या युद्धाची सर्व

जोखीम अंगावर घेण्यास पत्करण्या इतके बलाढ्य पाण्डव खात्रीनें होते, आणि ते तसे होते म्हणूनच भरसभेंत शिशुपालादि राजांना बजावून पांडवांनीं श्रीकृष्णाची अग्रपूजा केलेली आहे. अर्घाभिहरण पर्वांत सहदेव म्हणतो " अहो शिशुपाल प्रमुख राजानों, केशि दैत्याचा वध करणाऱ्या अतुल पराक्रमी भगवान श्रीकृष्णाची जी अग्रपूजा मी केली ती तुम्हापैकीं ज्यास सहन होत नसेल त्या सर्व बलिष्ठ राजांच्या मस्तकावर हा मी आपला पाय ठेवीत आहे " या प्रमाणें वीरश्रीचें भाषण करणारा महाभारतांतला सहदेव कोठें आणि त्याचीच बायको आधुनिक कालांत अवतीर्ण झालेली श्रीकृष्णाच्या विश्वकार्याच्या कांहीं तरी गप्पा मारणारी व कौरवांबरोबर द्यूत खेळावयास संमती देणारी खाडिलकरांची द्रौपदी कोणीकडे ! याप्रमाणें भाडिमार झाल्यावर पान ४४ व ४५ यावरील द्रौपदीच्या भाषणावर रा. खुशालरावांनीं खराटा फिरविला व पान ४६ वाचूं लागले. " " कृष्णभक्तिनें भोळसट बनलेली ही द्रौपदी. "

**मार्मिकराव**:—हें मात्र अगदीं खरें आहे.

**भारताचार्य**:—भक्तिभावानें भोळसट म्हणावी तर पहिल्या अंकात तिच्या अंगीं वाघालाही लाजविणारा क्रूर स्वभाव दिसून येतो. पहिल्या अंकावरून द्रौपदी ही भक्त असेल, अशी मुळींच कल्पना येत नाहीं. दासबोधांतील भक्ताचीं लक्षणें द्रौपदीच्या अंगीं निदान पहिल्या-अंकांत तरी मुळींच दिसून येत नाहींत, आणि तिचा स्वभाव खुनशी, घमेंडखोर, गर्विष्ठ असा दाखविल्यामुळें या अंकातील तिचें श्रीकृष्ण भक्तीबद्दलचें व्याख्यान म्हणजे निव्वळ गप्पाच वाटतात. आणि त्यांचा परिणाम प्रेक्षकांवर कांहींच होत नाहीं.

पुढें कर्ण म्हणतो:—'कंस जरासंध आणि शिशुपाल ह्यांना साहसानें मारणाऱ्याची किंमत ओळखण्याइतकी वीरवृत्ति, ह्या कर्णाच्या अंगात खात्रीनें आहे. '

**भारताचार्यः**—हे कर्णाचे उद्गार महाभारतांतल्या कर्णाला मुळींच शोभणारे नाहींत.
' ज्यानें आपलें अभेद्य कवच सहज देऊन टाकलें.
" पार्थ हितार्थी वज्री । ( इंद्र ) विघ्नकरी होय उग्रतनु कीट ।
माझी मांडी फोडी परी नाहीं कांपलेचि मी धीट ॥ "
आपल्या गुरूची झोंपमोड होईल म्हणून आपली मांडी खुशाल रक्त-बंबाळ होत असतां हूं का चूं न करणारा तो खरा शिष्य, कर्ण युद्धांत ' घालुनि व--पुष्य, कंठीं वरिला धरि गारुडी जसा अहितें. '

या प्रमाणें नकुलाला पकडून जो कर्ण पुन्हां त्याला म्हणतो ' तुझ्याशीं झगडावें नकुला । त्वा त्यजुनि भीतिला जावे ' व पुढें " जा निज-ग्रहासि बापा । व्याकुळ झाली असेल माय वृथा ! कीं त्या कृष्णापाशीं नकुला आलासि संगरांत वृथा ॥ या प्रमाणें म्हणून जो कर्ण नकुलाला सोडून देतो भिमि व धर्म यांचा पराभव करूनही त्यांना ठार मारीत नाही अशा प्रकारचा खरा क्षात्र, उदारचरित वीरकर्ण कृष्णानें ज्या पद्धतीनें कंस, जरासंध व शिशुपाल यांना मारलें त्या पद्धतीला साहस पद्धती या नांवानें कधींतरी गौरवील काय ?

**मार्मिकरावः**—अहो हा कर्ण नाहीं ! हें कर्णपिशाच्च आहे काय समजलांत !

**अर्थभटः**—समजलों समजलों ! कुणीकडून तरी कृष्णाची स्तुती कौरवांच्या मुखांतून काढावयाची आहे. या कवीना ! दुसरं कांहीं नाहीं.

**मार्मिकरावः**—आतां कसें आलांत ताळ्यावर ! प्रयोगाच्या सोई करतां असले फेरफार करावे लागतात ! म्हणे कर्ण असाच नव्हता, द्रौपदी तशीच नव्हती ! द्रौपदीचें मन कर्णावर सुद्धां एकदां गेलं होतं, अशी त्यावेळची एक Scandal होती. त्या आधारावर पांडव वनांत गेल्यावर द्रौपदीनें कर्णाबरोबर लग्न करून जे आहे ते ती इंद्र-प्रस्थाची राणी होऊन बसली असा सुद्धां शेवट या नाटकाचा करतां आला

असता ! हा शेवट आनंद पर्यवसायी होऊन जुगारी नवऱ्याची खोड बायकांनीं कशी मोडावी या बोधामृताचा घुटका प्रेक्षकांच्या घशांत ओतला गेला असता ! ! अशा प्रकारच्या डूपला मी तर खात्रीनें टाळ्या दिल्या असत्या ! ! !

**रा. गुलकंदे**:—पौराणिक किंवा ऐतिहासिक नाटकें झालीं तरी त्यांत कवींना थोडी तरी मोकळीक पाहिजेच पाहिजे !

**मार्मिकराव**:—अहो थोडी कां ? ' निरंकुशः कवयः ' वृत्ती-मंजरींत म्हटलंच आहे ! !

**रा. खुशालराव**:—( कानकोरण्यानें कान पोखरीत ) पुढें वाचतो:—" शकुनी म्हणतो—' श्रीकृष्णाचा मीही एक भक्तच आहे आणि श्रीकृष्णाकडील त्या ओढयामुळेंच "

**अर्थभट**:—( गटांगळया खात ) हा कुठला ओढा ?

**मार्मिकराव**:—हा तो.

**गुलकंदे**:—अहो हा तो काय ? ओढा कुठला घेऊन बसलात !

**मार्मिकराव**:—अहो पर्वतीजवळचा आंबिलओढा ! काय समजलांत ?

**गुलकंदे**:—डोंबल तुमचं ! अहो ओढा म्हणजे (Inclination)

**अमरव्यास**:—प्रवृत्ती--मनाचा--कल-प्रेम--प्रवाह--भाव--छंद--रुचि--चित्त-वृत्ती-आकर्षण-विलोमन-भक्ती-रति-

**गद्यगदाधर**:—बस्स् बस्स् बस्स्. गद्यवर म्हणून घ्यावयाचें असेल तर लेखणी उचलली कीं, सर्व जगांतले शब्दकोश धांवत येऊन हात जोडून उभे राहिले पाहिजेत-मला-मला-घ्या-निवडा--मला जवळ ठेवा अशी अहमहमिका त्यांच्यांत सुरूं झाली पाहिजे- चला वाचा पुढें [ या प्रमाणें जे ते कालाचे ठायीं त्या बिचाऱ्या ' ओढ्याला '' आंबिल-ओढ्यांत ' मुक्ती मिळाल्यावर रा. गुलकंदे त्याच पाण्याचा गुळणा करून पुढें वाचूं लागले.

'भीमः—पांडवांना भिक्षेला लावण्याची तडजोड आम्हीं वीरांनीं स्वीकारावयाची, म्हणजे, लक्ष्मी वीरांना वाहिलेली नसते असें कबूल करणें होय.'

**अर्थभट**:---द्यूत खेळलं तर पांडवांच्या कपाळीं भिक्षा ठेवलेलीच अशी शंका भीमसेन महाराजांनीं कां घ्यावी बरं ? पण लावूनच द्यूत खेळलं पाहिजे असा कांहीं हट्ट दुर्योधनाचा नव्हता ! बरं ईर्षेनें पण लावलाच तर तो पांडवांना काय किंवा कौरवांना काय सारखाच बाधक होणार ! त्यांत इतकी भीती कसली ?

**चित्रवर्मा**:---शकुनीपुढें आपल्या वडील बंधूचं कौशल्य टिकणार नाहीं, अशी भीम दादांची खात्री होती. अत एव दारिद्र्यशंका !!!

**रंगवर्मा**:---अशी जर बहुतेक खात्री होती तर " ही विश्वाची शक्ती द्यूत समतीला पाठमोरी "कां गेली ? लाथम्होरी कां नाहीं गेली ? या घोटाळ्यापेक्षां मुळांत जो प्रकार आहे तोच अधिक बहारीचा आहे. किंवा फेरफार करावयाचा होता तर द्यूत हें निंद्यकर्म आहे, व्यसन आहे, त्याज्य आहे, याच एका सबबीवर भीमानें द्यूताच्या तडजोडीला कसून विरोध करायला हवा होता. द्यूतांत आम्हीं खास हरूं, आम्ही भिकला लागूं म्हणून आम्हीं द्यूत खेळणार नाहीं ही इथली विचारसरणी पान ४३ वरील भीमाच्या उत्कृष्ट भाषणाला अगदीं विसंगत आहे.

**रा. गुलकंदे**:---[ भीमाचें सदरहु वाक्य त्याच्याच गदेनें उखळून टाकून ] पान ४८ वरील द्रौपदीचें भाषण सुरू करतातः—आपल्या शौर्याबद्दल हा वाद नाहीं.

**मार्मिकराव**:----बरोबर आहे ! वाद पडला आहे सट्टेबाजीचा !

द्रौपदीः—कृष्णाचा स्तुतिपाठ वैऱ्यानांही आपण करायला लावला. वरपांगी कां असेना ?

**मार्मिकराव**:---( दचकून ) अरे ! कौरवांचा स्तुतिपाठ वरपांगी होता हें या भोळसर द्रौपदीला समजलं अं ! आणि हें समजून ती

त्या स्तुतिपाठावर भुलली असें दाखविते आणि समजून उमजून जुगाराला संमती देते. ही असली आधुनिक द्रौपदी जुगारप्रिय असली पाहिजे किंवा निदान जुगारी संपत्तीची हाव करणारी तरी खात्रीनें असली पाहिजे, यांत मला तर संशय वाटत नाहीं ! ! !

" द्रौपदीः----अग्रपूजेचा वाद वाढत असेल तर शकुनीच्या या तडजोडीला रुकार देण्याला कमीपणा कोणता ? "

'भीमः----श्रीकृष्णाच्या अग्रपूजेचा संबंध येतो म्हणून माझा नाइलाज आहे '

" धर्मः--- मी द्यूताला तयार आहे, मला फाशांचें व्यसन असल्यामुळें श्रीकृष्णाला माझें करणें कसें आवडेल याचीच एक शंका होती, पण त्याचा पडताळा पांचाळीकडे पाहून मी घेत असतों; पांचाळीची ना नाहीं मलाही धृतराष्ट्राचा शब्द मोडवत नाहीं, तेव्हां श्रीकृष्णाची संमती आहेच असें धरून मी चालतों "

**मार्मिकरावः**---[ पुढें वाचतात ] " रेस एक्स्प्रेसचें तिकीट काढून धर्मराज चालूं लागतात व त्यांच्या मागून नकूळ सहदेवांची जोडी ' लखपती लखपती , असा ओरडा करीत निघून जाते, "

**रा. गुलकंदेः**----( मार्मिकरावांच्या आगीनगाडीची सांखळी ओढून द्रौपदीचें पान ४९ चें पद म्हणतात. )

' साहस कर्म नका करूं आतां......भगिनी ही मागं गोविंदा वर सांग तूं शिष्यासि ' डाव पेंच चार......

**मार्मिकरावः**---वन्, टू, थ्री, चारी मुंडे चीत ! ! !

**रा. गुलकंदेः**----[ तुसरा अंक उरावर घेऊन सापशेल उताणे पडतात.]

इतिश्रीमत्भरताचार्य प्रसादात् । नाट्यकला रुक्-कुठार मात्रायाम् । चौपाटी शांति-सौधायाम् । दर्भ टीकाविद्यायाम् नाट्यशास्त्रे । कृष्णसंवादे द्रौपदीमुखें एक वळसा । उगाळित द्वितीयांकः समाप्तः । शोभनं भवतु । पुष्टी स्तुष्टिश्चास्तु । (म्हणा) तथास्तु ॥

**अंक दुसरा समाप्त.**

# अंक तिसरा.

श्री. बाबुराव लड्डे यांनीं मंडळींच्या पुढें वशा भरून फोडणीचे पोहे, कांदे पापड, वगैरे खमंग जिन्नस आणून ठेवले त्या साऱ्यांचा चट्टामट्टा करून त्यावर दोन दोन कप चहा ढोसून सर्व मंडळी पुनः वर्तुळाकार बसली व रा. खुशालराव गुलकंदे यांनीं तिसऱ्या अंकाचा सारांश सांगण्यास सुरवात केली, "अक्षपाल अक्षवतीचा राजा ह्मणून रूपवतीसह चैन करतो त्याचा मुलगा येतो व पांडव द्युतांत हरले हें वृत्त सांगतो— शीलवती येते शीलवती व रूपवती यांचें पांडवाच्या हरलेल्या संपत्तीच्या वांटणीचें भांडण, भानुमती येते--पुढच्या सर्व नाशाविषयीं तिला मनोमय साक्ष पटते--दासीच्या वेषांत द्रौपदीचा प्रवेश--दुःशासन तिला सभेंत नेण्याकरतां येतो-- द्रौपदी मी जिंकली-गेली नाहीं 'मी स्वतंत्र आहे व ह्मणून मी राजसभेंत येत नाहीं असें ह्मणून गांधारीकडे पळून जाते--नंतर द्यूत आटोपल्यावरचा द्यूतसभेचा देखावा--धृतराष्ट्र भीष्म द्रोणविदुर वगैरे -दुःशासन द्रौपदीला ओढीत आणतो-- द्रौपदीचे प्रश्न--ती दास्यत्व कबूल करीत नाहीं, असें पाहून दुर्योधन दुःशासनाला तिला नग्न करण्याविषयीं आज्ञा करतो-- द्रौपदी धांवा करते--एका वस्त्रामागून दुसरीं वस्त्रें निघतात--हा चमत्कार पाहून धृतराष्ट्र घाबरतो व पांडव व द्रौपदी यांना स्वतंत्र करतो---धृतराष्ट्र तिला तिसरा वर माग असें म्हणतो--द्रौपदी कौरवेश्वराच्या इच्छेवरून पुन्हां एकदा द्यूत होऊं द्या असा वर मागून दोन वराची फेड करते--पुन्हा द्यूत--पांडव हरतात व वनवासाला जातात. ] "

येणंप्रमाणें सारांश सांगितल्यावर गुलकंदे तिसरा अंक [ पान ५० ] वाचूं लागतात.

" अक्षपालाचें भाषणः— हस्तिनांपुरांत अक्षवतीचा राजा म्हणून राहिलो आहे. "

**चित्रवर्मः**—अक्षपालाचें हें वैभव हा राजासारखा थाट पाहून मलासुद्धां जुगार खेळावासा वाटूं लागला आहे.

**अर्थभटः**----अहो त्याच्यांतला अर्थ नाहीं तुमच्या ध्यानांत आला! जुगार खेळावा पण बरीचशी संपत्ति मिळेपर्यंत! पुढें नाहीं. संपत्ती मिळाली कीं लागलेच फांसे गटारांत टाकले पाहिजेत मनोधैर्य असावं तर अस्सं!

**मार्मिकरावः**----भगवंतानें गीतेंत स्पष्ट सांगितलें आहे 'वाटेल तें कर्म कर पण त्यांत आसक्ती ठेऊं नकोस तरच जय येईल! उदाहरणार्थ अक्षपाल!

**गद्यगदाधरः**— 'डाव सुरु झाला असला पाहिजे· एरवीं या हातांना फाशांची आठवण इतकी व्हावयाची नाहीं......ह्या वेळीं शकुनीच्या हातांत फासे खुळखुळत असले पाहिजेत...माझें हृदय आनंदानें कसं अगदीं भरून आलं आहे' इत्यादि गद्य, अक्षपालाचे तोंडीं फारच चांगलें जमलें आहे. अस्सल व्यसनी मनुष्याची ही भूमिका व हे स्वयंस्फुर्तीजन्य उद्गार फारच नैसर्गिक आहेत.'

**गुलकंदेः**—( जोरांत येऊन पुढें वाचूं लागतात. )
" मुलगाः—प्रथम मयसभा जिंकली. "

**भारताचार्यः**—( त्या मुलाचा कान पिळवटून ) खोटें बोलतोस! मूर्खा! शकुनीनें प्रथम मयसभा जिंकली काय?

**मुलगाः**---( रडत ओरडत ) म ऽ म ऽ ग का......य जिंकलें हो?

**भारताचार्यः**---उघड महाभारत, आणि द्यूतपर्वातील अध्याय ६१ वाचा. शकुनीनें कोणता पण प्रथम लावला होता तो ऐक " युधिष्ठिर म्हणतोः----हजारों भार सुवर्णानें भरलेल्या उत्तमोत्तम पेट्या माझ्या पाशीं आहेत. हा माझा अक्षय खजिना मी पणाला लावून द्यूताला आरंभ करतों " अक्षपालाचा मुलगा कान चोळीत वर सांगितल्याप्रमाणें दुरुस्ती

करतो व पुढे म्हणतो ' धर्मासकट पांचही पांडव धर्मराजांनीं एकदम पणाला लावले आणि लगेच शकुनीनें जिंकले '

**भारताचार्य**:---( त्याचा दुसरा कान पकडून ) लागलास कां पुन्हां गप्पा मारायला ! प्रत्येक भावाचें निरनिराळे पण त्यांची नांवें घेऊन एकामागून एक धर्मानें लावले आहेत. नीट वाच मूळ महाभारत, डोळे उघडून वाच आणि मग बोल. ( मुलगा त्याप्रमाणें महाभारत वाचून पाहून चुकीची दुरुस्ती म्हणून आपल्याच मुस्कटांत मारून घेतो व त्याप्रमाणें भाषा फिरवितो ) पान ५२ वरील भाषेंतील उतारे.

" **अक्षपाल**:---त्या बारा वर्षांत स्मशानांतल्या कावळ्यांची वृत्ति माझ्या अंगांत पुरी बिंबली आहे. स्मशानांतल्या कावळ्यांची नजर जशी पिंडावर असते----

अक्षपालाचा मुलगा:----बाबा त्या पिंडाना तुमच्यासारखा कावळा शिवला नाहीं.

**अक्षपाल**—शकुनी आहेना मोठा कावळा शिवायला ?

**मुलगा**:----म्हणून म्हणतों अगोदर जाऊन त्या पिंडाना आपण शिवूं या---चला लवकर कावळ्यासारखे----( जातात )

पान ५३—**रूपमती**-प्रेतावरचें वस्त्र घ्यावयाला जसे स्मशानांतले अभद्र ( वास्तविक येथें स्मशानांतले कारटे हा शब्द पाहिजे. अभद्र हा मवाळ शब्द चुकून पडला असावा. )

**शीलवती**:-मणिमंगळसूत्र माझें व तिरडी झांकायचें वस्त्र तुझें ! ( ही तिरडी कोणाची ? शब्दगांभीर्याची कीं काय ? )

**रूपमती**:—तिरडीवरचें फडकेंही बरोबर फाडून घेतलें पाहिजे. "

**गद्यगदाधर**:--शाबास "गद्यवरे !" काय भाषा आहे ! रसगंगाधर कोणता रस उत्पन्न होत आहे, कांहीं लक्ष आहे कां ?

**रसगंगाधर**: त्रिंबकेश्वराच्या कलकलेतीर्थावरचा !

**प्रसादराय**:—छे छे ! अगदीं चुकतां तुम्हीं, पुण्यपुरींतील श्री ओंकारेश्वराच्या दहनभूमीवरचाच हा रस म्हटला पाहिजे.

**गयगदाधरः**—अहो कसचा त्रिंबकेश्वर नी कसचा ओंकारेश्वर घेऊन बसलात ! हा कुचकामेश्वर आहे म्हणजे कुच् कामाचा कुजकट, कुसका, अगदीं निरर्थक फेंकून देण्यालायकीचा तो कुच्कामेश्वर ! याला धड बीभत्स म्हणतां येत नाहीं, भयानक म्हणता येत नाहीं, रौद्र म्हणता येत नाहीं, अद्भुत म्हणता येत नाहीं, कांहींच नाहीं. याला ओढून ताणून बीभत्स रस म्हटलाच तर असलीं किळसवाणी भाषणें अक्षपाल, त्याचा मुलगा व त्याच्या बायका यांच्या तोंडीं मुळींच शोभत नाहींत. व असली स्मशानभाषा या जुगाऱ्याच्या तोंडीं—त्यांची नेहमींची जुगार भाषा टाकून--कां घातली आहे हेंच समजत नाहीं.

**गुलकंदेः**—अहो या बिभत्स भाषेनें पुढें भानुमतीला अपशकून करावयाचा आहेना ? जरा पुढें वाचा. अहो आम्हा नाटककारांना किती धोरणें सांभाळायचीं असतात !

**शीघ्रकवीः**—द्यूत विजयानें आनंदित झालेल्या भानुमतीला अपश-कून करावयाचा आहेना ? ठीक आहे. ज्या स्मशानांत अक्षपालानें बारावर्षें काढलीं त्या स्मशानांतला एखादा कारटा अक्षपालाचा स्नेही याच वेळेला आणून अक्षपालाच्या गळ्याला मिठ्या मारूंद्या व नंतर भानुमतीच्या मागें लागूं द्या, म्हणजे व्यक्तीवैचित्र्य निर्माण होऊन बीभ-त्सरस योग्य व्यक्तीकडून वदवला गेला असेंही होईल. खरोखर भल-ताच रस भलत्याच्याच तोंडांत कोंबण्याच्या कामीं या कवीचा हात धरणारा या पृथ्वीतलावर कोणी असेल असें मलातर वाटत नाहीं. जुगाऱ्याच्या तोंडीं स्मशानरस ओतल्यामुळें धड जुगाररसही नाहीं, आणि स्मशानरसही नाहीं अशी अवस्था होऊन हीं सारीं भाषणें म्हणजे एक पांचट गुऱ्हाळ आहे असें वाटतें.

द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगीं धृतराष्ट्राला अपशकून करण्याकरितां महा-भारतकारांनीं प्रत्यक्ष घुबड ओरडून दाखविलें आहे. धर्मराजानें किंवा भिमानें घुबडासारखा शब्द केला व त्यामुळें धृतराष्ट्र घाबरला, असला विपरित प्रकार कांहीं केला नाहीं. एवंच काय कीं, योग्य रसोत्पत्ती

योग्य भूमिकेकडूनच झाली पाहिजे या न्यायानें पाहिलें म्हणजे या कवींनी केवढी घोड्याएवढी चूक केली आहे हें दिसून येईल.

( रा. गुलकंदे वर सांगितलेली " स्मशानवासी भाषणें " रबरानें पुसून टाकून पान ५४ वरील भानुमतीचें भाषण वाचतात. )

**भानुमतीः**—द्यूतांत जय झाला......मला आनंद व्हायला पाहिजे होता पण मन अगदीं खिन्न झालें आहे.

## पद. ( राग सोहनी )

**भानूमतीः**—" गमली मना निज सावली भूतावली ।
अशुभ नाना नव कल्पना भयचकिता जवळी ॥ "

( सर्व कुठार क्लबः—उभा राहून टाळ्या वाजवून अभिनंदन करतो )

**चित्रवर्माः**----भानुमतीच्या भाषणांतील व पद्यांतील अभिनय फार चांगला दाखविला जातो.

**रसगंगाधरः**--भविष्यकाळच्या अशुभ प्रकारची छटा या भाषणांत व या पद्यांत मार्मिक रीतीनें उमटविली आहे.

**अर्थभटः**—( डोकें खाजवीत ) भयचकिता ? ' भयचकिता ' हें विशेषण कोणाचें ?

**गुलकंदः**--भयचकिता भूतावली--भिऊन गेलेले अशी भुतावळ ती भयचकिता भुतावळी.

**अर्थभटः**----म्हणजे भुतें घाबरलीं होतीं का भानुमती घाबरली होती ?

**गुलकंदेः**—अरे हो ! भानुमती घाबरली आहे नाहीं का ! मग ' भयचकिता मना, निज सावली भुतावली गमली ' असा अन्वय करा. भिऊन गेलेल्या माझ्या मनाला माझी सावली भुतावली प्रमाणें दिसली.

**अर्थभटः**—भयचकिता मना ! हा प्रयोग सुखावह नाहीं, भयचकित मना असेंच पाहिजे.

**गुलकंदे:**--मग असें असेल, भयचकित अशी जी मी भानुमती त्या भय्चकिता भानुमती जवळी नाना अशुभ कल्पना (येती.)

**अथभट:**—असो. अर्थाच्या दृष्टीनें शंभरा पैकी दहा मार्क.

रा. गुलकंदे निराशेचे चुटके गिळीत पान ५५ वरील प्रवेश २ वाचतात.

( द्रौपदीचें दासीच्या वेषांत भाषण.....पांचही पांडवांना पणाला लावून फाशानें गमावलेलें, फाशाच्याच जोरावर पुन्हा कमावण्याची दैवाची परीक्षा आपण कशाला पाहिलीत ! )

**भारताचार्य**—( द्रौपदीचा कान धरून पान ५५ व ४९ वरील तिचें भाषण तिच्या डोळ्यापुढें धरतो. ) द्रौपदी, श्रीकृष्णाच्या अग्रपूजेचें निमित्त करून युद्धाला कदाचित् प्रारंभ होईल, तो टाळावा ह्मणून तूं द्यूताला जाणून बुजून संमती दिली आहेस. आतां त्या द्यूतांत पांडव सर्वस्वी हरले इतकेंच नाहीं, पण त्यांनीं मोठ्या धैर्यानें व चिकाटीनें आपले देह सुद्धां पणाला लावून दैवाची पुरी पुरी परीक्षा करून पाहिली यांत त्या द्यूतप्रिय धर्मराजाचा काय बरें दोष ! आम्ही दरिद्री झालों तरी कृष्णानें कोणतेंही साहसकर्म आमच्याकरतां करूं नये असा उलट उपदेश करणारी तूं महाभक्त, श्रीकृष्णाची पट्टशिष्यीण, अशी तूं महासाध्वी, महापतिव्रता, ती तूं द्यूताला अगोदर संमती देतेस आणि धर्मराजांनीं तुझ्या संमती बरहुकूम आपले देह पणाला लावले ह्मणून आतां तूं आपल्या नवऱ्यांच्या नांवानें खडे फोडतेस ! शाबास !

( द्रौपदी कान चोळते—गुलकंदे तिचे डोळे पुसतो. )

" शत्रूनें कपटानें त्यांना दास्याच्या खड्डयांत लोटून दिलें " हें वाक्य तूंच उच्चारतेस ? ह्मणजे शकुनी हा कपटद्यूतांत प्रवीण आहे. हें तूं जाणतेस आणि पुन्हा पान ७३ वर पांडव स्वतंत्र व सशस्त्र झाल्यावर-सुद्धां--कौरवेश्वरासारख्या नीच व दुष्ट माणसाची केवळ इच्छा ह्मणून-पुन्हा पण लावून द्यूत खेळायला आपल्या नवऱ्यांना पुन्हा भाग पाडतेस ? ही तर द्रौपदीच्या अकलेची कमाल झाली म्हणायची ! ! !

असली द्रौपदी मूळभारतांत मुळींच नाहीं ही खाडिलकरी अद्‌भुत् आधुनिक द्रौपदी एकतर अत्यंत द्यूतप्रिय असली पाहिजे किंवा महा-मूर्ख तरी असली पाहिजे ! !

( रा. गुलकंदे धाडकन् मूर्छित पडतात व रा. बाबुराव लट्ठे महाभारतानें त्यांना वारा घालतात. रा. गुलकंदे कांहीं वेळानें सावध होऊन पान ६६ वरील द्रौपदीचें पद कळवळून ह्मणतात. )

पद ( राग जोगी. )

कैसा घेतला ' घातुक बोजा ' ।
शौर्या विसरुनिया सेवावा दुजा ॥
कौरवराजा कौरव काजा ।
जुंपवितो अजि पांडव तेजा ॥

**मार्मिकराव**—( हलुच पुटपुटतो ) " कवितेचा हा बेंडवाजा ! ! "

" गुलकंदे तबल्याचा बोजा डोक्यांत मारून घेतात व पुढें वाचतात. पान ५७ द्रौपदीचें भाषणः—पुरुषांनीं स्वतः पाहिजे तर बिघडावें, पण आपल्या अगोदर बायकांना बिघडवूं नये. कारण पतित झालेल्या पुरुषांचा उद्धार बायका करूं शकतात. )

**गद्यगदाधर**—सुरेख ! हें वाक्य फार नामी आहे. ( रा. गुलकंदे जोरांत येऊन द्रौपदीचें पद म्हणतात. )

पद.

नेमिली अबला—काया पतित उद्धाराया ।
मारित पातक आला थकवा ।
विसावा देती कुलस्त्रिया ॥

**अर्थभट**—थकवा आलेला मनुष्य जे आहेत्ते कोठें जातो बरें ?

**मार्मिकराव**—गोखल्यांच्या " सुख—शांति ग्रहांत ! ! "

**अर्थभट**—अबला—काया पतित उद्धाराया नेमिली, किमु पुरुषकाया संतति निर्माया नेमिली ? इति शंका ! !

**मार्मिकराव**—हें डिप्रेस्डक्लास मिशन आहे हो ! असें काय करतां ! चला. तुमच्या शंका, लघुशंका सान्या व्या आटपून लवकर आणि चला कसे त्या " कुलस्त्रियांच्या विश्रांति गृहांत " चहा प्यायला एक सिंगल ! थकवा आला आहेना तुह्माला ? मग व्हा पुढें ! !

( बाबुराव लड्डे खरोखरच चहाची किटली आणून मार्मिकरावांच्या घशांत ओततो, तेव्हां मार्मिकराव शांत होतो. )

**अर्थभट**—अबलेची काया कांहीं पतित उद्धारित नाहींत. उलट अबलेच्या कायेमुळेंच पुरुष पतित होतो. उद्धाराला अबलेची काया मुळींच उपयोगीं पडत नाहीं. पातकी लोकांचा उद्धार अबलांच्या हातून होतच असला तर तो त्यांच्या अनेक सद्गुणामुळेंच होतो. त्यांचें पातिव्रत्य त्यांची प्रबल व सात्विक इच्छाशक्ति, व त्यांचा दिव्य–मनोनिग्रह असल्या मानसिक अस्त्रांनींच त्या पतितांचा उद्धार करूं शकतात. त्या अर्थी काया हा शब्द येथें चूक आहे. बरें दुसन्या ओळींत ' मारित पातक आला थकवा ' ह्मणजे काय ? पातकानें पतित झालेला मनुष्य अधिकाधिक अधोगतीला जात असतो, हा भावार्थ, पण या कवीश्वरांची डिक्शन् म्ह णून जी आहे, ती मात्र थकवा आणते खास ! !

( तदनंतर थकवा आलेले रा. गुलकंदे मोठ्या कष्टानें पान ६०, प्रवेश ३ सुरू करतात. )

**भारताचार्य**—थांबा, थांबा ! कायहो द्रौपदी वस्त्रहरण नाटकांत द्रौपदीचें वस्त्रहरण होण्याला जें मुख्य कारण द्यूत, त्या द्यूताचा प्रत्यक्ष देखावा या कवींनीं कां बरें दाखविला नाहीं.

**गुलकंदे**—द्यूताचा प्रत्यक्ष सीन दाखविला नसला तरी त्याची रंगी तालीम अक्षपाल व शकुनी यांनीं करून दाखविलीच आहे.

**चित्रवर्मा**—पाय चेपण्यापर्यंत आलेल्या दुष्यंत–शकुंतलेच्या शृंगारचेष्टा पडद्यांत दाखवून त्यांची नक्कल मांडव्यादिकांच्या तोंडीं घातली असती तरीहि चालले असतें ह्मणावयाचें ! !

**गुलकंदे**—द्यूताचा सीन ह्मणजे बैठा सीन तसल्या प्रवेशानें प्रेक्षकांना कंटाळा आला असता,

**भारताचार्य**—नाटकाची उभारणी ज्या प्रवेशावर झाली आहे, ज्या प्रवेशावर उत्तरोत्तर दुष्टोत्कर्षाची पराकाष्ठा, पांडवाना भरसभेंत नग्नस्थितींत बसविण्यापर्यंत दाखवितां आली असती. ( द्यूत पर्व अध्याय ६८ वाचा ) ज्या सभेत धर्मराजासारखा महाविद्वान राजा सहज मौजेनें द्यूत खेळावयास प्रथम कसा बसला व पुढें ईर्षेनें एकएक वस्तु पणाला लावीत कसा सुटला, हें मोठ्या चातुर्यानें दाखवितां आलें असतें, ज्या प्रवेशांत भीमाच्या इच्छाशक्तीनें फांशासारख्या निर्जीव वस्तूसुद्धां सचेतन उलट्यापालट्या कशा होतात हें दिसलें असतें, ज्या प्रवेशांत दुर्योधनाचा कावेबाजपणा, धृतराष्ट्राचा आपमतलबी स्वभाव शकुनीचा कार्यसाधुभाव, धर्मराजाचा सरळ भोळा व व्यसनी स्वभाव हीं मोठ्या मार्मिक रीतीनें दाखवता आली असती, ज्या प्रवेशांत व्यसनी मनुष्य अधिक वाहत कसा जातो हें प्रत्यक्ष दाखवितां आलें असतें त्या प्रवेशांत पांचपांडवांची अद्‌भुत एकी व धाकट्या भावांचा विलक्षण आज्ञाधारकपणा हीं मोठया खुबीनें दाखवितां आली असतीं असा हा अत्यंत महत्त्वाचा द्यूताचा प्रवेश कीं; जो वर्णन करायला महाभारतकारांनां अध्याय ५८ पासून अध्याय ६६ ( द्यूतपर्व ) खर्च करावेसे वाटले असा हा द्यूताचा प्रवेश या कविवर्यांनीं समूळ गाळून त्याचा सारांश विष्कंभक रूपानें गौणपात्रांच्या तोंडून वदवावा हें भयंकर अरसिकतेचें द्योतक आहे. असा हा द्यूताचा प्रवेश कंटाळवाणा न होतां अत्यंत मनोरमच झाला पाहिजे. आणि असें ज्याला करतां येणार नाहीं त्यानें पौराणिक नाटकें न लिहिणेंच उत्तम. अस्तु पुढें वाचा.

रा. गुलकंदे धाम पुशीत पान ६० प्रवेश ३ वाचतात.

" दुर्योधन—कर्णा, ओढीत आणिली द्रौपदीला दुःशासनानें ! "

**मार्मिकरावः**—( ओरिएंटल ट्रान्सेलेटरच्या खुर्चीवर बसून ) Oh Karna ! here is being dragged Draupadi by Dushyasan ! कैसी कही ?

रा. गुलकंदे गाऊं लागतात.

इतक्यांत बाबुराव लट्टे बेसनचा एक लाडू त्यांच्या घशांत सोडतो. गुलकंदे गुपचुप खाऊं लागतात. व पुढें वाचतात पान ६१

द्रौपदी—धृतराष्ट्र महाराज आपल्या मातोश्रीचा आणि आपल्या आजीचा जो स्त्रीपणा तोच ह्या द्रौपदीचा स्त्रीपणा ! !

**गद्यगदाधर**—लागली आईबापावरून शिव्या द्यायला ! !

**रा. गुलकंदे**—( जोरानें गातात )

दुर्योधन—" तृणसम कुरुवर मानियला...कां न तोंचि आजि परतुनी द्यावे घ्यावे भरपूर माप उलट हिला " ! !

**पदेशास्त्री**—कविता देवीच्या पदरांत असल्या गचाळ पदांचें भरपूर माप घालणाऱ्या वरपुरुष वासुदेव कविकुलाल श्रेष्ठा, तुला शंभर वर्षें आयुष्य, पदे न करण्याबद्दल असो ! चिरंजीव भव !

" पान ६७ द्रौपदीचें कृष्णावरचें व्याख्यान " श्रीकृष्णाचें साहसाचें अवतारकृत्य संपलें आहे. "

**मार्मिकराव**— हा कोण बोलतो आहे हो !

**गुलकंदे**—अहो ही द्रौपदी बोलते आहे.

**मार्मिकराव**—काय ? ही द्रौपदी बोलते आहे ! मला वाटलं " श्रीकृष्णाचें साहसाचें अवतारकार्य संपलें आहे. स्वतः त्यांनीं जें केलें तें तें शिष्याकडून करविणार आहेत. केलें करविलें आणि मग सांगितलें."

अशा प्रकारचें पोक्त भविष्य, अधिकारयुक्त वाणीनें सांगणारा कोणी व्यास आहे का, रुरुहिडिंब आहे का वालखिल्य आहे यापैकीं कोणीतरी खास असावा ! ! !

**भारताचार्य**—भक्त ह्मणजे भक्त कृष्ण–भक्तांनीं कृष्णचरित्रावर चिकित्सा बुद्धीनें टीका केलेली महाभारतांत तरी तुह्माला सापडणार नाहीं. त्यांतून ही स्त्रीजातीची भक्त, त्यांतून द्रौपदी हिनें अशा प्रकारानें कृष्णावतार कार्य ह्मणजे काय तें केव्हां सुरूं झालें, केव्हां समाप्त झालें, अशा प्रकारची टीका भर दरबारांत करणें ही भक्तीची नसून भक्तीची केवळ थट्टा होय.

**गुलकंदे**—( न जुमानतां–अंगांत आल्यासारखे करून द्रौपदीचें पान ६५ वरील पद ह्मणतो. )

**पद.**

मज भय न, असा शिरला वारा ॥
देवाजीचें काज खरोखर मी करीन,
हा माझा तोरा ॥
असतांना वनसंचार मनीं ।
कोण पुसे तुमच्या जोरा ॥

**मार्मिकराव**—( एकदम उठून कडक लक्ष्मीसारखें घुमतो व महाभारताच्या चाबकानें आपलेच आंग सडकून काढीत सर्व थिएटर डोक्यावर घेऊन नाचूं लागतो, व खालील पद ह्मणतो. रा. ठोकताळ्यांनीं डग्यावर " गुबु गुबु गुबु कडक ! गुबु गुबु गुबु गुबु कडक " असा ताल धरला.

**पद.**

मज भय न असा शिरला वारा ।
काव्याचें मी कामचि काढिन
लाजवीन चोरा शिर जोरा ॥
असतांना धनसचार मनीं ।
कोणपुस रसिका जोरा ॥

**रा. गुलकंदे**—( मार खात पान ६६ वरील द्रौपदीचें भाषण वाचूं लागतात—

' धृतराष्ट्रमहाराज, या लाजिरवाण्या स्थितीचीं दुःखें मी एकटीनें सोसली पाहिजेत. आणि ती मीं निमूटपणें सोसतें आहे.

**गद्यगदाधर**—अरेरे काय हे केविलवाणें भाषण ! " माझ्या अंगांत वारं शिरलं आहे. माझा तोरा पहा ? कोण पुसे तुमच्या जोरा ? " वगैरे ताठ्यानें ह्मणणारी द्रौपदी पुढें लागलीच ' मीं सोसते हो बाई हीं सारी संकटं ! काय वाटेल तसं करा ' असें दीनवाणीनें ह्मणते. अरेरे ! !

**चित्रवर्मेः**—जाऊं द्या हो पद ह्मटलं ह्मणजे मागचा पुढचा संदर्भ बहुतेक सुटत असतो. नटांच्या ताना जितक्या अधिक, तितकी संदर्भाची तार ताणली जातेच.

**रा. गुलकंदेः**—( गळ्याची तार जमवीत पान ६६ व ६७ वरील दुर्योधनाचें भाषण वाचतो. ) " दुर्योधनाचा पण असा आहे कीं, पांडव जर खेळले त्यांत पुन्हा द्यूत त्यांनीं जिंकलें तर साम्राज्यलक्ष्मी पांडवाची......वगैरे. "

**गद्यगदाधरः**—आतां वेळपर्यंत, मोठ्या चातुर्यानें व कपटानें फसविलेल्या पांडवांची साम्राज्यलक्ष्मी नुकतीच पुरती मिळवून ढेंकर देत बसणारा दुर्योधन असला मूर्खपणाचा पण कधींच लावणार नाहीं. ही सारी क्लृप्ती कवींची ! मुळांत याला मुळींच आधार नाहीं. एवंच काय ? चुकलेला कथाभाग या ग्रंथकर्त्यांचा व बरोबर असलेला भाग मूळ महाभारतातला हें नक्की समजावें.

**रा. गुलकंदेः**—पण या अटीला द्रौपदीच्या दास्यत्वाची बळकटी आहेना ! आणि ती बळकटी अशी भक्कम आहे कीं, तिच्यापुढें दुर्योधनाचा कोणताही मूर्खपणाचा पण सहज रद्द झाला असता--म्हणून हा असला पण लावला आहे. ती एक चूक आहे.

**भारताचार्यः**—ही अट ठीक आहे पण तीमुळें दुर्योधन मूर्ख नसता दाखविला तर चांगलें झालें असतें. या नंतर पान ६७ वरील दुर्योधनाचें पद सुरू झालें.

" जरि न आतां घांसशील नाका ।
तुज कौरव शंभर बांधव करितील बटिका ॥
कृष्ण सख्यासी मारशील हाका ।
ऐसा धांवा ठरेल परि लटिका ॥

**अर्थभटः**—" नाका घांसशील " ! नाक घांसणें ही शुद्ध मराठी ह्मण आहे. मराठी ह्मणी तुम्हाला पद्यांत घालावयाच्या असतील तर त्या जशाच्या तशाच घातल्या पाहिजेत. ह्मणजे शब्द गौरवाची हानी होत नाहीं. नाक घांस हा शब्दप्रयोग पद्यांत एक वेळ चालेल पण " नाका घास " हा शब्दप्रयोग घालणें ह्मणजे त्या ह्मणीचा चुथडा करून टाकणें होय, व असा विकृत प्रयोग कानाला अगदीं कटू लागतो. याला प्रयोगाभंग--न्याय म्हणतात. शब्द प्रयोगाचें अभंगत्व कायम ठेवणें ही एक लेखकांवर मोठी जबाबदारी असते. हाक मारणें किंवा हाका मारणें हे दोनही प्रयोग बरोबर आहेत, म्हणून मारशील हाका हें चालेल पण ' घांसशील नाका ' हें केव्हांही चालणार नाहीं. दुसरें उदाहरण ' डोळे वटारणें ' ही म्हण घ्या. या जागीं ' नयन वटारणें ' किंवा त्याहूनही ' नयना वटारणें ' हा प्रयोग कर्ण कटूच लागला पाहिजे. याच नाटकांतील पान १६ वरील पद पहा, त्यांत ' करील दैव तरी वक्रचि डोळा ' येथें ' दैव वाकडा डोळा करील ' ही ह्मण जशीच्या तशीच ठेवली असती तर त्या चरणांत प्रसाद वाटला असता ' वांकडा डोळा ' या ऐवजी ' वक्र डोळा ' हा प्रयोग कधींहि चालणार नाहीं. या बाबतींत रा. देवल यांना मी फारच चांगले मार्क देतों. त्यांचीं शारदा नाटकांतील पदें, चमत्कृति जनक काव्यें नसलीं तरी त्यांत मराठी ह्मणींचे वर दाखविल्या प्रमाणें खून पाडले नाहींत, व त्यामुळेंच तीं पद्यें प्रसादमय वाटतात. त्याचप्रमाणें " शंभर बांधव

वटिका करितील।" हा प्रयोग सुखावह नाहीं. त्यांचे ऐवजीं 'शंभर बांधव तुला वटीक करितील असा अर्थ पाहिजे ह्मणजे ती ह्मण सोपी व शुद्ध ठरून त्यांत प्रसाद आला असता. आतां हे शुद्ध प्रयोग पदांच्या विटाळ्यांत कोंबतांना कविंचे मोठे हाल होत असतात हें मी जाणून आहें तरी पण ज्या कवींच्या पुढें शब्द कोश सदैव हात जोडून उभे नाहींत त्या कवींनीं काव्य रचनेच्या भरीस कधींच पडूं नये, असें माझें आग्रहानें सांगणें आहे.

**शीघ्रकवी:**—"जरी न आतां घासशील नाका"

या चरणाऐवजीं

'द्रुपद वाळे घास नाक आतां ॥'

हा चरण घाला.

(रा. गुलकंदे तसें करून पान ६८ व ६९ वरील भाषणें वाचतात. सर्व मंडळी मुकाट्यानें ऐकतात. पुढें पान ७१ वरील दुर्योधनाचें भाषणः—"द्रौपदी तुझा पदर ओढून तुला नागडी करून कृष्णाच्या नांवाचा बुडबुडा एका फुंकरानें फोडल्यावाचून रहाणार नाहीं—दुःशासना, हिचा धांवा संपतांच हिचा पदर ओढ आणि हिला नागडी कर."

**गद्यगदाधर:**—नागडी! बुडबुडा!! शाबास! या गद्वरांची कमाल झाली. "नागडी" आणि "बुडबुडा" असली भाषा दुर्योधन कौरवेश्वराच्या तोंडीं! मग 'नग्न आणि जलबुद्बुद्' असले शब्द दुर्योधनाच्या हुजऱ्याचे तोंडीं घालायचे कीं काय?

(रा. गुलकंदे त्याप्रमाणें दुरुस्ती करतात नंतर द्रौपदीचा धांवा. दुर्योधनाचे आज्ञेवरून सुरूं होतो व पदाचा पूर्वार्ध झाल्यावर 'पदर ओढ' म्हणून दुर्योधन ह्मणतो. दुःशासन पदर ओढतो. श्रीकृष्णाची बालमूर्ति सिंहासनामागें प्रकट होते. दुःशासनाच्या हातांत वस्त्र आलें तरी द्रौपदीचें वस्त्र नाहींसें झालें नाहीं. नंतर दुःशासन लज्जीत होतो व नंतर द्रौपदी पदाचा उत्तरार्ध ह्मणते.)

**रंगवर्मे**:—हा दुःशासन उड्या मारित व नाचत द्रौपदी भोंवतीं वाटोळा फिरतो व सावकाश तिचें वस्त्र उलगडीत जातो हें काय वस्त्र-हरण ह्मणायचें, कीं वस्त्रालेपन ह्मणायचें. प्रख्यात चित्रकार रविवर्मा यानें जें द्रौपदी वस्त्र हरणाचें चित्र काढलें आहे तेंच स्वाभाविक असून अगदीं बरोबर आहे. व त्याचप्रमाणें येथें वस्त्रहरणाचा प्रयत्न दाखवाव-यास हवा होता. संतापून जो मनुष्य एखाद्या स्त्रीचें वस्त्रहरण करण्यास धांवेल तो बायका जशा भोंडला धरतात किंवा भोरभेंडी खेळतात त्याप्रमाणें त्या स्त्री भोंवतीं मूर्खासारखा फिरता राहील कां झटकन् तिचे हात अगोदर वर धरून निरीला हात घालील ! -

( ही सूचना सर्वानुमतें पास होऊन गंधर्वमंडळीकडे पाठवून देण्यांत आली. )

**रंगवर्मा**—दुसरी गोष्ट द्रौपदी ह्मणते ' भावोजी श्रीकृष्णाचे गुण यावेळीं क्षणभर तरी आठवा ' त्यावर दुर्योधन ह्मणतो... " दुःशासना, हिचा धांवा संपल्यावर हिचा पदर बेलाशक ओढ व हिला नागडी कर...द्रौपदी तुझ्या देवाचा धांवा कर "...नंतर दुसरें वस्त्र आंतून निघालेले पाहून पुन्हा ह्मणतो " द्रौपदी तुझें चेटूक चव्हाट्यावर आणतो कर धांवा, धांवा कर—नंतर पुन्हां तिसरें वस्त्र निघाल्यावर-सुद्धां पुन्हां ह्मणतो, द्रौपदीच्या गारोडी विद्येचा अंत मला पहायचा आहे— द्रौपदी कर पाहूं पुन्हां धांवा, कर पाहूं पुन्हां धांवा, (पूर्वींप्रमाणें पद व चम-त्कार ) ! ! " हा सर्व सीन इतक्या थंडपणें व शांततेनें चालतो कीं, या देखाव्यांतील प्रधान गोष्ट प्रल्हाद चरित्राप्रमाणें दुर्योधनाला द्रौपदीची कृष्णभक्ती खरी आहे कीं, खोटी आहे याची कसोटी पहायची आहे असें वाटतें, व ह्मणून तो थंड डोक्यानें पुन्हां पुन्हां द्रौपदीला धांवा करण्यास सांगून मग हराविक वेळीं वस्त्र फेडतो व या सोयी करतां पदाची अस्ताई व अंतरा यांची योजना केली आहे. ) अस्ताई संपली कीं एखाद्या शर्यतींत जसे वन, टु, थ्री, ह्मटल्याबरोबर घोडे भरधांव

निघतात त्याप्रमाणें दुःशासनानें भरधांव निघून द्रौपदी एखाद्या घुसळ खांबाप्रमाणें उभी असते, तिच्या भोंवती रंगण घेऊन त्या पदाची अस्ताई पुरी होण्याच्या सुमारास बक्षीस मिळालेलें वस्त्र परत घेऊन जात असतो.

**चित्रवर्मा:**—भक्तींची कसोटी किंवा सत्त्वपरीक्षा हा या देखाव्यांतील प्रधान विषय असता तर प्रल्हादाला जसें त्याच्या बापानें सावकाशपणें तप्त कढईत टाकला किंवा कड्यावरून लोटून दिला त्याप्रमाणें हा सीन व हे अभिनय चालले असतें—किंवा द्रौपदीचा शिरच्छेद जर करावयाचा असेल तरच ' द्रौपदी तूं तुझ्या देवाचा धांवा कर मी पांच मिनिटें झाल्यावर तुझा वध करणार आहे ' असलें भाषण व धांवा करण्याविषयींचा हुकूम दुर्योधनाच्या तोंडी शोभला असता. या ठिकाणीं दुर्योधन ह्मणतो " द्रौपदी तूं आमची दासी आहेस " त्यावर द्रौपदी ह्मणते " नाहीं " मी दासीं नसून स्वतंत्र आहे " त्यावर संतापून जाऊन तिचें दास्यत्व सिद्ध करायला दुर्योधन तिला नग्न कर अशी आज्ञा दुःशासनाला देतो अशा कठीण प्रसंगीं द्रौपदीनें आपल्या मनांत कृष्णाचा धांवा केला, मनामध्यें त्याला हांक मारली व नंतर ' हे कृष्णा, हे विष्णो, हे हरे, हे नरवरा, ' याप्रमाणें त्याचें नांव घेऊन आक्रोश मांडला ( अध्याय ६८ द्यूत पर्व वाचा ) अशा वेळीं दुःशासनानें तिरासारखें धांवत जाऊन द्रौपदीचें वस्त्र झटकन् हिसडा मारून फेडावयास हवें, तें दिलें टाकून आणि चालला तिच्याभोंवती वाटोळा नाचायला !

**मार्मिकराव:**—अहो परवां माझ्या घरीं अगदीं हाच फार्स उडाला. रात्रीं बारा वाजतां एक चोर घरांत शिरला. मी गाढ निजलों होतो. त्यानें मला अगोदर जागें केलेंन् आणि सावकाश ह्मणाला ' शेटजी तुह्मी परवानगी द्याल तर मी तुमच्या घरांत चोरी करणार आहे, मी ह्मटलें चोरदादा, अहो पोलीस शिपायाला कांहीं आठवा !

त्याचा धाक धरा ! पांच मिनिटें तरी त्याचें नांव घ्या ! म्हणजे तुमची बुद्धि पालटून तुम्हीं आलांत त्या मार्गानें घरी जाल. कां असें छळतां ? चोरदादा कांहीं ऐकेनात. होयना करतां करतां चोरदादा म्हणाले " शेटजी कशाला हा त्या शिपुर्ड्यांचा इतका धाक घालता ? तुम्हांला वाटलं तर तुम्ही त्यांचा धांवा करा चला आटपा. दहा मिनिटें मी तुम्हांला देतों, मी इकडे धांवा सुरू केला. तिकडे चोरदादा माझी कपाटें ट्रूंका धुंडाळू लागले. इकडे रा. बाबुराव लड्डे:-( आपले खिसे बरोबर आहेतसे पाहून ) बरं मग ?

**मार्मिकराव**:--अहो मग काय ? बराच वेळ झाला तरी चोराचा लग्गा साधेना, कीं पोलीसही येईना. मग त्या चोराचा साथीदार दुसरा बाहेर उभा होता त्यानें झटकन आंत येऊन आमच्या दोघांच्या मुस्कटीत लगावूने हातीं सापडलें तें घेऊन एका सेकंदांत पसार ! ! याला म्हणतात चोरी ! !

**गुलकंदे**:—दुर्योधनानें द्रौपदीला कृष्णाचा धांवा करण्याचा हुकूम केला ! या गोष्टीला महाभारतांत जागा असेल ?

**भारताचार्य**:----ही गोष्ट चूक आहे. यावरूनच तिला महाभारतांचा आधार नाहीं, हें नक्की समजा. महाभारत चाळायला नको. महाभारतांत या गोष्टीला आधार नाहीं. रा. गुलकंदे महाभारत खाकोटीस मारून पुढें वाचतात:---पान ७२ वर द्रौपदी धृतराष्ट्राजवळ दोन वर मागते. ( पांडव दास नसावेत व त्यांचीं शस्त्रास्त्रें त्यांना परत मिळावीं ) हे वर बरोबर आहेत.

रा- गुलकंदे पुढें वाचतात.

' धृतराष्ट्र:-मुली तिसरा वर माग '

द्रौपदी:-महाराज पांडवांना सशस्त्र आणि स्वतंत्र करण्याची काळजी आपण दूर केलीत. सशस्त्र आणि स्वतंत्र झालेल्या पांडवांनीं तेरा वर्षें तरी कौरवांच्या राज्यलक्ष्मीला त्रास देऊं नये अशी कौरवेश्वरानें आपली

इच्छा नुकतीच बोलून दाखविली आहे, तेव्हां त्या इच्छेला अनुसरून पण ठरवून हें द्यूत आतां संपवावें अशी माझी तिसरी विनंती आहे.

धृतराष्ट्रः--समजलों. माझ्या दोन वरांची फेड ह्याच वेळीं ह्याच स्थळीं तूं करूं इच्छितेस.

द्रौपदीः--होय महाराज. आज फांसा शकुनीच्या हुकमतींत आहे. अशा वेळीं आपल्या सर्व औदार्याचा ओघ आम्ही आमच्याकडे ओढून घ्यावा आणि आपल्या पुत्रांकडे आपणाला पाहूं देऊं नये हा अधर्म होईल.

धृतराष्ट्रः--तुझी इच्छा तीच श्रीकृष्णाची इच्छा ! फासा तुझ्यासारखा पडला तर साम्राज्यलक्ष्मी तुझी; नाहीं तर बारावर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञानवास द्रौपदीसह तुम्ही पांडवांनीं भोगून मग राज्यलक्ष्मीवर हक्क सांगावा--शकुनी फासा टाक.

शकुनीः--जिंकलं जिंकलं-पांडवांच्या आणि द्रौपदीच्या कपाळीं वनवास आला.

( पांडव वनवासाला जातात, धृतराष्ट्र आशीर्वाद देतो. ) "

!! खेळ खलास !!

**चित्रवर्माः**—हा शेवट अतिशय घाईचा, अप्रस्तुत, अक्षम्य असा आहे !

**रसगंगाधरः**—सर्व रसांचा खून जर कोठें होत असेल, तर असल्या प्रकारचा शेवट केला ह्मणून ! या शेवटल्या प्रवेशांत ! !

**गद्यगदाधरः**—द्रौपदी आपल्या तिसऱ्या विनंतींत किंवा वर मागण्यांत पुन्हां द्यूताची भिक्षा मागते ही तर द्रौपदीच्या निर्लज्जपणाची कमाल आहे.

**रंगवर्मः**—नवऱ्यांना न विचारतां ही आधुनिक द्रौपदी पुन्हां जुगार खेळायला आपल्या नवऱ्यांना भाग पाडते हा पतिव्रताधर्म अजब आहे !

**अर्थभट:**—एकदां द्यूत खेळून सारं राज्य गमावलं होतं. नवऱ्यांना व आपल्या स्वतःला नागवें होण्याचा प्रत्यक्ष प्रसंग भर सभेंत नुकताच आला होता, तो कृष्ण कृपेनें टळला. नवरे पुन्हा स्वतंत्र व सशस्त्र झाले इतकें झाल्यावर—ज्या दुर्योधनानें हें सारें कपट केलें, व तिला " नागडी " केली त्याच दुष्ट माणसाची केवळ इच्छा ह्मणूनच पुन्हा पण लावून द्यूत खेळावें असा वर किंवा विनंति त्याच द्रौपदीनें आपल्या सासऱ्याजवळ, भरसभेंत करावी ही का द्रौपदी आहे का रेसची घोडी आहे !!! कितीही रेसेस झाल्या, लोकांचें वाटोळें झालें, तरी दमत ह्मणून नाहीं, पाठीवर थाप मारली कीं, निघाली भर धांव !!

**भारताचार्य:**—द्रौपदीची ही असली तिसरी विनंती किंवा वर एक भयंकर चूक आहे अशी तुमची खात्री झाली ना ?

[ सर्वजण होय ह्मणतात. ]

तर मग अशा प्रकारचा वर, द्रौपदीनें मूळ महाभारतांत मुळींच मागितला नाहीं हें खास समजा. तितकें चुकलेलें तितकें या कवींचें, बरोबर आहे तें मुळांतलें, हें " भरपूर माप " मूळभारत अध्याय ७१ द्यूतपर्व वाचा ह्मणजे कवीच्या पदरांत घालता येईल. द्रौपदी तेथें काय ह्मणते ऐका.

" हे भगवान् जगामध्यें लोभ हा फार वाईट आहे. धर्माच्या नाशाला कारण तो, ह्याकरतां हे राजाधिराज तिसरा वर मागायला मी अयोग्य असल्यामुळें तो मागायला माझें मन धजवत नाहीं. क्षत्रियांच्या स्त्रियांना दोनच वर मागण्याचा अधिकार शास्त्रानें ठेविला आहे. ह्याकरतां निकृष्टावस्थेला पोहोंचलेले माझे पति संकटांतून मुक्त झाले हें कांहीं थोडें झालें नाहीं, तेवढें पुरें. आतां हे राजा, ते आपल्या पवित्र आचरणानें भाग्यानें चढतील."

सर्व कुठार कव:—शाबास ! द्रौपदी शाबास ! हे आर्यस्त्रीचें खरें चित्र पहा: नाहींतर १९२१ सालांतली विद्वान् पदवीधर, कसलेल्या अनुभविक लेखकाच्या लेखणीनें निर्माण केलेली, नवऱ्यांना जुगाराच्या

खड्यात पुन्हा घालून वनवासाला लावणारी ही अधुनिक द्रौपदी पहा !!!

**गद्यगदाधरः**---' द्रौपदी ह्मणते हें द्यूत आतां संपवावें !!! जसें कांहीं द्यूत संपलें नव्हतें ! वाहवा खरोखर शकुनी व धर्म या द्यूतप्रिय जोडीला खालीं मान घालावयास लावणारी ही द्रौपदीची जुगारावरची-आसक्ती पाहून कोणाला संताप वाटणार नाहीं ?

**रा. गुलकंदेः**—( कण्हत कुंथत पुढें वाचतात, ) ' द्रौपदी ह्मणते ' आज फांसा शकुनीच्या हुकमतींत आहे "

**मार्मिकरावः**—बरोबर आहे ! तोंपर्यंत आमचे काय वाटोळें करून घ्यायचें असेल तें खुशाल करून घ्या ! एकदां नाहीं शंभरदां द्यूत खेळा !!! हे माझे शुंभ नवरे अगदीं तयार आहेत चला आटपा!!

**रा गुलकंदेः**—' अशा वेळीं आपल्या सर्व औदार्याचा ओघ आह्मी आमच्याकडे ओढून घ्यावा आणि आपल्या पुत्राकडे आपणाला पाहूं देऊं नये हा अधर्म होईल !!

**मार्मिकरावः**--अहो अधर्म कां ! ब्रह्महत्या होईल ब्रह्महत्या !! चला आटपा पट मांडा ह्मणून ह्मणतें आहेना मी केव्हांची ? अहो त्यांशिवाय या माझ्या व्यसनी नवऱ्यांची खोड मोडायची नाहीं. त्यांना वनवासाला पाठविले पाहिजेत. त्याशिवाय मी हें नाटक संपवीन कीं काय ? नांव कशाला ? नांवाची दरौपती आहे मी दरौपती !

बाबुराव लट्ठः---हें काय नवीन लचांड ?

**मार्मिकरावः**---दरौ ह्मणजे खड्डयांत—पति ह्मणजे नवरे—नवरे खड्डयांत पाडण्यांत कुशल अशी जी ती दरौपती—तिचा अपभ्रंश द्रौपदी असा झाला आहे. महाभारतांतली द्रौपदी हें अपभ्रंशित रूप आहे. खरं पाहिलं तर तिचं सार्थ नांव १९२१ सालीं दिलें गेलेलं ह्मणजे दरौपती असें आहे, काय समजलेत !

**गुलकंदेः**—( खड्यांतून डोकें वर काढून ) ' धृतराष्ट्रः—ह्मणतो तुझी इच्छा तीच श्रीकृष्णांची इच्छा !!

**मार्मिकराव**:—खरोखर श्रीकृष्णाइतका परोपकारी प्राणी दुसरा कोणीच नसेल. द्रौपदी ह्मणते, श्रीकृष्णाच्या इच्छेनें द्यूत सुरू केलें. धृतराष्ट्र म्हणतो—द्यूत पुन्हा सुरू करा असें वाटतें ही ही त्याचीच प्रेरणा ! श्रीकृष्णा सांभाळरे बाबा ! ! Save me from my friends असें ह्मणायची पाळी तुझ्यावर आली खरी !

**गुलकंदे**:—वाचतात ( पांडव पुन्हां हरून बनवासाला जातात निघतात—नमस्कार करतात—( मार्मिकराव कोंपरापासून नमस्कार करतो )- व नंतर धृतराष्ट्र म्हणतो:—मुली सर्व कल्याणाचा मूर्तिमंत ठेवा. तूं आहेस !

**मार्मिकराव**:—माझं बाळ तें ! कसें शहाणें आहे. मी ममतेच्या भरांत स्वतंत्रता दिली—शस्त्रास्त्रें दिलीं—पण माझी चूक चटकन् लक्षांत आणून पुन्हां द्यूत खेळायची सूचना या माझ्या शहाण्या सुनबाईनें केली ! आतां कसं गपूचिप् काम झालं ! मुकाट्यानें सारं राज्य माझ्या मुलांच्या स्वाधीन करून अंगाला राख फांसून हे सारे पांडव काढले कीं नाहीं बाहेर बनवासाला ! बरं पुन्हां कुणी असं ह्मणायला नको कीं पुन्हां द्यूत खेळा असा आग्रह आमचा होता म्हणून ! तुमचीच श्री-कृष्णाची महाभक्त अशी शहाणी बायको आपण होऊन माझ्यापाशी वर मागते कीं, मामंजी पुन्हा एकदां पट मांडा ! बरोबर आहे, मघाचें द्यूत झालें तें पहायला माझी सूनबाई नव्हती. तिला तर हौस फार ! होऊन जाऊं द्या ह्मटलं,-आला बनवास कपाळीं पांडवांच्या त्याला मी काय करणार ! शाबास ग माझी सूनबाई ! माझ्या मुलांना सारं राज्य बिनबोभाट देऊन आपल्या व नवऱ्यांच्या हातीं कथलाचे वाळे देणारी अद्‌भुत सुनबाई जर कोणाला पहायची असेल तर ती पहा ! ! !

**रा. गुळकंदे**:----( गळ्या इतक्या खड्यांत पडल्या पडल्या ) धृत-राष्ट्राचें पद ह्मणतो पान ७४.

" श्री तव होवो विजयहि पावा ।
धर्मद्रुमल शमफल । इत्यादि ॥ "

**मार्मिकराव:**—अगदीं यथार्थ आहे. इतका बिनबोभाट डाव झाल्यावर धृतराष्ट्रासारखा आपमतलबी राजा--म्हातारा आंधळा--असून हा भैरव रागांत ब्रह्मतालावर नाचून ब्रह्मानंदी टाळी वाजवील यांत काय नवल !

**भारताचार्य:**—भारतांतली मूळ कथा फारच वेगळी असून ती अगदीं योग्य समर्पक व प्रस्तुत अशीच आहे; व सभापर्वांतील द्यूत-पर्व व अनुद्यूत पर्व समग्र वाचल्यावर वाचकांची खात्री होईल कीं, ती कथा किती मनोरम व सुसंगत आहे व सदरहु नाटक ह्मणजे त्या कथेच्या मानानें पाहिलें तर भारतांतील उदात्त भूमिकांची कशी विटंबना आहे !!!

इति श्री महाभारताचार्य प्रासादिक नाट्यकला—रुक्—कुठार मात्रा.

द्वितीयवळसा खाडिलकर—कृत द्रौपदी नाटके तृतियांके चौपाटी—
—सौधासने चर्चिता नवनाटककार:कल्याणार्थं उगाळिता प्रकाशिता

॥ शुभं भवतु । शुभं भवतु ॥

समाप्त

REFBK-0003288
3288